निबंध
११५८

# [illegible]ीय पक्ष म्हणजे लोकशाहीचा घात

म. ग्रं. सं. ठाणे
विषय निबंध
सं. क्र. ११५८

REFBK-0009773

दत्तात्रय व्यंकटेश पै

गोवा हिंदु असोसिएशन, १४ त्रिभुवन रोड, मुंबई ४

# राजकीय पक्ष म्हणजे लोकशाहीचा घात

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
★
अनुक्रम ... वि:
क्रमांक ... नों: दि:

: लेखक :

प. ना. दत्तात्रय व्यंकटेश पै

: प्रस्तावना :

प्रा. गोवर्धन पारीख

REFBK-0009773

धि गोवा हिंदु अॅसोसिएशन

प्र का श क :
श्री. ज. स. सुखठणकर, बी. कॉम्.
चिटणीस, ' संदर्भ ग्रंथ – सामिति ',
घि गोवा हिंदु ॲसोसिएशन
१४, त्रिभुवन रोड, मुंबई ४

★

वेष्टण : श्री. डी. डी. दुभाल

स्थापना १९१९ — रजिस्टर्ड १९४०

किंमत दीड रुपाया

प्रकाशन : २५ मे १९५८

★

मुद्रक :
श्री. जगन्नाथ द. सातोस्कर
सागर साहित्य प्रिंटिंग प्रेस,
२०, त्रिभुवन रोड, मुंबई ४.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्वत्व
अनुक्रम २३८८८ दि:
क्रमांक ... ९९७४ ... नों: दि:

# राजकीय पक्ष म्हणजे लोकशाहीचा घात

---

## अनुक्रमणिका

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ८८०८३

निवेदन

लेखकाचा अल्प परिचय

प्रस्तावना

१ थोडेसें प्रास्ताविक — १

लक्षवेधक संधिकाल; एक महत्तम उपेक्षित प्रश्न; प्रतिपाद्य विषय व प्रतिकूल परिस्थिति; विचार हाच जगाचा खरा नियंता; कालोह्ययं निरवधिर्विपुलाच पृथ्वी.

२ लोकशाहीचे चार घटक व मूलाधार — ५

'मत' म्हणजे काय व तें द्यावयाचें कोणाला; लोकशाहीची अर्थमर्यादा : मतदारशाही; लोकशाहीचे चार घटक व मूलाधार; मत म्हणजे काय? मत कोणाला? उमेदवारव्यक्तीला, पक्षाला कीं सहविचाराला.

३ लोकशाहीचीं प्राणभूत पंचतत्त्वें — ११

मताची व्याख्या; मतपात्रता व शिक्षण; निरक्षर प्रौढांनाहि मताधिकार कां? उमेदवार व मतदार संघ; मतदानाचें स्वातंत्र्य; मतदारांची मतदानक्षमता; मतदानाची दक्षता; मतदार हें बिंब, सरकार हें प्रतिबिंब; लोकशाहीची व्याख्या.

४ लोकशाहीसाठीं अवश्य असणारें बाह्य वातावरण २०

मतप्रचार आणि सत्य व अहिंसा; सर्वच यंत्रणा सच्ची हवी; वृत्तसंस्था व लोकशाहीवाद्यांपुढील प्रश्न; पायांकडे पहा तर दोघेंहि पहा; परमधर्म म्हणून नव्हे.

५ लोकशाही ही एक निष्ठाहि आहे २५

लोकशाही ही आदर्श स्थिति; आदर्श पण अपेक्षणीय; मानवाची विकसनशीलता; मुद्द्याचा प्रश्न कलाचा किंवा रोखाचा; आदर्श म्हणूनच निष्ठेय; आधीं हें ठरवा मग पुरस्कार करा.

६ राजकीय पक्षांचें यथार्थ स्वरूप ३१

प्रतिपाद्य विषयाचें स्मरण; राजकीय पक्षांची उत्पत्ति; पक्षाची व्याख्या व व्यवच्छेदक मुख्य लक्षण; पक्षशिस्त म्हणजे वैचारिक गुलामगिरी; पक्षाचा आद्य उगमबिंदु.

७ विकृति हीच राजकीय पक्षांची प्रकृति ३७

व्यक्तीची कीर्तिलालसा व पक्षाची उभारणी; पुढाऱ्यांना अहंगंड तर अनुयायांना न्यूनगंड; नीचे मुंडी उपर हाथ! पक्ष, पडदा, पक्षान्धता; पक्षशुद्धीचा अन्वयार्थ.

८ पक्षविकृतीचे राष्ट्रासी दुष्परिणाम ४३

मूढबुद्धीचें चक्र; लोकशाहीच्या मूलतत्त्वांवर घाव; महापुरुषांचें सहकार्य अशक्य ठरतें; अपरिहार्य काय तें नीट ध्यानांत ठसवा; मुले कुठार :.

९ पक्ष व कार्यक्रमाची बजावणी हीं अविच्छेद्य नाहींत ४८

पक्षांची आवश्यकता कां भासते? पक्षांत विकृति केव्हां शिरते? ही घ्या पक्षाशिवाय कार्यक्रमाची बजावणी! पक्षाचा कार्यक्रम कसा तयार होतो, हाहि मुद्दा लक्षांत घ्या.

१० पक्ष आणि मंत्रिमंडळ हींहि अविच्छेद नव्हत ५४

मंत्रिमंडळ बनवण्याचा प्रश्न कां उत्पन्न होतो? राष्ट्राध्यक्ष प्रधान राज्यपद्धतींत मंत्रिमंडळ कसें बनवलें जातें? खुद्द पक्षांची रचना कशी असते ती पहा; सर्व प्रतिनिधी मंडळच एक 'पक्ष' मानावा; विधिमंडळाचा अध्यक्ष सर्वच सभासद निवडतात; मंत्रिमंडळ मात्र लादलें जातें; राजकीय पक्ष नसले तर...; संयुक्त जबाबदारीचें तत्त्वहि पाळतां येईल.

११ राष्ट्रनिष्ठेविरुद्ध पक्षनिष्ठेचे प्रताप ५९

पक्ष व मंत्रिमंडळानें घ्यावयाची शपथ; नागरिकांच्या हातीं नरोटी, पक्षाच्या तोंडांत खोबरें! दगलबाजी कोणाशीं? पक्षाशीं कीं राष्ट्राशीं? पेंचप्रसंगामुळें पुन्हा अधःपात.

१२ पर्याय पक्षामुळेंहि लोकशाही विकृत होण्याचें टळत नाहीं ६३

सरकार व विरोधी पक्ष; पक्ष विरोधी कीं पर्यायी? उजवा वं डावा पक्ष; पर्याय पक्षापासून फायदे; मतदार संघाची रचना; मतदान–पद्धति; पण नकटीचें नाक नकटेंच! अंधःकार अंधःकारानें कसा नष्ट होईल?.

१४ एकपक्षीय लोकशाही म्हणजे हुकूमशाहीच आणि बहुपक्षीय लोकशाही म्हणजे बजबजपुरी ७१

"एकपक्षीय लोकशाही", "वदतो व्याघाता" चें उदाहरण? अत्यल्पसंख्यांचें अतिबहुसंख्यांवर आक्रमण; मताधिकाराचा फार्स; एकपक्षीय पद्धति व 'वाद' यांची वृथा सांगड; एकपक्षीय लोकशाहीच्या रक्षणाचे दुहेरी उपाय; अखेरचें पर्यवसान हुकूमशाहींत; बहुपक्षीय लोकशाही; स्वतंत्रउमेदवार विरुद्ध लोकशाही.

१४ पक्षघटना ही अंशतः तरी राज्यघटनाद्रोही नव्हे काय? ७७

पक्षशाहींतून आधीं नेतेशाही व मग हुकूमशाही कशी जन्मते! पक्ष अपरिहार्य कां वाटतात! निष्कर्ष.

वाचकांना विनंती ८०

# नि वे द न

प. वा. श्री. दत्तात्रय व्यंकटेश पै यांच्या सहाव्या स्मृतिदिनीं (२५ मे १९५८) त्यांनीं लिहिलेलें हें लहानसें पुस्तक 'धि गोवा हिंदु ॲसोसिएशन'च्या विद्यमानें प्रसिद्ध होत आहे. १९५२ सालीं भारताच्या पहिल्या सार्वत्रिक निवडणुका झाल्या त्यावेळीं लेखकानीं हें पुस्तक लिहिलें. त्याचवेळीं तें प्रसिद्ध व्हावयाचें; परंतु त्यांच्या दीर्घकालीन आजारामुळें व नंतर निधनामुळें पुस्तकाचें प्रकाशन तसेंच राहून गेलें.

कोणत्याही विषयाचें शास्त्रीय दृष्टीनें पृथक्करण करून त्यावरून तर्कशुद्ध सिद्धांत बांधण्याची तीव्र बुद्धिमत्ता प. वा. पै यांच्या ठिकाणीं होती. गोव्याबाहेर स्वेच्छेनें निर्वासित जीवन पत्करण्यापूर्वीं 'हिंदु' पत्राचे संपादक या नात्यानें राज्यशास्त्र आणि राजकारण यांचे सखोल अभ्यासू असा लौकिक त्यांनीं संपादन केला होता. त्यांच्या मूलग्राही, चिकित्सक व सूक्ष्म मौलिक राजकीय प्रज्ञेचा प्रत्यय या लहानशा पुस्तकांतूनही वाचकांस मिळूं शकेल.

स्वतंत्र भारताची नवी घटना १९५० सालीं घोषित झाल्यानंतर १९५१ च्या अखेरीला नवीन घटनेप्रमाणें सार्वत्रिक निवडणुका झाल्या. संसदीय लोकशाहीचा स्वीकार करणारें एक महान राष्ट्र म्हणून भारताकडे जगाचे डोळे लागून राहिले. लोकशाहीचा महान प्रयोग, जगांतील सर्वांत मोठा मतदार संघ, असा जयजयकार चालू असतांनाच प. वा. पै यांनीं हें पुस्तक लिहून पक्षीय राजकारणाचें वास्तविक स्वरूप काय असतें, त्यांतील दोष व धोके काय आहेत हें मोठ्या धैर्यानें या पुस्तकांत दाखवून दिलें आहे. त्याचवेळीं तें प्रसिद्ध झालें असतें तर लोकशाहीच्या नौबतींच्या आवाजांत त्याच्याकडे लक्ष देण्याएवढी सावधानता कदाचित् दाखवली गेली नसती हें संभवनीय आहे; तथापि अलिकडे श्री. जयप्रकाश किंवा आचार्य विनोबा भावे यांच्यासारखे परिणतप्रज्ञ, पक्षविरहित लोकनीतीचा पुरस्कार करतात, त्यांच्या विचारांशीं प. वा. पै यांनीं सहासात वर्षांपूर्वीं प्रकट केलेले विचार किती जुळते आहेत हें लक्षांत घेण्यासारखें आहे. यावरून

प्रा. पारीख यांनीं प्रस्तावनेंत म्हटल्याप्रमाणें ‘ काळाचीं पाऊलें ’ ओळखण्याचें सामर्थ्य प. वा. पै यांच्या ठिकाणीं होतें असें म्हटलें तर चुकीचें होणार नाहीं. त्यांनीं पक्षीय किंवा पक्षबाज राजकारणाबद्दल निर्भीडपणें परंतु संयम व उच्च पातळी न सोडतां जे विचार प्रकट केले आहेत त्यांची अधिक चिकित्सा होणें आज अत्यावश्यक आहे. लेखकाची लोकशाहीवर, खऱ्याखुऱ्या लोकशाहीवर दृढ निष्ठा आहे. देवतेवरील निष्ठेसारखी, अविचल परंतु अंध नव्हे, अशी त्यांची लोकशाहीवर नितांत भक्ति आहे. पण त्यांच्या ठिकाणीं विरोधी विचारांचेंहि स्वागत करण्याइतकी अन्तग्रही वृत्ति व प्रांजलपणा आहे हें या पुस्तकाच्या शेवटचा परिच्छेद ( वाचकांस विनंती) आहे तसाच बदल न करतां छापला आहे, त्यावरून वाचकांच्या लक्षांत येईल.

सामान्य वाचकांना व विशेषतः विद्यार्थ्यांना लोकशाहीसंबंधीं स्थूल व व्यवहारोपयोगी माहिती करून देणारा सुमारें ९०० हस्तलिखीत पृष्ठें भरतील एवढा ‘ सुलभ लोकशाही ’ या नांवाचा एक विस्तृत निबंध त्यांनीं लिहिला आहे. त्यांच्या आजारामुळें व इतर अनेक अनुल्लंघनीय अडचणींमुळें तो प्रकाशित होऊं शकला नाहीं. या ग्रंथास योग्य असा प्रकाशक मिळाला तर त्यांतील मौलिक विचारधन वाचकांस उपलब्ध होऊं शकेल. आज शाळा–कॉलेजांतून राज्यशास्त्र व राज्यशासन हे विषय अभ्यासावे लागतात. मराठींत या विषयावरील स्वतंत्र ग्रंथांचें अजूनही दुर्भिक्ष आहे हें लक्षांत घेतां हा ग्रंथ प्रकाशित झाल्यास या विषयावरील ग्रंथांत तो एक मोलाची भर ठरेल असा आम्हांस भरंवसा आहे.

‘ धि गोवा हिंदु ॲसोसिएशन ’ नें या पूर्वी आपल्या रौप्यमहोत्सवाच्या निमित्तानें ‘ आजचा व कालचा गोमंतक ’ हा अत्यंत उपयुक्त संदर्भ–ग्रंथ प्रसिद्ध केला होता, आणि तो जनतेच्या आदराला आणि मुंबईसरकारकडून पारितोषिक मिळाल्यामुळें गौरवालाहि पात्र ठरला. असें असलें तरी पुस्तक प्रकाशन हें ‘ ॲसोसिएशन ’च्या नित्य कार्यांतील नव्हे. या प्रकाशनासाठीं ‘ ॲसोसिएशन ’चे एक संस्थापक व ज्येष्ठ कार्यकर्ते डॉ. व्यं. पां. कामत यांनीं जी देणगी दिली त्यामुळें हें पुस्तक आम्हाला आज वाचकांच्या हातीं देतां येत आहे. या देणगीबद्दल डॉ. कामत यांचे आम्ही ऋणी आहों.

या पुस्तकाला प्रा. गोवर्धन पारीख यांनीं नीटस व विवेचक प्रस्तावना लिहिली आहे. प. वा. पै यांच्या व आमच्या या विषयींच्या इच्छेला त्यांनीं मान दिला याबद्दल त्यांचे आम्ही अत्यंत ऋणी आहोंत. तसेंच हें पुस्तक प्रसिद्ध करण्यासाठीं आमच्या स्वाधीन केल्याबद्दल प. वा. पै यांचें ज्येष्ठ पुत्र श्री. वैकुंठनाथ द. पै, या पुस्तकाच्या प्रकाशनांत सर्वतऱ्हेची मदत केल्याबद्दल संस्थेचे कार्यकर्ते श्री. व्यंकटेश ना. नाईक व श्री. बा. द. सातोस्कर, पुस्तकाचीं मुद्रितें तपासण्याच्या कामी मदत केल्याबद्दल श्री. ल. ना. गिंडे आणि या पुस्तकाचे मुद्रक सागर साहित्य प्रेसचे मालक श्री. ज. द. सातोस्कर, या सर्वांचे आभार मानणें अवश्य आहे.

ज. स. सुखठणकर

# लेखकाचा अल्प परिचय

आधुनिक गोमंतकाच्या घडणीसाठीं गेल्या पिढींतील ज्या गोमंतकीय पुढाऱ्यांनीं प्रयत्न केले त्यांत प. वा. दत्तात्रय व्यंकटेश पै यांचा समावेश होतो. त्यांचें सर्वाधिक महत्त्वाचें कार्य म्हणजे 'हिंदु' साप्ताहिक. १९२४ ते १९३१ सतत सात वर्षे तें चाललें. एक सिद्धहस्त व धारदार लेखक आणि कोणत्याही विषयाच्या बुडाशीं जाऊन विचारमौक्तिकें वर काढणारे विचारवंत म्हणून त्यांचा जो बोलबाला झाला तो हिंदु साप्ताहिकांतील लेखनामुळेंच. 'हिंदु' चालू होता त्या वेळीं गोमंतकांत लोकसत्तात्मक गणराज्य होतें. जनतेला आचार, उच्चार व सभास्वातंत्र्य होतें. कोणत्याही विचारसरणीचा प्रचार करण्यास आडकाठी नव्हती. पण अशा स्थितींतही 'हिंदू'तील जहाल लेखांमुळें त्यांचे प्रकाशक श्री. जयवंत सुकेरकर यांस तुरुंगवासाची शिक्षा झाली. या जहाल विचारसरणीचें आणि जहाल लेखनसरणीचें जनकत्व अर्थात्‌च दत्तात्रय व्यंकटेश पै यांच्या लेखणीला होतें.

आर्थिक नुकसानीमुळें 'हिंदु' बंद पडला तरी एक सव्यसाची यशस्वी संपादक म्हणून ते ओळखले जाऊं लागले. एक शैलीदार लेखक म्हणून महाराष्ट्रांतही त्यांचें नांव घेण्यांत येऊं लागलें, आणि म्हणूनच १९३०–३१ च्या सुमारास मुंबईतील लक्ष्मी नारायण प्रेसनें 'लोकमत' या नांवाचें दैनिक काढलें तेव्हां श्री. पै यांची त्याचे संपादक म्हणून नियुक्ति करण्यांत आली.

लोकमत बंद पडलें. उदरनिर्वाहासाठीं त्यांना वेगळा व्यवसाय पत्करावा लागला. पण पत्रव्यवसायाचें त्यांचें 'वेड' कमी झालें नव्हतें. आपला पिंड पत्रकाराचा आहे असें ते म्हणत. पत्रकाराचा व्यवसाय करीत असतांना आपणास मृत्यू यावा अशी इच्छा ते व्यक्त करीत. १९४७ मध्यें राजकीय परिस्थितीमुळें गोमंतक सोडून ते बेळगांवीं आले तेव्हां 'विकास' नांवाचें एक साप्ताहिक त्यांनीं सहा महिने चालविलें खरें, पण पत्रकाराचा पेशा असा मात्र त्यांना केव्हांच स्वीकारतां आला नाहीं.

स्वतःचें पत्र नसलेल्या काळांत मुंबई–पुण्याच्या दैनिका–साप्ताहिकांतून त्यांनीं स्फुट लेखन मोठ्या प्रमाणावर केलें. गोमंतकाचे राजकीय व इतर प्रश्न हेच त्यांच्या या लेखनाचे प्रमुख विषय असत. १९४६ सालीं सुरू झालेल्या गोमंतकाच्या स्वातंत्र्य लढ्याला पोषक अशाच प्रकारचें त्यांचें हें लेखन असे.

त्यांचें सर्वच लेखन एका विशिष्ट शैलीनें नटलेलें आहे. लालित्याचा, माधुर्याचा आढळ त्यांत होत नसला तरी ओज आणि विचारांची अतीव स्पष्टता हे गुण त्यांत ओतप्रोत असत. वाचकांना देण्यासारखें विचारधन त्यांच्यापाशीं होतें, आणि कर्णाच्या औदार्यानें तें त्यांनीं आपल्या लेखनांत उधळून टाकलेलें आहे. प्रस्तुत पुस्तक हें त्यांच्या या गुणांचें एक उदाहरण आहे. 'मुसलमानी अंमलांतील गोमंतक,' 'जळता गोमंतक' 'निवडक भाषणें' हीं त्यांचीं इतर पुस्तकें.

लेखनांतले हे गुण त्यांच्या वक्तृत्वांतही आढळून येत. कांहींसें पूर्णोच्चारी व सानुनासिक असें त्यांचें वक्तृत्व असे. तें प्रदीर्घही असे. पण त्यांच्या भाषणांतला आवेश व युक्तिवाद, स्वमताबद्दलचा पुरेपुर अभिमान या गुणांमुळें श्रोत्यांचीं मनें ते जिंकीत. विनायकमहाराज मसूरकर यांनीं शुद्धिप्रकरणांत गोमंतकीयांवर केलेल्या आरोपांना उत्तर देण्यासाठीं जें शिष्टमंडळ मुंबई–पुण्याला आलें तें यशस्वी होण्यांत पै यांच्या या वैशिष्ट्यपूर्ण वक्तृत्वशैलीचा बराच उपयोग झाला होता.

शिक्षण हा त्यांच्या आवडीचा आणखी एक विषय. फोंड्याच्या आल्मैद कॉलेजांत शिक्षक म्हणूनच त्यांनीं व्यावसायिक जीवनास सुरवात केली. 'हिंदु' बंद पडल्यावर मडगांवांत त्यांनीं स्वतःच्या जबाबदारीवर एक शिक्षणसंस्था स्थापन केली. याशिवाय गोमंतकांतील मराठी शाळांत सल्लागार, परीक्षक, चालक या विविध नात्यांनी त्यांनी कामगिरी केली. गोमंतकांतील मराठी शिक्षणांत एकसूत्रता आणावी म्हणून स्थापन झालेल्या गोमंतक मराठी शिक्षण संमेलनांत त्यांनीं फार मोठा भाग घेतला. या संमेलनाच्या दुसऱ्या अधिवेशनाचें अध्यक्षस्थान त्यांनींच स्वीकारलें होतें.

याशिवाय ' गोमंतकाचा भूगोल ', ' बालविज्ञान संयोगा'चे चार खंड, ' गोमंतकाची राज्य व्यवस्था ', ' पोर्तुगीज भाषा प्रवेश ' अशीं कांहीं पुस्तकें लिहून बालशिक्षण साहित्यांत त्यांनीं फार चांगली भर घातली आहे.

गोमंतकाच्या पारतंत्र्याची त्यांना अतीव खंत वाटे. आजच नव्हे, अगदीं तरुण वयापासून. गोमंतक एक दिवस स्वतंत्र होऊन तो भारतांत विलीन झालेला पाहावा हें त्यांचें एक स्वप्न होतें. गोव्याच्या स्वातंत्र्यासाठीं लेखणी आणि वाणी यांच्या द्वारें जें जें करतां येईल तें तें करायचें त्यांनीं शिल्लक ठेवलेलें नाहीं. स्वातंत्र्याचा लढा सुरू होण्यापूर्वी १९४५ सालीं मुंबई येथें भरलेल्या गोमंतक मराठी साहित्य संमेलनाच्या तिसऱ्या अधिवेशनाचे ते स्वागताध्यक्ष होते. या स्थानावरून त्यांनीं भाषण केलें तें आपल्या मनींची ही व्यथा व्यक्त करणारें. गोव्याची राजकीय गुलामगिरी जगाच्या वेशीवर टांगणारें.

तसें पाहिलें तर गोव्याच्या राजकारणांत त्यांनीं फार पूर्वीपासून भाग घेतलेला आहे. ' प्रागतिक संघ ' या एकेकाळच्या गोमंतकाच्या एकुलत्या एका राजकीय संस्थेच्या स्थापनेंत आणि त्यानंतरच्या हिरीरीच्या राजकारणांत त्यांचा हात प्रभावी होता. पोर्तुगीज पार्लमेंटांत गोव्याचे प्रतिनिधि म्हणून सरकारी उमेदवारांविरुद्ध उभें राहण्याचें धाडसही त्यांनीं केलें होतें.

गोव्यांतील इतर सर्व प्रकारच्या चळवळींत त्यांचा हात असेच. मडगांवला १९३० सालीं भरलेल्या महाराष्ट्र साहित्य संमेलनाचे सरचिटणीस म्हणून त्यांनीं जें शिस्तबद्ध काम केलें तें अजूनही आदर्श समजलें जातें.

# प्रस्तावना

राजकीय पक्ष आणि लोकशाही यांच्या पारस्परिक संबंधाची समीक्षा करणारे कै. श्री. दत्तात्रय व्यंकटेश पै यांचें हें पुस्तक त्यांचे स्नेही प्रकाशित करीत आहेत ही अत्यंत समाधानाची गोष्ट होय. प्रस्तुत पुस्तक प्रसिद्ध व्हावें आणि त्याच्या अनुषंगानें आमच्या राजकीय जीवनांतील मूलभूत अशा या प्रश्नाच्या चर्चेला चालना मिळावी ही कै. श्री. पै यांची इच्छा अशा प्रकारें पुरी होत आहे; आणि ही प्रस्तावना हा त्यांच्या इच्छेचाच भाग होय असें मला सांगण्यांत आलें आहे.

गोमंतकांतील एक प्रसिद्ध पत्रकार, देशसेवक आणि निष्ठावंत समाज-सुधारक म्हणून कै. श्री. पै हे सर्वांनाच परिचित होते. त्यांचा व माझा प्रत्यक्ष परिचय मात्र अगदींच थोडा, केवळ एक दोन वेळां झालेल्या भेटींपुरताच मर्यादित होता. यामुळें वैचारिक परिचयांतून उद्‌भवणारी आत्मीयतेची भावनाच त्यांच्या वरील इच्छेला जबाबदार असावी असें वाटतें. १९४८ सालीं झालेलें रॅडिकल डेमोक्रॅटिक पक्षाचें विसर्जन ही पक्षनिष्ठ राजकारणांतील एक अभूतपूर्व घटना होती. त्या घटनेला कारणी-भूत झालेल्या तात्त्विक भूमिकेशीं कै. श्री. पै यांचा प्रत्यक्ष परिचय होता कीं नव्हता हें मला माहित नाहीं. तथापि वाचन, विचार व अनुभव यांच्या सहाय्यानें त्यांनीं राजकीय पक्षांबाबत काढलेला निष्कर्ष हा त्या भूमिकेंतून निघणाऱ्या या प्रश्नाबाबतच्या निष्कर्षाशीं बराचसा जुळता असल्यामुळें, वैचारिक भूमिकेला महत्त्व देणारें त्यांचें लक्ष माझ्याकडे वळलें असावें. अशा प्रकारें निर्माण झालेली ही अत्यंत पवित्र जबाबदारी पार पाडण्याची संधि कै. श्री. पै यांच्या स्नेह्यांच्या प्रयत्नामुळें मला मिळत आहे याबद्दल मी त्यांचा अत्यंत ऋणी आहें.

प्रातिनिधिक लोकशाहीच्या संस्थात्मक चौकटीच्या पार्श्वभूमीवर प्रस्तुत पुस्तकांतील विवेचन करण्यांत आलें आहे. स्वतंत्र भारतानें राज्यघटनेच्या रुपानें अशा प्रकारच्या लोकशाहीचा स्वीकार केला असल्याकारणानें येथें

पक्षनिष्ठ राजकारण वाढीस लागण्याची शक्यता निर्माण झाली आहे. आणि यामुळें घटनेद्वारां निर्माण केलेल्या लोकशाहीचा विकास व्हावा, सामाजिक जीवनांत तिचीं मुळें खोलवर रुजून तिला मजबुती यावी यासाठीं या प्रश्नाची सांगोपांग चर्चा होणें आवश्यक झालें आहे. परंतु जगांतील विविध विचारसरणीं व आंदोलनें याविषयींचें ज्ञान व अनुभव ध्यानांत घेऊन त्यांच्या आधारें राजकीय जीवनांतील प्रश्नांची साधकबाधक चर्चा करण्याचा प्रघात आमच्या राजकीय जीवनांत अजूनही फारसा आढळत नाहीं असें म्हटल्यास चालेल. यामुळें इतर प्रश्नांप्रमाणेंच याही बाबतींत आमची दृष्टी बव्हंशीं गतानुगतिकतेचीच राहिली आहे; बाहेरील अनुभवाच्या बाबतींतही तिच्यांत अनुकरणप्रियताच अधिक आढळते.

राजकीय क्षेत्रांतील कार्यकर्ते व नेते यांचें लेखन वा वृत्तपत्रांतील चर्चा यांचा विचार येथें करण्याचें कारण नाहीं. तथापि त्या व्यतिरिक्त पक्षनिष्ठ राजकारणाचें विवेचन अत्यंत अल्प प्रमाणांतच झाल्याचें दिसून येतें. श्री. एन्. व्ही. राजकुमार यांचें देशांतील राजकीय पक्षांची माहिती देणारें "इंडियन पोलिटिकल् पार्टीज्" हें पुस्तक किंवा पक्षनिष्ठ राजकारणाची चर्चा करणारें श्री. सी. व्ही. चंद्रशेखरन् यांचें "पोलिटिकल् पार्टीज् वुइथ स्पेशल रेफरन्स टु इंडिया" हें पुस्तक अशा सारखीं एक दोन ठळक उदाहरणेंच या बाबतींत देतां येतील. विशिष्ट राजकीय पक्षाबाबत मात्र थोडेंबहुत लेखन आढळतें. "इतर देशांप्रमाणेंच राजकीय पक्षांची येथेंही वाढ होईल. धर्म व जात यांवर आधारलेले पक्ष हळुहळु मागें पडत जातील, आणि खऱ्याखुऱ्या सामाजिक व आर्थिक प्रश्नांवर आधारलेले पक्ष महत्त्व पावतील" असा श्री. चंद्रशेखरन् यांच्या प्रतिपादनाचा आशय आहे. तात्पर्य विशिष्ट चाकोरी सोडून या बाबतचें विवेचन फारसें झालेलें नाहीं असेंच म्हणावें लागतें. याला अद्यापपावेतों पहिला व एकच महत्त्वाचा अपवाद म्हणजे कै. भाई मानवेंद्रनाथ रॉय यांनीं पुढें मांडलेली नवमानवतावादाची विचारसरणी हाच होय. पक्षनिष्ठ राजकारणाची भूमिका धोक्याची व त्याज्य मानणारें हें एकच व्यापक सामाजिक तत्वज्ञान देशांत मांडलें गेलें आहे. श्री. पै यांनीं प्रस्तुत पुस्तकांत भारतीय राजकीय जीवनाच्या अनुभवाची केलेली छाननी आणि तिच्यांतून काढलेला निष्कर्ष

हा अशा प्रकारच्या सामाजिक क्रांतीच्या नव्या तत्वज्ञानाची आवश्यकता सूचित करणारा आहे. अशा प्रकारें श्री. पै हे प्रस्थापित राजकीय जीवनाचें संस्थात्मक स्वरूप व त्याला आधारभूत म्हणून स्वीकारलीं जाणारीं गृहीतकृत्यें यांच्या मूलगामी विवेचनाकडे वळले ही गोष्ट निःसंशय भूषणावह म्हटली पाहिजे. त्यांच्या अकाली निधनामुळें झालेली हानी यावरून सहज ध्यानांत आल्यावांचून रहाणार नाहीं.

श्री. पै यांचें प्रस्तुत पुस्तकांतील विवेचन सर्वांना पटेल किंवा व्यवहार्य वाटेल असें नाहीं. कांहींना त्यांत अपुरेपणाचा किंवा अतिसुलभतेचाही भास होण्याचा संभव आहे. चाकोरीबाहेरील विचारांच्या बाबतींत सामान्यतः प्रत्ययास येणाऱ्या प्रक्रिया याही बाबतींत आढळल्यास आश्चर्य नाहीं. वास्तविक विचार, भाषण व आचारस्वातंत्र्याचें परस्परावलंबित्व दर्शवितांना त्यांनीं केलेलें विवेचन राजकीय प्रश्नाबाबतची त्यांची सूक्ष्म दृष्टि दर्शविणारें आहे. वरीलपैकीं कोणत्याही एका प्रकारच्या स्वातंत्र्यावर बंधन घातल्यानें इतरांनाही बाध येतो हें त्यांचें म्हणणें एक अत्यंत महत्त्वाचें सत्य म्हणून ध्यानांत बाळगण्यासारखें आहे. अत्यंत महत्त्वाचा विषय सामान्य वाचकाला देखील सहज आकलन होईल अशा प्रकारें अर्थहानी होऊं न देतां मांडणें त्यांना सहज शक्य होत असावेसें दिसतें. उलट प्रतिपादनाची पातळी कायम राहिल्यानें चिकित्सक वाचकालाही त्यांचें प्रतिपादन विचारप्रवण करतें. तात्पर्य, सर्वांच्याच विचारांना चालना देण्याचें कार्य प्रस्तुत पुस्तकाच्या योगानें होईल असा विश्वास बाळगण्यास मुळींच हरकत नाहीं. एकादा मूलभूत विषय हाताळण्याच्या पहिल्याच प्रयत्नांत इतकी सफलता प्राप्त झाल्यास तें निःसंशय अभिनंदनीय म्हणावें लागेल.

परंपरागत राजकीय जीवन आजच्या अणुयुगांत आकारहीन बनत जाणें स्वाभाविक, किंबहुना अपरिहार्य आहे. पक्ष संघटनेवर आधारलेल्या राजकीय जीवनासंबंधीं असा प्रत्यय थोड्या बहुत प्रमाणांत येऊं लागला आहे. डावे–उजवे इत्यादि सारखे भेद अर्थशून्य ठरूं लागले आहेत. पक्ष संघटनांना स्थिर स्वरूप प्राप्त झाल्यामुळें त्या अनिष्ट बनतात असें म्हणणाऱ्या ऑस्ट्रोगॉरस्कीपासून राजकीय पक्षांचा विकास हा त्यांचें लोकशाही राजवटी-

पासून भिन्न व तिला विरोधी असें स्वरूप स्पष्ट करणाराच आहे असें सांगणाऱ्या दुवर्जरपर्यंत पक्षनिष्ठ राजकारणाच्या समीक्षेनें मजल गांठली आहे. श्री. पै यांचें विवेचन या दृष्टीनें काळाचीं पाऊलें ओळखणारें असेंच आहे. राजकीय पक्षांची अनिष्टता सर्वमान्य न होण्याचें एक कारण म्हणून पक्षसंघटनांच्या अभावीं गटबाजीच्या ( Pressure Groups ) राजकारणाची वाढ होईल असें सांग्यांत येतें. तथापि त्याबाबतींत नवमानवतावादानें पुढें मांडलेला संघटित लोकशाहीचा पर्याय आपणा समोर आहेच.

राजकीय पक्ष ही सत्तेचें केंद्रीकरण वाढविणारी आणि पर्यायानें व्यक्तिस्वातंत्र्य संपुष्टांत आणणारी संघटना आहे. तिचें हें स्वरूप ध्यानांत घेऊन तिच्या योगानें निर्णित होणाऱ्या राजकीय जीवनाची अत्यंत काळजीपूर्वक चिकित्सा होणें आवश्यक आहे. श्री. पै यांचें हें पुस्तक मराठी वाचकांच्या दृष्टीनें बोलावयाचें झाल्यास अशा चिकित्सेचा पहिलाच प्रयत्न होय.

रामनारायण रुइया कॉलेज,
माटुंगा, मुंबई १९
ऑगस्ट, २५, १९५६.

**गोवर्धन पारीख**

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम ............ दि: ............
क्रमांक ............ नोंः दिः ............

# थोडें प्रास्ताविक

## लक्षवेधक संधिकाल

आपलें भारत राष्ट्र सन १९५० च्या ता. २६ जानेवारीपासून अंतिम सत्ताधारी, धर्मातीत, प्रजासत्ताक ( किंवा लोकशाही ) संघ-राज्य झालेलें आहे. या नवजात राष्ट्रांतील प्रौढ स्त्रीपुरुष नागरिकांना मतदानाचा, म्हणजे आपले राज्यकर्ते नियुक्त करण्याचा, अधिकार प्राप्त झालेला आहे. त्यांतील पहिल्या सार्वत्रिक निवडणुका नुकत्याच पार पडलेल्या आहेत. पांच वर्षांपूर्वी जेव्हां या राष्ट्राची राज्यघटना बनवली जात होती तेव्हां, राजकीय तत्त्वज्ञानाचा अभ्यास, विचार आणि लेखन-वक्तृत्व करणारे जे भारतीय लोक होते ते खऱ्याखुऱ्या लोकशाहीला कोणत्या प्रकारचे मतदारसंघ, मतदानाची कोणती पद्धति, उमेदवारांची पात्रापात्रता ठरवण्याच्या कसोट्या इत्यादि गोष्टी अधिकांत अधिक उपकारक ठरतील त्याची चर्चा करीतच होते. पण या निवडणुका ताज्या असल्यामुळें सामान्य विचारशक्तीच्या नागरिकांचेंहि लक्ष सध्यां या प्रश्नांकडे खेंचून राहिलेलें आहे. ज्या लोकसभेनें राष्ट्राची राज्य-घटना बनवली ती लोकसभा खऱ्याखुऱ्या अर्थानें लोकनियुक्त किंवा राष्ट्रनियुक्त नव्हती, तर ती पक्षनियुक्त-राष्ट्रसभेनें निवडलेली-होती ; आणि जीं, मध्यवर्ति व राज्यीय सरकारें या पांच वर्षांत अधिकारारूढ होतीं तींहि राष्ट्रसभानियुक्तच होतीं. अर्थात् स्वतंत्र भारतांतील 'पहिलीं लोकनियुक्त सरकारें' असें ज्यांना म्हणतां येईल तीं या निवडणुकांनंतर तीन-चार महिन्यांनीं जीं अधिकारारूढ होतील तींच होत. आपलीं पहिलीं सरकारें अस्तित्वांत येत असल्याच्या या महत्त्वाच्या समयीं, त्यांची घडण किंवा रचना ठरवणाऱ्या ज्या यंत्रणा किंवा निर्बंधावलि आपण स्वीकारल्या त्या आपल्या मुख्य उद्दिष्टास कितपत साधक किंवा बाधक आहेत यासंबंधीं कसून विचार करण्याची बुद्धि विचारी नागरिकांत उत्पन्न होणें जितकें स्वाभाविक आहे तितकेंच तें आवश्यक व समाधानकारकहि आहे, यांत शंका नाहीं. अर्थात् आजचा समय राजकीय तत्त्वज्ञानाच्या, राजकारणाच्या मूलभूत विचारप्रणालींच्या व विशेषतः लोकशाहीशीं अविच्छेद्यपणें अनुस्यूत असलेल्या प्रश्नांच्या ऊहा-पोहास अतिशय अनुकूल असा आहे. हा समय उलटला आणि लोक आपल्या

प्रपंचाच्या दैनंदिन धबडग्यांत गुंतून गेले म्हणजे, पांच वर्षांनीं पुन्हा निवडणुका येईपर्यंत या प्रश्नांचें महत्त्व लक्षांत घेण्यास त्यांना सवड सांपडणें कठीणच ! यासाठीं हा लक्षवेधक संधिकाल एका अतिशय महत्त्वाच्या, मूलभूत स्वरूपाच्या, प्रश्नाची चर्चा करण्याच्या कामीं साधून घेऊं इच्छितों.

## एक महत्तम उपेक्षित प्रश्न

लोकशाहीशीं निगडित असणाऱ्या अनेक प्रश्नांची चर्चा आपल्या राष्ट्राची राज्य-घटना तयार होत असतांना अनेक भारतीय राज्यशास्त्रज्ञांनीं केली होती; आणि आतां निवडणुकांनंतर अनेक सामान्य नागरिकांचें लक्ष त्या प्रश्नांकडे खेंचलेलें आहे हें वर म्हटलेंच आहे ; व या प्रश्नांचा ऊहापोह जगांतील राजकीय तत्त्वज्ञ प्राचीन कालापासून करीत आले आहेत हें तर सांगावयासहि नको आहे. तथापि, या, जवळजवळ सर्वच, लोकांनीं एका मूलभूत प्रश्नाकडे द्यावें तितकें लक्ष दिलेलेंच नाहीं, असें म्हणावयास फारशी हरकत नाहीं. हा दुर्लक्षित मूलभूत प्रश्न म्हणजे " खऱ्याखुऱ्या लोकशाहीला राजकीय पक्ष हे पोषक ठरतील कीं मारक ठरतील " हा होय. पक्षांशिवाय राजकारण किंवा राज्यकारभार चालवतां येणें जणुं काय अशक्यच होय असें गृहीत धरूनच या लोकांनीं सर्व चर्चा केलेली आढळते. या लोकांना खरीखुरी लोकशाही नको असते, असें अर्थातच म्हणतां यावयाचें नाहीं. परंतु, पक्षपद्धतीच्या राजकारणाचें वेड भारतीयांप्रमाणेंच जगांतील बहुतेक सर्वच राज्यशास्त्रज्ञांना इतकें लागलेलें आहे कीं, तें लोकशाहीला घातक ठरेल कीं नाहीं या मूलभूत मुद्याकडे त्यांचें लक्ष जाऊंच शकलें नाहीं. हें विधानहि अगदीं निरपवाद आहे अशांतला भाग नाहीं. एखाद-दुसऱ्या राज्यशास्त्रज्ञानें एतद्विषयक थोडा ऊहापोह केला आहे. पण राजकीय पक्ष केव्हां व कसे उदयास आले त्याचा इतिहास कथन करण्यावरच त्यांनीं विशेष भर दिलेला आहे ; 'पक्ष' ही संस्था धनिक राज्यकर्त्या लोकांनीं उत्पन्न केली; राजकीय पक्षांचा उगम व वाढ हीं पार्लमेंटरी पद्धतीच्या राज्यकारभाराच्या उगमाच्या व वाढीच्या बरोबरीनेंच झालीं, तत्पूर्वीं ग्रीक किंवा रोमनलोकांच्या नागरी लोकशाहींत राजकीय पक्षांचें अस्तित्व आढळत नाहीं, असें त्यांनीं दाखवून दिलें आहे. पण राजकीय पक्ष हे लोक-शाहीला कितपत साधक-बाधक ठरतील याची मूलभूत चर्चा त्यांनीं केलेली नाहीं, पक्षपद्धति हें राजकारणाचें अविच्छेद्य अंग मानावें कीं नाहीं याबद्दल ते साशंक होते तें स्पष्ट दिसतें. पण लोकशाहीला ती पद्धति घातक ठरेलच असा सिद्धांत त्यांच्या

मनांत ठाम झालेला आढळत नाहीं. आणि म्हणून पक्षपद्धतीच्या राजकारणाचा लोकशाहीशीं कसा अहिनकुलवत् संबंध आहे तें दाखवून देण्याच्या प्रश्नाकडे आजवर सर्वांचेंच दुर्लक्ष झालें आहे, असें व्यापक विधान करण्यास फारशी हरकत वाटत नाहीं.

## प्रतिपाद्य विषय व प्रतिकूल परिस्थिति

"पक्षपद्धतीचें राजकारण खऱ्याखुऱ्या लोकशाहीच्या मूळावरच घाव घालणारें आहे" हा सिद्धांत वाचकांच्या गळ्यांत उतरविण्याचा एक जोरदार प्रयत्न मला करावयाचा आहे. अर्थात्, वाचक ज्या मानानें पूर्वग्रहांनीं दूषित झालेले नसतील, प्रचलित विचारांचें दडपण भिरकावून देऊन स्वतंत्रपणें विचार करण्यास समर्थ असतील, त्या मानानेंच तो प्रयत्न यशस्वी व्हावयाचा आहे. पक्षपद्धतीच्या राजकारणानें भारावून, वेडावून गेलेल्या या काळांत तिच्याविरुद्ध एखाद्या सामान्य माणसानें सोटा घेऊन उठणें हें केवळ धाडसाचेंच नव्हे, तर अभिजात मूर्खपणाचेंहि मानलें जाईल; आणि फलतः तें अरण्यरुदनवत् ठरेल याची मला पुरेपूर जाणीव आहे. तथापि,

## 'विचार' हाच जगाचा खरा नियंता

अशी माझी दृढ, अविचल श्रद्धा आहे. "सध्यांचें युग हें परमाणु-स्फोटकाचें आहे, आजचें जग हें आत्मविनाशास प्रवृत्त झालेलें आहे; हातांत सहस्रावधि अजस्र शस्त्रें घेऊन एक राष्ट्र किंवा राष्ट्रगट दुसऱ्याच्या छाताडावर फेंकण्यास सज्ज झालेला आहे; कोण कोणावर आधीं फेंकतो तेवढेंच पहावयाचें आहे; सर्वत्र याच भीतीचें साम्राज्य पसरून राहिलें आहे. जो दिवस उलटून गेला तो खरा; येणारा दिवस कोणती संकटपरंपरा घेऊन येईल तें कोणीच सांगूं शकत नाहीं; अशा समयीं शांतपणें विचार करण्यास फुरसद आहेच कोणाला?" असे उद्गार अनेक लोक काढतांना आढळतात; आणि एका मर्यादित, अतिशय आकुंचित दृष्टीनें पाहतां, त्या उद्गारांत तथ्य असल्याचाहि भास होतो. तथापि जरा खोलांत शिरून विचार केला तर त्यांतील वास्तवार्थ लक्षांत येण्यास उशीर लागत नाहीं. राष्ट्रें एकमेकांवर परमाणु-स्फोटकांचा वर्षाव करूं लागलीं तर मानवजातीचा प्रचंड संहार होईल यांत शंकाच नाहीं. आणि केवळ बाह्यात्कारीं पाहतां हा संहार परमाणुस्फोटकांतील विषारी द्रव्यांनींच घडवून आणला असें आपण म्हणूं यांतहि शंका नाहीं. परंतु आपणांस हा मुद्दा तिळमात्र विसरतां

नसून अप्रत्यक्षतः, पर्यायानें किंवा नियुक्त प्रतिनिधींच्या मार्फतच होत. प्राचीन काळीं, युरोपांतील रोम, ग्रीससारख्या देशांत जेव्हां लोकशाही राज्यपद्धति अस्तित्वांत होती तेव्हां ती छोट्या छोट्या नगरांपुरती मर्यादित होती; आणि म्हणून सर्वच मताधिकारी नागरिक कायदेमंडळांत बसून राज्यकारभाराच्या हरेक बाबतींत आपापलें मत प्रत्यक्षतः व्यक्त करूं शकत असत, असें म्हणतात. पण आज ही गोष्ट कोणत्याहि राष्ट्रांत होऊं शकत नाहीं. कारण आजची लोकशाही नगरांपुरती मर्यादित नसून राष्ट्रव्यापी झालेली आहे; शिवाय प्रत्येक राष्ट्रांतील लोकसंख्याहि पुष्कळच वाढलेली आहे. त्यामुळें मताधिकारी नागरिकांना आपापल्या मतदार-संघांतर्फेचे प्रतिनिधि निवडून देऊन राज्यकारभारांत अप्रत्यक्षतः भाग घ्यावा लागत असतो. यावरून जिला आपण 'लोकशाही' असें संबोधतों ती कांटेकोर अर्थानें 'मतदारशाही' असते व तीहि अप्रत्यक्ष किंवा पर्यायी असते, हें सहज कळून येतें.

## लोकशाहीचे चार घटक व मूलाधार

आधुनिक जगांतील एकंदर लोकशाही राष्ट्रांतल्या राज्यपद्धतींचें, एका विशिष्ट दृष्टीनें, निरीक्षण केलें तर त्यांचें स्थूल स्वरूपाचे दोन वर्ग पाडतां येतात. एक, महामंत्रिप्रधान लोकशाहींचा व दुसरा राष्ट्रपतिप्रधान लोकशाहींचा. आपलें भारत राष्ट्र व इंग्लंड यांच्या राज्यपद्धति महामंत्रिप्रधान असून, अमेरिकेंतील संयुक्त संस्थानें किंवा 'युनायटेड स्टेट्स ऑफ अमेरिका' या राष्ट्राची राज्यपद्धति हें राष्ट्र-पतिप्रधान लोकशाहीचें उत्तम उदाहरण आहे. पहिल्यांत राज्यकारभाराच्या हरेक बाबींचा मुख्य प्रेरक व चालक राष्ट्राचा महामंत्रि असतो, तर दुसऱ्यांत तें स्थान राष्ट्रपतीकडे सोंपवलेलें असतें. यांपैकीं कोणतीहि पद्धति घेतली तरी तींत राज्य-कारभार हांकण्याच्या यंत्रणेचे मुख्य घटक चार असतात, असें आढळून येतें. हे चार घटक म्हणजे ( १ ) राजा किंवा राष्ट्रपति ( २ ) मंत्रिमंडळ किंवा सचिवसमूह, ( ३ ) एकशाखी अगर द्विशाखी विधिमंडळ अथवा प्रतिनिधिमंडळ आणि ( ४ ) मताधिकारी नागरिक, हे होत. अमेरिकेंतील संयुक्त संस्थानां-सारख्या कांहीं राष्ट्रांत राष्ट्रपती अगर राष्ट्राध्यक्ष हा सर्व मतदारांनीं प्रत्यक्ष मतदानपद्धतीनें निवडलेला असतो, तर आपल्या भारतांत तो अप्रत्यक्ष पद्धतीनें, म्हणजे मध्यवर्ति व राज्यविधिमंडळें यांतील सभासदांकडून नियुक्त केला जातो. इंग्लंडसारख्या कांहीं राष्ट्रांत राष्ट्रपती हा निवडलेला नसतो तर वंशपरंपरागत 'राजा' असतो; तरी तेथील राज्यपद्धति लोकशाहीचीच असते.

कारण या एका घटकाशिवाय लोकशाहीचीं बाकी सर्व लक्षणें तिच्यांत हमखास सांपडतात. राष्ट्राच्या महामंत्र्याची किंवा मुख्य प्रधानाची निवड राजा किंवा राष्ट्रपतीकडून केली जाते; तर मंत्रिमंडळाची निवड महामंत्रि करीत असतो. तथापि, राष्ट्रपतीनें ज्याची महामंत्रि म्हणून निवड करावयाची असते तो, प्रतिनिधिमंडळांत ज्या राजकीय पक्षाचें अधिकतम बहुमत असेल त्या पक्षानें आपल्या नेतेपदाची माळ ज्याच्या गळ्यांत घातलेली असते त्याचीच होय, ही एक गोष्ट, आणि मंत्रिमंडळ आपल्या अधिकारपदावर राहूं शकतें तें, त्याच्यावर प्रतिनिधिमंडळाचा जोंपर्यंत विश्वास असेल, म्हणजे जोंपर्यंत प्रतिनिधिमंडळानें मंत्रिमंडळावर अविश्वासाचा ठराव पास केला नसेल तोंपर्यंतच होय, ही दुसरी गोष्ट नीट लक्षांत वागवली म्हणजे मंत्रिमंडळावर खरेंखुरें, अंतिम नियंत्रण असतें तें प्रतिनिधिमंडळाचेंच होय, हें मान्य करावेंच लागतें; मग महामंत्र्याची नियुक्ति आधीं त्याच्या पक्षानें व नंतर राष्ट्रपतीनें का केलेली असेना! पण हें प्रतिनिधिमंडळ कोणीं निवडलेलें असतें? तर मताधिकारी नागरिकांनीं. अर्थात् राज्यकारभाराच्या यंत्रणेचा पुढील सर्व डोलारा या मतदारांवरच उभारला जात असतो, असें सहज दिसून येतें; आणि म्हणून "लोकशाही राष्ट्रांतील राज्यकारभाराचा मूलाधार कोण," असा प्रश्न केला, तर "मताधिकारी नागरिक" हेंच उत्तर देणें प्राप्त ठरतें.

## 'मत' म्हणजे काय

लोकशाही राज्यकारभाराचा मूलाधार 'मत' दारच होय, हें याप्रमाणें निश्चित झाल्यावर 'मत' म्हणजे काय याचा विचार करणें क्रमप्राप्त आहे. कोणत्याहि राष्ट्राच्या राज्यघटनेंत किंवा तेथील कायदेकानूंत या शब्दाची व्याख्या केलेली आढळत नाहीं. तथापि, तात्त्विक राज्यशास्त्रांत ती केल्याशिवाय मुळींच चालत नाहीं; इतकेंच काय, तर या व्याख्येवरच लोकशाही राज्यपद्धतीच्या साऱ्या तत्त्वज्ञानाची उभारणी झालेली असते, किंवा करावी लागते, असें म्हणण्यासहि प्रत्यवाय नाहीं. 'मत' म्हणजे मंथन करून काढलेला निष्कर्ष, असा धात्वर्थ आहे. 'कोणत्याहि विषयाचा साधक-बाधक विचार करून स्वतःच्या आचारासाठीं ठरवलेला निर्णय,' असाहि त्याचा थोडासा विशद अर्थ करतां येईल. पण राज्यशास्त्रांत इतक्या विशदीकरणानें भागणारें नसतें.. कोणत्याहि राष्ट्रांत अप्रौढ, वेडे व गुन्हेगार किंवा सिद्धापराधी यांना मताधिकार नाकारलेला असतो. कारण पहिल्या दोघांना विचारमंथन करतां येत नसतें किंवा "मत"

बनवण्यास ते असमर्थ असतात; आणि दुसरे तें बनवण्यास समर्थ असले तरी तें विकृत, दुःप्रवृत्त किंवा अहितकर असल्यानें इतरांना अग्राह्य होय, असें राजकीय दृष्ट्या गृहीत धरलेलें असतें. त्याचप्रमाणें मतदारांना लांचलुचपत देऊन, धाकदपटशा दाखवून, भय–भीड घालून विशिष्ट उमेद्वाराला मत देण्यास भाग पाडणें हें दंडनीय किंवा शिक्षार्ह होय, असें सर्वत्र राष्ट्रांत मानलें जातें. या गोष्टी नीट ध्यानांत आणल्या म्हणजे, ' मता ' ची व्याख्या करणें आपणास सुलभ होतें. पण त्यासाठीं ज्यांचा विचार करावयाचा ते ' विषय ' कोणते, व ज्याचा आचार करावयाचा तो ' आचार ' कोणता, या दोन प्रश्नांचीं उत्तरें शोधावीं लागतात. कांहीं विषय असे असतात कीं, ज्यांचा विचार केला तरी आचारासाठीं एखादा निर्णय ठरविणें प्राप्त असतेंच, अशांतला भाग नसतो. उदाहरणार्थ, झाड आधीं कीं बीं आधीं, पशु–पक्ष्यांना ' आत्मा ' असतो कीं नाहीं, मनुष्य स्वभावतः किंवा जन्मतः सत्प्रवृत्त, असतो कीं दुष्प्रवृत्त, इत्यादींसारखे शेंकडों विषय असे आहेत कीं, ज्यांचा आपण पुष्कळ विचार केला व कोणताहि निर्णय घेतला तरी तो आचारांत आणण्याचा प्रश्नच उत्पन्न होत नाहीं. पण राजकीय दृष्ट्या ज्यांचा विचार करावयाचा असतो ते विषय अशांपैकीं नव्हत. तर, राष्ट्रासमोर आज कोणकोणते प्रश्न आहेत, ते सर्वलोकहितकारकपणें सोडवण्याचे उपाय किंवा मार्ग कोणकोणते आहेत, हे उपाय कोणत्या क्रमानें अंमलांत आणणें शक्य व इष्ट आहे, त्यासाठीं जनतेनें व सरकारनें कसें वागलें पाहिजे, अशा स्वरूपाचे ते विषय होत. तथापि, अशा विषयांचा भरपूर विचार केला व तर्कशुद्ध निष्कर्षहि काढले, पण स्वतः मात्र तदनुसार वागणार नाहीं असें म्हटलें तर तें चालणारें नसतें ; तर त्या निष्कर्षानुसारच आपण आपला आचार ठेवीन, असा निर्धार प्रत्येक नागरिकानें करावयाचा असतो. आणि अशा निष्कर्षानुसार जो ' आचार ' करावयाचा तो व्यक्त स्वरूपांत दाखवणारें एकमेव – निदान सारभूत किंवा सर्वप्रमुख – प्रतिक म्हणजे निवडलेला प्रतिनिधि हेंच असतें. म्हणजे असें कीं, मतधारकांनीं ज्यांचा विचार करावयाचा ते विषय म्हणजे देशासमोरील तत्तत्कालीन समस्या आणि जो आचार करावयाचा तो म्हणजे योग्य प्रतिनिधीची नियुक्ति. मतधारकांच्या सर्व विचारमंथनाची व निष्कर्षांची साकार झालेली वागणूक ( किंवा आचार ) म्हणजे त्यांनीं निवडलेली किंवा पूजिलेली प्रतिनिधीची मूर्ति हीच होय. विचारमंथनजन्य निष्कर्षानुसार आचार ठेवण्याचे अन्य मार्ग असले तरी ते राजकारण दृष्ट्या प्रत्यक्षांत पटवणारा मार्ग म्हणजे हा प्रतिनिधीच

होय. हें सर्व विवेचन लक्षांत आणलें तर, "राष्ट्रासमोरील समस्यांचा स्वतंत्र बुद्धीनें विचार करून आपला प्रतिनिधि म्हणून कोणास निवडावें त्यासंबंधीं घेतलेला निर्णय म्हणजे "**मत**" अशी त्याची व्याख्या आपणांस करतां येते. पण आणखी एक मुद्दा लक्षांत घेतला नाहीं तर तीहि अपुरी किंवा अव्याप्तच भासूं लागते. तेव्हां आधीं तो मुद्दा लक्षांत घेऊं व मग व्याख्या पुरी करूं.

## मत कोणाला ? उमेदवारव्यक्तीला, पक्षाला कीं सहविचाराला ?

याप्रमाणें, मतधारकांच्या सर्व विचारमंथनाचें अंतिम व संकलित फल म्हणजे तन्नियुक्त प्रतिनिधि हें ठरल्यावर, "प्रतिनिधि" म्हणून कोणास निवडावयाचें, म्हणजेच मत कोणाला द्यावयाचें, उमेदवार म्हणून उभा असणाऱ्या इसमाला, पक्षाला कीं विचारानें समानशील असणाऱ्याला, हा प्रश्न ओघानेंच पुढें येतो. आणि लोकशाहीच्या यथार्थ आकलनासाठीं त्याचें उत्तर शोधणें क्रमप्राप्त ठरतें. मतदार जें मतदान करीत असतात तें बाह्यतः, त्यांच्या मतदारसंघातर्फे उभे असलेल्या उमेदवारांपैकीं कोणातरी एकाच्या नांवानेंच असतें ; म्हणजे व्यवहारतः मत हें कोणातरी उमेदवारव्यक्तीलाच दिलेलें असतें, हें सर्वपरिचितच आहे. पण अंतस्थतः किंवा वस्तुतः तें व्यक्तीलाच दिलेलें असतें काय ? मुळींच नाहीं. तर, उमेदवारांपैकीं जो कोण देशासमोरील प्रश्नांचें यथार्थ आकलन केलेला, त्यांची चर्चा विधिमंडळांत चालली असतां तींत निरलसपणें भाग घेऊं शकणारा आणि त्यांचा निर्णय घेतांना स्वतःचें मत निर्भय व निःस्वार्थ वृत्तीनें देण्यास समर्थ असणारा असा वाटत असेल त्यालाच तें दिलेलें असतें. परंतु, उमेदवार बौद्धिक व नैतिक दृष्ट्या सत्पात्र असूनहि भागत नाहीं. समजा कीं, एखादा उमेदवार बुद्धिमान्, शीलसंपन्न व कर्तबगारहि आहे ; पण देशासमोरील समस्या सोडवण्या-संबंधींचे मतदारांचे विचार व मार्ग त्या उमेदवाराहून अगदीं भिन्न किंवा विरोधी आहेत ; तर मतदार त्याला आपलें मत देतील काय ? नाहीं, हें अगदीं उघड आहे. यावरून असा स्पष्ट निर्णय निघतो कीं, मत हें केवळ व्यक्तीला, तिच्या बुद्धीला, शीलाला किंवा कर्तृत्वशक्तीलाहि दिलेलें नसतें ; तर या गुणांनीं युक्त असणाऱ्या सहविचारी उमेदवारालाच होय. जो उमेदवार निवडून आला असतां मतदारांचें यथार्थ प्रतिनिधित्व करूं शकेल तो, त्यांच्या विचारसरणीचें, आकांक्षांचें, हितरक्षणबुद्धीचें प्रतिबिंबच असणें योग्य असतें असें, लोकशाहींत गृहीतच धरलेलें असतें. जेथें पक्षपद्धतीचें राजकारण चालू

असतें तेथें अनेक मतदारांना हें गृहीत कृत्य लाथाडून देणें प्राप्त असतें ! कारण जे मतदार कोणत्यातरी एका पक्षाचे सभासद असतात ते मतदान करतांना उमेदवार सद्विचारी, बुद्धिमान्, शीलवान् आहे कीं नाहीं याचा विचार करूं शकतातच, असा निर्वाळा देतां येत नाहीं ; तर जो उमेदवार पक्षानें नियुक्त केलेला असेल तो कसाहि असला तरी त्यालाच मत देणें त्यांना भाग असतें. आतां ही गोष्ट खरी कीं, 'पक्ष' म्हटला म्हणजे तो सामान्यतः सद्विचारी व समानशील व्यक्तींचाच बनलेला असतो, व जे उमेदवार तो उभे करतो तेहि त्यांतल्या त्यांत सत्पात्र असेच असतात. पण खुद्द पक्षांतहि अंतर्गत मतभेद हे असतातच ; उमेदवारहि लायकीपेक्षां निवडून येण्यास समर्थ असणारेच नियुक्त केले जातात ; अर्थात्, पक्षसभासदांनाहि सर्वच उमेदवार एकमतानें पसंत असतात, असें मानतां येत नाहीं. यावरून पक्षपद्धतीच्या राजकारणांत सर्वच मतधारकांचें मत स्वतंत्रपणें बनवलेलें व अनिर्बंधपणें दिलेलें असतें असें म्हणतां येत नाहीं, हें उघड दिसून येतें. अर्थात् मत हें सद्विचारी, समानशील, जनहिततत्पर अशाच उमेदवाराला द्यावयाचें असतें हें जें लोकशाहींतील एक गृहीत कृत्य तें पक्षीय राजकारणांत संपूर्णपणें पाळलें जाणें फार कठीण होऊन बसतें हें मान्य करणें प्राप्त असतें.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ........ वि: ........
क्रमांक ........ नों. दि. ........

# लोकशाहीचीं प्राणभूत पंचतत्त्वें

## ‘ मता ’ची व्याख्या

राष्ट्रपती किंवा घटनाप्रमुख, मंत्रिमंडळ, प्रतिनिधिसभा व मतदार हे लोकशाही राज्यकारभाराचे चार घटक असून, त्या सर्वांचा मूलाधार ‘ मतदार ’ च होय हें आपण मागें पाहिलें. त्याचप्रमाणें ‘ मत ’ म्हणजे काय त्याची एक अव्याप्त व्याख्या करून ती पुरी करण्यासाठीं, ‘ मत ’ हें सहविचारी उमेदवारालाच द्यावयाचें असतें, हेंहि निश्चित केलें. आतां, “ मत–म्हणजे राष्ट्रासमोरील समस्यांचा स्वतंत्र बुद्धीनें विचार करून त्या आपल्याच मार्गानुसार सोडवण्यासाठीं सहविचारी किंवा समानशील प्रतिनिधि निवडण्याचा, अनिर्बंध वापरतां येणारा, अधिकार ” असें म्हणून ती पुरी करतां येईल. आणि ही व्याख्या लक्षांत आणल्यावर, एखाद्या राष्ट्रांत खरीखुरी लोकशाही अस्तित्वांत येण्यासाठीं तिचा मूलाधार जो मतदारवर्ग त्याच्यांत कोणकोणती गुणवत्ता किंवा पात्रता असणें अपरिहार्य असतें त्याची तपशीलवार चर्चा करतां येईल. हा तपशील नीट ध्यानांत आणल्याशिवाय आपला मुख्य प्रतिपाद्य विषय जो, ‘ पक्षपद्धतीचें राजकारण लोकशाहीला घातक असतें ” हें सिद्ध करण्याचा, तो पटून येणें सुलभ होणार नाहीं. ( १ ) प्रत्येक मतदार हा ‘ मत ’ बनवण्यास पात्र झालेला असणें, ( २ ) त्याचें प्रतिनिधित्व करण्यास अनुरूप उमेदवार उभे राहिलेले असणें व त्यांचा परिचय मतदारांना होऊन चुकणें; ( ३ ) हवें त्याला मत देण्याचें संपूर्ण स्वातंत्र्य मिळालेलें असणें ; ( ४ ) मतदान–केंद्रावर जाण्याइतकी शारीरिक व आर्थिक शक्ति त्यांच्यांत असणें किंवा मतदान–केंद्रें मतदार–वर्गाला अतिसुगम असणें आणि ( ५ ) प्रथम ‘ मतदार ’ म्हणून नांव नोंदवून घेण्याची व नंतर मतदानाचा हक्क किंवा कर्तव्य समयशीलपणें बजावण्याची दक्षता त्यांनीं बाळगणें, हे पांच गुण मतदारवर्गामध्यें प्रादुर्भूत झाले तरच खरीखुरी लोकशाही अस्तित्वांत येणें शक्य आहे. हे गुण इतके महत्त्वाचे आहेत कीं, त्यांना “ लोकशाहीचीं प्राणभूत पंचतत्त्वें ” असेंहि संबोधण्यास हरकत नाहीं !

## ( १ ) मतपात्रता व शिक्षण

निवडणुकांच्या समयास राष्ट्रासमोर ज्या समस्या असतात त्यांचें यथार्थ स्वरूप काय आहे, त्या सोडवण्यासाठीं सरकारनें व नागरिकांनीं कसकसें वागलें पाहिजे, कोणत्या अनुक्रमानें त्या सोडवणें इष्ट, अवश्य व शक्य आहे इत्यादींचा विचार करून स्वतःचें स्वतंत्र मत बनवण्याची पात्रता मतदारांमध्यें असण्यासाठीं त्यांना जितकें अधिक शिक्षण मिळालेलें असेल तितकें तें अधिक उपकारक ठरणारें असेल हें उघड आहे. आणि शिक्षणाची पहिली पायरी म्हणजे साक्षरता असल्यानें तिचा प्रसार जितका जास्त असेल तितका इष्ट ठरेल हेंहि साहजिक आहे. पण या कामीं नुसती साक्षरता पुरी पडेल असें मात्र म्हणतां यावयाचें नाहीं. त्याचप्रमाणें नुसतें पदव्यादायक शिक्षण पुरें पडेल अशी ग्वाहीदेखील देतां यावयाची नाहीं ; तर मतदारांचें विचारसामर्थ्य व विवेकशालित्व हीं विकसित झालेलीं असावीं लागतील. कारण, नुसता साक्षर व बडा सुशिक्षित यांच्यामध्यें जितका फरक आहे, तितकाच सुशिक्षित व सुविवेकी यांच्यांतहि आहे. मतदारांना राजकीय दृष्ट्या जें शिक्षण अपेक्षित असतें तें केवळ लेखनवाचनापुरतें जसें नसतें, तसेंच निरनिराळ्या शास्त्रांत पारंगत असण्याचेंहि नसतें; तर, सुविचार व सुविवेक करतां येण्याचें व तदनुसार वागण्याची धमक त्यांच्यामध्यें असण्याचें असतें, हें येथें नीट लक्षांत ठेवलें पाहिजे. तरीदेखील निरक्षरांपेक्षां साक्षर आणि केवळ साक्षरांपेक्षां सुशिक्षित लोक हे ' मत ' बनवण्यास अधिक पात्र असतील असें मानणेंच योग्य ठरेल.

## निरक्षर प्रौढांनाहि मताधिकार कां ?

पण, मतदारांना मतपात्रता असणें जितकें आवश्यक तितकेंच ज्याला आपला प्रतिनिधि म्हणून निवडावयाचें त्या उमेदवाराचीं मतें चांगलीं समजून घेण्याची पात्रताहि असणें आवश्यक असतें. परंतु जे स्वतःचेंच मत बनवण्यास पात्र कीं अपात्र याबद्दल संशय आहे ते दुसऱ्याचीं मतें समजून घेण्यास समर्थ आहेत, हें कसें मान्य करावयाचें ? मग, प्रौढ निरक्षरांनाहि जो मताधिकार, आपल्या भारतासारख्या व अन्य कित्येक राष्ट्रांत दिलेला असतो त्याचें कारण काय, असा प्रश्न सहजच पुढें येतो. याचें उत्तर असें कीं, स्वतःचीं मतें बनवतां येत नसलीं आणि उमेदवाराचीं मतें आपल्या मताशीं कितपत जुळणारीं आहेत तेंहि जाणून घेता येत नसलें तरी आपला हितकर्ता व त्राता कोण हें ओळखण्याची बुद्धि

मनुष्यमात्रामध्यें उपजतच असते, असें या बाबतींत गृहीत धरलेलें असतें. लोकहितकर्ता कोण आहे तें ओळखण्याची बुद्धि व त्यालाच आपला प्रतिनिधि निवडण्याची निस्पृहता शिक्षितांमध्यें तेवढी असते; अशिक्षितांमध्यें ती असूंच शकत नाहीं असें मानतां येत नाहीं. पुष्कळ वेळां निरक्षर मतदार सत्पात्र प्रतिनिधि निवडूं शकतो व अतिशिक्षित मतदारहि चुकूं शकतो, हें खोटें नव्हे. इतकेंच काय, रागानें, लोभानें किंवा भयानें भलत्याच उमेदवाराला मत देण्याची चूक जाणून-बुजून करावी असें म्हटलेंच तर ती निरक्षराहून अधिक सफाईदारपणें सुशिक्षितच करूं शकतो हेंहि खरेंच नव्हे काय? मत देतांना, उमेदवाराच्या सर्व जनहितकर्तृत्वापेक्षां त्याच्यापासून स्वतःचें हित कितपत साधून घेतां येईल त्याच्याकडेच आधीं व अधिक लक्ष द्यावें असें ठरवलें तर सुशिक्षितच तें निरक्षरापेक्षां अधिक देऊं शकेल हें अगदीं उघड आहे, आणि म्हणून मतदानाचा अधिकार देतांना शिक्षित-अशिक्षित हा भेद लक्षांत घेण्याचें फारसें कारण नाहीं असें येथें गृहीत धरलेलें असतें, असें मान्य करणें भाग पडतें.

## (२) उमेदवार व मतदारसंघ

प्रौढ निरक्षरांनाहि मताधिकार देतांना, त्यांच्यामध्यें असणाऱ्या बौद्धिक लायकीपेक्षां लोकहितकर्ता प्रतिनिधि ओळखण्याच्या उपजतबुद्धीवर आणि त्यालाच आपलीं मतें देण्याच्या नैतिक लायकीवर अधिक भर दिलेला असतो हें एकदां मान्य केलें म्हणजे मतदारसंघांची रचना कशी असावी त्याचें मुख्य तत्त्व आपणांस सहज निश्चित करतां येतें व तें हेंच कीं, जेणेंकरून मतदारांना उमेदवारांचा परिचय जास्तींत जास्त सुलभतेनें व प्रत्यक्ष अनुभवानें होऊं शकेल अशीच ती असावी. उभे असलेल्या उमेदवारांपैकीं कोणत्या उमेदवाराचीं मतें स्वतःच्या मताशीं अधिकांत अधिक जुळतीं आहेत, त्यांच्या बुद्धिमत्तेंत व शीलवत्तेंत कोणते फरक आहेत, राष्ट्राच्या सर्वसामान्य हितसंबंधांशीं जुळतें घेऊन स्वतःच्या मतदारसंघाच्या हितसंबंधांचें रक्षण जास्तींत जास्त प्रमाणांत कोणता उमेदवार स्वार्थनिरपेक्षपणें सांभाळण्याची दक्षता बाळगूं शकेल, त्याचे पुरावे आपल्या पूर्वायुष्यांत त्यांनीं कसकसे दिले आहेत, इत्यादि गोष्टींचें यथार्थ ज्ञान मतदारांस होणें अपरिहार्य असतें. या एका ज्ञानाच्या अभावीं इतर चारहि प्राणभूत तत्त्वें अस्तित्वांत असूनहि लोकशाही संतुष्ट होऊं शकणार नाहीं, ही गोष्ट अगदीं उघड आहे. माणसाच्या बुद्धीचा किरण शीलाच्यापेक्षां अधिक दूरवर फांकणारा असतो, तर शीलाचा किरण आंखूड

असला तरी अधिक तीक्ष्ण असतो. म्हणून बुद्धीचें तेज जितकें विस्तृत पसरूं शकतें तितकें शीलाचें शकत नसतें; तें जवळपासच्या लोकांनाच अधिक प्रमाणांत व अधिक लवकर प्रत्ययास येऊं शकतें. दूरवरच्या लोकांस तें प्रतीत व्हावयास उशीर लागतो; शिवाय तें तसेंच प्रखर असलें तरच प्रतीत होत असतें. बुद्धिमान् माणूस प्रसिद्धीस लवकर येतो; शीलवानांच्या वांट्यास तितकी प्रसिद्धि येतेच असें सांगतां येत नाहीं. पण विधिमंडळांत जनतेचें प्रतिनिधित्व करणाऱ्याच्या, म्हणजेच स्वार्थनिरपेक्षपणें जनहिताचें संरक्षण करण्यास जपणाऱ्याच्या, अंगांत बुद्धि व तज्जन्य प्रसिद्धि हिच्यापेक्षां शीलसंपन्नतेची आवश्यकताच अधिक असते. बुद्धिमान् माणूस लेखक किंवा वक्ता, अगर दोन्ही असला तर त्याच्या प्रसिद्धीचा पसारा पुसूंच नका! पण प्रसिद्ध पुरुष म्हणजे सज्जन किंवा जनहित-कर्ता असें समीकरण नेहमींच बसवतां येतें असें मानतां येत नाहीं. पण उमेदवाराच्या जनहितकर्तृत्वाचा प्रत्यय जवळपासच्या लोकांस, म्हणजे ज्या ठिकाणीं उमेदवाराचें सार्वजनिक जीवनकार्य दीर्घकाल झालेलें असतें तेथेंच, अधिक प्रमाणांत व अधिक लवकर आलेला असतो. ज्यांना हें विवेचन मान्य असेल त्यांना राष्ट्रांतील कोणत्याहि मतदाराला कोणत्याहि मतदारसंघातर्फे उभें राहण्याची मुभा ठेवणें हें लोकशाहीच्या दुसऱ्या प्राणभूत मूलतत्त्वावर घाव घालणारें आहे, असें वाटणें साहजिक आहे. आपल्या भारतांत, हिमालयांतील उमेदवार-याचकाला कन्याकुमारींतील आणि द्वारकेच्या याचकाला जगन्नाथपुरींतील मतदार-यजमानापाशीं मतांची भिक्षा मागण्याची जी सवलत देण्यांत आली आहे तीहि, अर्थातच, याच वर्गांतली आहे. सारा भारत हें एकात्मराष्ट्र आहे ही भावना सर्वच भारतवासीयांमध्यें उत्पन्न किंवा प्रतीत व्हावी या हेतूनें ही सवलत ठेवण्यांत आली आहे, असें तिच्या समर्थनार्थ सांगण्यांत येतें; पण हा हेतु कितपत सिद्धीस जातो त्याबद्दल फार मोठा संशय असून निःसंशय होणारी गोष्ट म्हणजे शील दृष्ट्या अपरिचित किंवा अल्पपरिचित उमेदवाराला मत देण्याची आपत्ति मतदारांवर ओढवते हीच होय. ज्याची बुद्धि, शील, तळमळ व जनहितकर्तृत्व हीं सर्व राष्ट्रभर सुपरिचित होऊन चुकलीं आहेत अशा व्यक्ति कोणत्याहि राष्ट्रांत केव्हांहि असूंच शकणार नाहींत, असें सर्वव्यापी विधान अर्थातच करतां येणार नाहीं. तथापि, अशा अपवादभूत व्यक्तींसाठीं सार्वत्रिक नियम करण्याची गरज नाहीं. शिवाय, अशा अपवादभूत व्यक्तीला लोकहित साधण्यासाठीं विधिमंडळांत किंवा मंत्रि-

मंडळांतच गेलें पाहिजे, असें थोडेंच आहे ! अशा व्यक्ति बाहेर राहूनही आपलें कार्य करूं शकतील ; शिवाय शासनसंस्थेवर नैतिक दाब ठेवून तिच्याकडूनहि तें करवूं शकतील, हें स्पष्ट आहे. यासाठीं, उमेदवार ज्या त्या मतदारसंघाच्या क्षेत्रमर्यादेंत निवडणुकीच्या दिवसांपूर्वी अमुक इतके महिने किंवा वर्षें वास्तव्य करणाराच असला पाहिजे, असा जो नियम अनेक राष्ट्रांत आहे, तोच लोकशाहीच्या तत्त्वांना अधिक धरून आहे, असें मानणें प्राप्त आहे. तेव्हां, लोकशाहीच्या अस्तित्वासाठीं, बुद्धिमान्, चारित्र्यसंपन्न, लोकहिततत्पर, असे उमेदवार निवडणुकीसाठीं उभे राहिलेले असले पाहिजेत हें तर झालेंच, पण मतदारांना त्यांची ही पात्रता कळून येणें सुलभतम व्हावें आणि ज्याला त्याला अनुरूप म्हणजे सहविचारी व समानशील उमेदवाराची निवड करतां यावी अशीच रचना मतदारसंघाची असली पाहिजे, हें उघड आहे.

## ( ३ ) मतदानाचें स्वातंत्र्य

मतदार 'मत' बनवण्याला पात्र झाले आणि त्यांना अनुरूप वाटणारे उमेदवार उभे राहिले तरी हव्या त्याच उमेदवाराला ते आपलीं मतें देऊं शकतील असा भरंवसा धरतां येत नाहीं. बहुतेक सारेच मतदार प्रापंचिक असतात. कोणाशीं त्यांचे आर्थिक हितसंबंध गुंतलेले असतात, तर कोणाशीं ते रक्तबंधानें जडलेले असतात. वैद्य, वकील, धनको, वाणी, मालक, सेवक, शत्रु, मित्र, स्वतःचा किंवा आपल्या मुलांचा शिक्षक, उपकारकर्ता वगैरे अनेक लोकांशीं त्यांचे अतुट संबंध आलेले किंवा यावयाचे असतात. त्याचप्रमाणें अनेक मतदार कोणत्याना कोणत्या पक्षाचे सभासद किंवा चहातेहि असतात. स्वतः मतदारानें पसंत केलेला उमेदवार आणि त्याच्याशीं प्रेमसंबंध असणाऱ्या मातबर मित्रांनीं किंवा पक्षनेत्यांनीं पसंत केलेला उमेदवार योगायोगानें एकच निघाला तर त्याचें नशीब मोठें शिकंदरच समजावयाचें ! पण असें घडणें क्वचितच संभवनीय असतें. त्यामुळें जो तो आपापल्या पसंतीच्या उमेदवाराला मतें देण्याबद्दल मतदारांवर दडपण आणूं पाहत असतो. कोणी त्यांना भीड घालतात, कोणी भीति दाखवतात ; कोणी आमिषें लावतात तर कोणी त्याच्यावर अत्याचारहि करतात. ऐन मतदानाच्या वेळीं विरोधी मतदारांना पळवून नेऊन डांबून ठेवणारे लोक निपजल्याचींहि उदाहरणें अनेक राष्ट्रांच्या निवडणुकीच्या इतिहासांत सांपडलेलीं आहेत ! अशा परिस्थितींत बिचारे मत-

दार कावून जातात, त्यांची मति सुन्न होते, इकडे आड तिकडे विहीर अशा पेंचांत ते सांपडतात, आणि "कशाला झालों मतदार" असे उद्गार काढण्याचेंहि अनेकांच्या नशिबीं येत असतें. या सर्व कटकटींतून मुक्त होण्यासाठीं बरेचसे मतदार एक तर मतदानापासून मुळांतच परावृत्त होतात किंवा ज्याचा जोर किंवा आग्रह बलवत्तर त्याच्या सांगण्यानुसार कोणातरी उमेदवाराला – जो त्याला मनापासून तिरस्करणीय वाटतो त्याला देखील–मतें देऊन चालूं लागतात !

एखाद्या पक्षाचा सभासद असणाऱ्या मतदाराची स्थिति तर याहूनहि अधिक कींव करण्यासारखी होऊं शकते. पक्षरहित मतदाराला इतरांशीं वादविवाद किंवा घासाघीस तरी करतां येते; पक्षसभासद मतदाराला तितकीहि सवलत सांपडत नाहीं. पक्षश्रेष्ठी ज्याच्याकडे अंगुलिनिर्देश करतील त्यांना बिनबोभाट – बिनतक्रार मत देऊन चालतें व्हावें हीच त्याची सुटका असते. ना विचार, ना उच्चार; ना आवड ना निवड ! बुद्धि असून फुकट, स्वपसंतीच्या उमेदवारावर असलेली श्रद्धा व्यर्थ ! कारण त्यांचा वापर केला तर शिस्तीच्या बडग्यानें पक्षबाह्य होऊन सुखी प्रपंचाला मुकण्याचीहि भीति !

निवडणुकीच्या आखाड्यांमध्यें उतरणाऱ्या पक्षांमध्यें सर्वसमर्थ पक्ष म्हणजे अर्थातच सत्ताधारी. या पक्षाचे सभासद असणारे मतदार म्हणजे तर शुद्ध बकरीं किंवा बळी. पक्षश्रेष्ठींनीं हुकूम सोडावे आणि सभासद-मतदारांनीं त्यांची सहीसही तामिली करावी एवढेंच त्यांचें इतिकर्तव्य !

'मत' म्हणजे मंथन करून काढलेला निष्कर्ष हें तर खरेंच. पण हें मत कोणाचें ? तर स्वतंत्र आत्म्याचें. मतदाराच्या जीवात्म्यावर प्रत्यक्ष परमात्म्याचेंहि दडपण पडलें तर त्याचें मत दूषित होऊं शकतें. म्हणजे असें कीं, मतदाराच्या मनावर देव, धर्म, विभूति, पूर्वग्रह इत्यादींचेंहि दडपण पडतां कामा नये. जे लोक विभूतिवत् किंवा थोर मानले जातात ते सारे खरोखरच तसे असतात असें नव्हे ; जे थोर असतात ते सर्वज्ञ असतात असेंहि नव्हे, आणि जे सर्वज्ञ असतात ते सर्वच सज्जनपणाचीं कृत्यें करतात असें तर मुळींच नव्हे. तेव्हां उमेदवाराच्या किंवा त्याची शिफारस करणाऱ्याच्या विभूतिमत्वाला भाळण्यांतहि अर्थ नसतो. तर, मतदार हा संपूर्णपणें बुद्धिप्रामाण्यवादी असला पाहिजे व कोणाच्याहि कसल्याहि दडपणाशिवाय, अनिर्बंधपणें मतदान करण्याचें नैतिक सामर्थ्य त्याच्या अंगांत असलें पाहिजे. त्याचें हें बुद्धिप्रामाण्य व नीतिसामर्थ्य यांना जो कोण

यत्किंचितहि बाधा आणूं पाहील तो लोकशाहीचा शत्रूच समजला पाहिजे. म्हणून मतदानाचें संपूर्ण स्वातंत्र्य हें लोकशाहीचें तिसरें प्राणभूत तत्त्व होय.

## (४) मतदारांची मतदानक्षमता

मतदार मतपात्र असले, त्यांना अनुरूप उमेदवार सांपडले आणि त्यांना मतदानाचें अनिर्बंध स्वातंत्र्यहि लाभलें, पण मतदान-केंद्रापर्यंत जाऊन परतण्यास जरूर ते श्रम घेण्याची आणि प्रवासादिकांचा नैमित्तिक खर्च सोसण्याची शारीरिक व आर्थिक शक्ति जर त्यांच्या अंगांत नसेल तर त्यांचीं मतें घरांतच पडून राहतील हें उघड आहे. ज्याच्यांत ही शक्ति असेल तो स्वतंत्र बुद्धीचा व अनिर्बंध मतदान करणारा नसला तरी तें करून येईल किंवा त्याचा पक्ष आवश्यक त्या सोयी, राजरोस नसल्या तर चोरट्या मार्गांनीं पुरवून, त्याच्याकडून तें करवून घेऊं शकेल. असें घडलें तर झालेलें मतदान हें मतदारांच्या आंतरिक इच्छेचें प्रतिबिंब आहे असें मानतां यावयाचें नाहीं ; तर तें विजयीपक्षाच्या संघटनाकौशल्याचें व द्रव्यबलाचें फलच मानावें लागेल हें उघड आहे. यासाठीं मतदानकेंद्रें हीं अशा ठिकाणीं व इतकीं असलीं पाहिजेत कीं, अधिकांत अधिक मतदारांना, आजारी, अपंग व अकिंचन स्थितींतहि, अतिसुलभपणें मतदान करतां येईल ; त्याचप्रमाणें वाहनें व प्रवासखर्चादिकांच्या सोयी पुरवून मतदारांना मतकेंद्रांवर नेण्याची आवश्यकताच कमींत कमी भासली जाईल. पण इतकें करूनहि, स्वतः मतदार हे शारीरिक व आर्थिक दृष्ट्या मतदानक्षम असण्याची जरुरी शिल्लक उरतेच. आणि हेंच लोकशाहीचें चौथें प्राणभूत तत्त्व होय.

## (५) मतदानाची दक्षता

परंतु, इतक्यानेंहि भागावयाचें नाहीं ; तर, मतदार हें ठरल्यावेळीं व स्थळीं जाऊन योग्य रीतीनें मतदान करण्याइतके दक्षहि बनलेले असणें अगत्याचें आहे. लोकशाहीचें पांचवें प्राणभूत तत्त्व तें हेंच होय. मतदार जर सुस्त, आळशी, हलगर्जी राहिले तर मतपेटिकेंत मतें टाकूं शकणार नाहींत हें उघड आहे. मताधिकार हा आपणांस मिळालेला एक पवित्र हक्क आहे व तो दक्षतापूर्वक बजावणें हें आपलें मुळींच टाळतां न येणारें कर्तव्य आहे असें प्रत्येक मतदारास वाटलें व पटलें पाहिजे. मतदानाची घटका ही एक अनमोल घडी आहे, स्वतः राज्यकर्ता बनण्याची नसली तरी आपणांस हव्या असलेल्या लोकांनाच

राज्यकर्ते बनवण्याची ही एक नामी संधी आहे हें मतदारांना कळलें व वळलें पाहिजे. आपणांस हवे असलेले सर्वच लोक जरी आपण राज्याधिकारी करूं शकत नसलों तरी आपल्या मताचा प्रतिध्वनि व प्रतिबिंब राज्यकारभारांत आपण पाडूंच पाडूं असा आत्मविश्वास मतदारांमध्यें उत्पन्न झाला पाहिजे; आणि तो सार्थकीं लावण्यासाठीं योग्य वेळीं मतदार करण्याची संपूर्ण दक्षता त्यांनीं बाळगली पाहिजे. मतदानाच्या घटकेला उद्देशून एका राज्यशास्त्रज्ञानें असे उद्गार काढले आहेत कीं, लोकशाहींतसुद्धां मतदार हे, खरेखुरे राज्यकर्ते नसले तरी, त्यांचे निर्माते जे होऊं शकतात ते फक्त एकाच क्षणीं होत; आणि हा क्षण म्हणजे मतदानाचा होय; व इतर सर्व काळीं ते प्रजाजन किंवा शासितच असतात !

## मतदार हें बिंब, सरकार हें प्रतिबिंब

आधुनिक राज्यशास्त्रांत 'सरकार' या संस्थेच्या, विधिसत्ता, कार्यकारी सत्ता व न्यायसत्ता अशा तीन 'सत्ता' मानलेल्या असतात. पण व्यवहारांत सामान्यतः कार्यकारी सत्तेला, व तिचें प्रमुख प्रतीक म्हणून मंत्रिमंडळालाच 'सरकार' म्हणून संबोधतात. हें मंत्रिमंडळ म्हणजे सरकार, विधिमंडळाचें आणि विधिमंडळ किंवा प्रतिनिधिमंडळ मतदारांचें प्रतिबिंब असावें हें लोकसत्ताक राज्यपद्धतीचें आद्य व मुख्य सूत्र असतें. तें अस्तित्वांत येण्यास मतदार हे बुद्धिप्रामाण्यवादी, अनिर्बंध मतदाते, मतदानक्षम व दक्ष असावे लागतात हें येथवर सांगितलें. ज्या राष्ट्रांत ज्या वेळीं ज्या प्रमाणांत मतदारांमध्यें हे गुण प्रादुर्भूत झालेले असतात तेथें तेव्हां त्याच प्रमाणांत लोकशाही उत्पन्न होते; व सरकार हें मतदारांचें प्रतिबिंब बनत असतें. आकाश, वायु, तेज, आप व पृथ्वी या पंचतत्त्वांविना ज्याप्रमाणें मनुष्य किंवा 'लोक' जन्मासच येऊं शकत नाहीं, असें मानतात, त्याचप्रमाणें उपरिवर्णित पंचतत्त्वांशिवाय खरीखुरी 'लोकशाहीहि' जन्मासच येऊं शकत नाहीं; आणि सरकार हें मतदारांचें यथार्थ प्रतिबिंब बनूं शकत नाहीं. जगांतील आजच्या लोकशाही राष्ट्रांत जीं 'सरकारें' आहेत तीं बाह्यतः किंवा कायद्याच्या दृष्टीनें लोकमताचीं प्रतिबिंबें मानलीं जात असलीं तरी वस्तुतः किंवा तत्त्वतः तीं तशींच मानतां येत नाहींत. आजचे विधिमंडळांतील प्रतिनिधि व विशेषतः मंत्रिमंडळाचे सदस्य मतदारांना आपले 'धनि,' 'मालक' म्हणून गौरवीत असतात व स्वतःस त्यांचे सेवक किंवा नोकर म्हणवून नम्रभार व्यक्त करतात. पण ही त्यांची भाषा निवडणुकांच्या समयापुरतीच टिकणारी असते. हे मंत्रि-

महाशय, एकदां का अधिकारारूढ झाले म्हणजे आपल्या मालकांना बहुधा पुरतेच विसरून जातात. हे महाशय, सर्व प्रकारचा ऐषआराम व वैभव उपभोगीत असतात, मानमरातब व कीर्ति संपादित असतात आणि बिचारे 'मालक' त्यांच्याकडे भोकांड पसरून पाहत राहण्याच्या स्थितीस पोंचत असतात. राज्यकर्ते आपल्या या मालकांना केवळ सेवकांप्रमाणें नव्हे तर दासांप्रमाणेंहि वागवीत असतात, असें अनेक लोकशाही राष्ट्रांतहि आढळून येतें. तेव्हां मतदारांना 'मालक' म्हणून गौरवण्याची त्यांची भाषा केवळ वरकरणीच नव्हे, तर पुष्कळवेळां दु:खावर डागण्या देण्यासारखीहि वाटत असते. पण याचें खरें कारण मतदारांची अपात्रता हेंच असतें. लोकशाहींत सरकार हें मतदारांचें प्रतिबिंब असतें हें मान्य केलें तर, प्रतिबिंब हें विकृत किंवा हिडीस उतरतें त्याचें कारण मतदाररूपी बिंबच मुळांत तसें आहे, असें मान्य करणें क्रमप्राप्तच ठरतें. आणि म्हणून, जर सरकार सुस्वरूप, सद्गुणी, सत्कार्यकर्तें व्हावें असें वाटत असेल तर मतदारांनीं स्वतःच तसें बनणें अपरिहार्य असतें. निदान ज्या विचारवंत व सत्प्रवृत्त लोकांना सरकार हें लोकप्रतिबिंबात्मक असावें असें वाटतें त्यांनीं मतदारवर्ग हा वरील गुणपंचकानें संपन्न व्हावा यासाठीं सर्व शक्ति वेंचून झटावें हें त्यांचें कर्तव्य असतें.

## लोकशाहीची व्याख्या

"लोकांनीं लोकांमार्फत लोकांकरतां चालवलेलें राज्य, म्हणजे लोकशाही" अशी तिची व्याख्या सामान्यतः केली जाते. ही व्याख्या सैल, ढिली, ऐसपैस किंवा मोघम आहे. पण आतां जेव्हां लोकशाहीची प्राणभूत पंचतत्त्वें कोणतीं तें आपण पाहिलें आहे, तेव्हां तिची याहून अधिक निश्चित व अन्वर्थक व्याख्या करतां येणें शक्य झालें आहे. आणि "बुद्धिप्रामाण्यवादी मतदारांनीं अनिर्बंध मतदानानें निवडलेल्या अनुरूप प्रतिनिधींकडून नियुक्त झालेल्या मंत्रिमंडळामार्फत लोककल्याणाकरतां चालवून घेतलेली राज्यपद्धति म्हणजे लोकशाही," हीच ती व्याख्या होय.

# लोकशाहीसाठीं अवश्य असणारें बाह्य वातावरण

## मतप्रचार आणि सत्य व अहिंसा

खऱ्याखुऱ्या लोकशाहीच्या निर्मितीसाठीं तिचा मूलाधार जो मतदार त्याच्यामध्यें कोणते पांच गुण प्रादुर्भूत व्हावे लागतात त्याचा विचार मागें केला; पण तेवढ्यानें भागत नाहीं. तर, एकंदर राष्ट्राच्या बाह्य वातावरणांत काय परिस्थिती असावी लागते, त्याचाहि विचार करणें जरूर आहे. राष्ट्रासमोर ज्या अनेक समस्या प्रतिदिन उत्पन्न होत असतात त्यांची सोडवणूक सर्वहितकारकपणें करावयाची तर अमुक–अमुक उपाय, अमुक एका अनुक्रमानें, अमुक इतक्या वेगानें व अमुक एका धोरणानें अंमलांत येणें इष्ट, अवश्य व शक्य असतें. परंतु या बाबतींत निरनिराळ्या लोकांचीं मतें भिन्न भिन्न असतात. या मतभेदांवरून राष्ट्रांत कित्येक गट उत्पन्न होतात. एका गटाची विचारसरणी दुसऱ्या गटास अग्राह्य किंवा घातकहि वाटत असते. समस्यांची कारणमीमांसा व परिणामपरंपरा यांच्यासंबंधींच्या ज्याच्या त्याच्या आकलनानुसार हे मतभेद व गट पडत असतात. वास्तविक ‘सत्य’ हें एकच असलें पाहिजे व मानवाचें हित, कल्याण किंवा ‘शिव’हि समान कार्यांतच असलें पाहिजे आणि सारख्याच विकसित किंवा प्रज्ञावंत बुद्धीस सत्य, शिव–व सुंदरहि–यांचें दर्शन सारख्याच स्वरूपांत व्हावयास पाहिजे. पण सर्वांच्याच प्रज्ञा सारख्या विकसित होऊं शकत नाहींत व म्हणून ‘सत्यम्–शिवम्–सुंदरम्’ हीं सर्वांनाच एकात्म स्वरूपांत प्रतीत होणें अशक्य ठरतें. आणि त्यामुळेंच बुद्धिमंतांमध्यें मतैक्यापेक्षां मतभेदच अधिक दिसून येतात. अर्थात् मतभेद व गटवारी यांचें अस्तित्व साहजिक किंवा नैसर्गिकच होय असें मानणें प्राप्त ठरतें. परंतु कोणाहि बुद्धिमान् व्यक्तींचा अगर कर्तृत्वशाली गटाचा राष्ट्रहितकर कार्यक्रम प्रत्यक्ष व्यवहारांत उतरावयाचा म्हणजे कायदा हा करावाच लागतो, आणि कायदा करावयाचा म्हटलें म्हणजे प्रातिनिधिमंडळांत सभासदांचें बहुमत त्याला अनुकूल पडावें लागतें. म्हणून भिन्न भिन्न विचारधारांचे व कार्यक्रमांचे हुशार लोक आपल्यास विधिमंडळांत बहुमत मिळावें एतदर्थ सारखी खटपट करीत असतात. पण विधिमंडळांत बहुमत मिळवायचें

८०७०३

झालें तर, आधीं मतदारांमध्यें बहुमत मिळवावें लागतें, हें उघड आहे. यासाठीं आपला कार्यक्रम काय आहे, तोच राष्ट्रहितकर कसा आहे, त्याची अंमलबजावणी आपण कसकशी करणार इत्यादि गोष्टी हे हुशार लोक आपापल्या जाहीरनाम्यांतून मतदारांपुढें मांडीत असतात. पण निवडणुकांच्या समयास एकदां जाहीरनाम्यांतून कार्यक्रम पुढें ठेवून मतदारांच्या मनाची पकड घेतां येतेच असें नाहीं. त्यासाठीं सतत प्रयत्न करीत रहावें लागतें. अशा प्रयत्नांतच मतप्रचाराचाहि अंतर्भाव होत असतो. प्राचीन काळीं हा मतप्रचार मोठेमोठे वक्ते सभा भरवून, व्यासपीठांवरून करीत असत. आज व्यासपीठें तर आहेतच, पण त्यांना वृत्तपत्रांचीहि जोड मिळालेली आहे; आणि वक्त्यांप्रमाणेंच लेखकांनींहि हें मतप्रचाराचें काम स्वतःकडे घेतलें आहे. विधिसत्ता, बजावणीसत्ता व न्यायसत्ता या राज्यसंस्थेच्या तीन सत्ता मानल्या जातात, याचा उल्लेख मागें एकदां झालाच आहे. आज राजकारणांत वृत्तसंस्थेचें सामर्थ्य इतकें वाढलेलें आहे कीं, तिला "चौथी सत्ता" अशी संज्ञा देण्यांत येऊं लागली आहे.

आपापल्या मताचा प्रचार करणें यांत कांहींच वावगें नाहीं; इतकेंच नव्हे तर तो सर्वांचाच हक्क व कर्तव्यहि आहे. आपलें म्हणणें काय आहे तें सप्रमाण, सविस्तर व सतत सांगत राहिल्याशिवाय इतर लोक त्याचा अगत्यानें विचार करीत नाहींत; आणि विचार केल्याशिवाय कोणत्या कार्यक्रमाला पाठिंबा द्यावा ते मतदार ठरवूं शकत नाहींत. मतदार स्वतः कितीहि विचारवंत असला तरी दुसऱ्यांचें म्हणणें नीट लक्षांत घेतल्याशिवाय स्वतःची मतें कितपत खरीं किंवा खोटीं हें निश्चित करणें त्याला कठीणच जातें. अर्थात् मतप्रचाराचें स्वातंत्र्य जसें सर्वांनाच असणें अवश्य असतें तसेंच इतरांचें म्हणणें लक्षपूर्वक, सहानुभूतिपूर्वक ऐकलें जावें म्हणून सर्वांनींच सहनशीलतेनें बोलणें–वागणेंहि आवश्यकच असतें. वादविवाद हा विचारविनिमयानें, साधक–बाधक प्रमाणें पडताळून सत्यशोध व तत्त्वबोध व्हावा या हेतूनें करावयाचा असतो. अर्थात् या हेतूला जें जें काय मारक, घातक, विरोधक असेल तें सारें मतप्रचाराच्या कामीं वर्ज्यच मानावें लागतें. अगदीं थोडक्यांत व अतिपरिचित शब्दांत सांगावयाचें तर या कामीं सत्य व अहिंसा यांची कसोशीनें कांस धरावी लागते. व्यक्तिस्वार्थ, वर्गस्वार्थ, पक्षस्वार्थ, मानमरातब, प्रतिष्ठा इत्यादींना बळी पडून अनृत भाषण, असत्याचरण किंवा अत्याचार मुळींच होऊं देतां कामा नये. उमेदवारांची लायकी

मतदारांना सांगतांना आणि जाहीरनाम्यांतून त्यांना आश्वासनें देतांना अप्रामाणिकपणा, अत्युक्ति, आत्मस्तुति, परनिंदा इत्यादि न करतां जें सत्य, इष्ट, शक्य असेल तेंच प्रांजल, सरळ व सडेतोडपणें मतदारांपुढें ठेवलें जावें. असत्याला सत्याचा मुलामा चढवून एखादा उमेदवार किंवा गट मतांची मोठी संख्या आपल्याकडे खेंचून घेऊं शकेल व विजयीहि होईल. पण ज्यांनीं मुळांतच सत्य सोडलेलें असतें ते पुढें प्रातिनिधि अगर मंत्रि बनल्यावर राष्ट्राला कल्याणप्रद अशीं कार्यें करूं शकतील ही कल्पनाहि अग्राह्य होय !

## सर्वच यंत्रणा सच्ची हवी

परंतु, केवळ प्रचारकांनीं सत्य–अहिंसेचें पालन करून भागत नाहीं. तर, उमेदवार, त्यांचे प्रतिनिधि, त्यांना उभे करणारे गट, मतनोंदक, मतगणक वगैरे सर्वांनींच त्यांचें कांटेकोरपणें पालन करणें अवश्य असतें. कारण, मतदानाशीं ज्यांचा ज्यांचा संबंध येतो त्यांच्यापैकीं कोणाएकानेंहि जरी असत्याचरण, कारस्थान केलें तरी इतरांचें सत्यपालन वृथा होत असतें, हें अगदीं उघड आहे.

## वृत्तसंस्था व लोकशाहीवाद्यांपुढील प्रश्न

आज वृत्तसंस्थेचें सामर्थ्य केवढें मोठें आहे त्याचा उल्लेख मागें झालाच आहे; पण तिचें सामर्थ्य मोठें म्हणून तिची जबाबदारीहि मोठीच होऊन बसली आहे. वृत्तपत्रें हजारों वाचक वाचीत असतात व सभांनाहि हजारों श्रोते उपस्थित होत असतात. लेखकांनीं व वक्त्यांनीं आपल्या लेखनचातुर्यानें व वाक्पटुत्वानें वडाची साल पिंपळास लावून खऱ्याचें खोटें व बऱ्याचें वाईट अगर उलट करून दाखवलें तर अनेक मतदार फशीं पडणें स्वाभाविक आहे. कोणत्याहि प्रश्नाच्या शक्य तितक्या अधिक बाजू समजावून देऊन अमुक उपाय योजले तर अमुक परिणाम होतील हें सत्यास स्मरून वाचक व श्रोते यांच्यासमोर ठेवणें हेंच लेखकांचें व वक्त्यांचें कर्तव्य असतें.

आज जगांत सर्वत्रच वृत्तपत्रें व व्यासपीठें हीं कांहीं थोड्याच धनिकांच्या हातांत गेलेलीं दिसतात. आपल्या वर्गाच्या किंवा सहव्यवसायिकांच्या अगर पक्षाच्या बऱ्यावाईट एकूणएक कृत्यांचें स्तवन व समर्थन करावयाचें आणि प्रतिपक्षीयांची निंदानालस्ती चालवायची हें कित्येक वृत्तपत्रांनीं जणुं काय आपलें ब्रीदच ठरवलें आहे, असा भास उत्पन्न होतो. कित्येक वृत्तपत्रें स्वार्थबुद्धीनें किंवा

दंडुक्याच्या भीतीनें सरकार हें सर्वज्ञ व अस्खलनीय आहे असें जणुं काय ब्रह्मदेवच बोलून चुकला असल्याप्रमाणें त्याची सतत तरफदारी करीत असतात; तर दुसरीं कित्येक, सरकार म्हणजे प्रत्यक्ष सैतानाचाच अवतार असल्याचें मानून त्याच्यावर सतत प्रहार करीत असतात. सत्यासत्याचा विवेक करून स्वपक्षाच्याहि चुका दाखवून देणारी आणि प्रतिपक्षाच्याहि सत्कृत्यांची स्तुति करणारीं वृत्तपत्रें क्वचितच आढळून येतात. पक्ष किंवा वर्ग द्रव्यबलानें समर्थ असला म्हणजे तो अनेक भाषांतलीं अनेक दैनिकेंहि चालवूं शकतो, आणि निर्धनांचा पक्ष सत्याचा भोक्ता व लोकहिताचा वाली असला तरी त्याला एखादेंहि नियतकालिक चालवणें मुष्कील पडतें. धनसंपन्न पत्रमालक बुद्धिमंतांची बुद्धि व कलावंतांची कला विकत घेतो व त्यांना आपल्या वर्गहिताच्या कार्यास जुंपून टाकतो. निर्धन सत्पक्षाला हें कार्य अशक्य असतें. मतदारांना आपलें म्हणणें पटवण्यासाठीं धनसंपन्नांना हजार साधनांचा उपयोग करतां येतो, निर्धनांना तें कसें शक्य आहे? त्यामुळें मतदारांपुढें सर्व सत्य स्थिति सारखी स्पष्ट होऊं शकत नाहीं. यावरून आजमितीस वृत्तपत्रें हीं जीं अवघ्याच लोकांच्या हातांत सांपडलेलीं आहेत तीं लोकशाहीच्या अस्तित्वास व विकासास घातक झालेलीं आहेत, असें अनेक विचारवंतांना वाटूं लागलें आहे. आणि हीं प्रचारसाधनें ठराविक वर्गाच्या हातांत केंद्रित होऊन न राहतां तीं विकेंद्रित होऊन सर्व वर्गांना सुलभ कशीं होतील हा एक मोठा प्रश्न लोकशाहीच्या तळमळीच्या पुरस्कर्त्यांपुढें आज उभा टाकलेला आहे. सरकारनेंहि या दृष्टीनें विचार करून योग्य ते उपाय योजले नाहींत तर लोकशाही म्हणजे लोकवंचनाच होऊन बसण्याची भीति आहे!

## पायांकडे पहा तर दोघेहि पहा

सत्य व अहिंसा या जोडगोळीचा मारा सर्वच राष्ट्रांतील सत्ताधारी लोक प्रजाजनांवर करीत असतात. पण त्यांत अधिकारलालसेचा भागच सत्य-अहिंसेच्या भक्तीहून अधिक असतो. सत्ताधारी पक्ष प्रतिपक्षावर असाहि आरोप करण्यास कमी करीत नाहीं कीं, तो सत्तेच्या पिपासेनें पिसाळलेला आहे. सत्ता ही जणुं काय एक धिःकारणीय चीज आहे अशा ऐटीनें खुद्द सत्ताधारी पक्ष जेव्हां बोलूं लागतात तेव्हां, एका बाजूनें गम्मत वाटते तर दुसऱ्या बाजूनें त्यांची काकुळत येते. सत्ता ही जर इतकी घाणेरडी चीज तर ती तुम्ही स्वतः स्वीकारली तिचा अर्थ काय, असा प्रश्न कोणीहि तिऱ्हाईत आपणांस करील हें सत्ताधारी

पक्ष अजिबात विसरून जात असतो! असें करण्यास त्याची स्वतःचीच अधिकारपिपासा कारणीभूत होत असते हें अगदीं उघड आहे. परंतु, सत्तारूढ लोकांनीं एक गोष्ट नेहमीं ध्यानांत बाळगणें जरूर असते ती ही कीं, सत्य व अहिंसा यांची कांस धरून आपण वागलों असतां प्रचलित सरकार बदलूं व इष्ट तें नवें सरकार प्रस्थापित करूं शकूं असा संपूर्ण विश्वास प्रजाजनांमध्यें निर्माण करणें व तो केव्हांहि लवमात्र टळूं न देणें हें सत्तारूढांचेंहि अटळ असेंच कर्तव्य असतें. इतकेंच नव्हे तर, प्रजाजनांच्या आधीं व अधिक अगत्यानें जर कोणी हें कर्तव्य बजावलें पाहिजे तर तेंहि पदारूढ सरकारनेंच होय. पायांकडे पाहून चालावें हें तर खरेंच, पण तें दोघांनींहि किंवा सर्वांनींच पहावयाचें असतें हें कांहीं खोटें नव्हे. असें न झालें तर अनेक प्रजाजन अहिंसक मार्गाचा त्याग करून हिंसक मार्गाकडे वळण्याचा संभव असतो.

## परमधर्म म्हणून नव्हे

सत्य–अहिंसेचें किंवा साधनशुचितेचें जें महत्त्व येथवर वर्णन केलें तें, तीं परमधर्म म्हणून मानावीं काय या दृष्टीनें मुळींच नव्हे. परराष्ट्रानें आक्रमण केलें किंवा राष्ट्रांतर्गत बंडाळी उत्पन्न झाली तर त्यांच्या निवारणार्थहि सत्ताधाऱ्यांनीं व प्रजाजनांनीं सत्य–अहिंसेचीच कांस धरावी काय, हा प्रश्न अगदीं वेगळा आहे. त्याची चर्चा येथें अप्रस्तुत आहे. येथें, लोकशाहीच्या अस्तित्वासाठीं व विकासासाठीं राष्ट्रांतलें एकंदर वातावरण सत्यअहिंसामय असणें किती आवश्यक किंबहुना अपरिहार्य आहे त्याचाच विचार केलेला आहे.

# लोकशाही ही एक निष्ठाहि आहे

## लोकशाही ही आदर्श स्थिति

मतधारक हाच लोकशाहीचा मूलाधार असून तिचें अस्तित्व व विकसन यांच्यासाठीं त्याच्यामध्यें कोणते पांच गुण प्रादुर्भूत झाले पाहिजेत व एकंदर राष्ट्रांतलें वातावरण कसें सत्य–अहिंसामय असलें पाहिजे त्याचें दर्शन येथवर घडविलें. आतां प्रश्न असा कीं, हें कधींतरी घडून येईल का ? अशी स्थिति जगांतील कोणत्यातरी राष्ट्रांत कोणत्यातरी कालीं प्रत्यक्ष व्यवहारांत उतरलेली दिसेल का ? राष्ट्रांतील यच्चयावत् मतदार स्वबुद्धिप्रामाण्यवादी बनतील, सत्पात्र असेच उमेदवार निवडणुकीस उभे राहतील व मतदार त्यांना बिनचूक ओळखतील, कोणत्याहि प्रकारच्या आंतरिक किंवा बाह्य दडपणाशिवाय ते स्वतंत्रपणें मतदान करतील, मतदान करण्यासाठीं जरूर ती शारीरिक व आर्थिक सुस्थिति सर्वांनाच असेल, समयशीलपणें व कायद्याला धरून मतदान करण्याची दक्षता ते बाळगतील आणि राष्ट्रांतलें एकंदर वातावरण सत्य–अहिंसामय राहील ही कल्पना किंवा आशा सदैव ‘ आशाच ’ राहील, प्रत्यक्ष व्यवहारांत ती कधींच फलद्रूप होऊं शकणार नाहीं, असें मानणारे पुष्कळच लोक निघतील यांत काय शंका ? जगांत आजदेखील राजकीय दृष्ट्या अत्यंत पुढारलेल्या राष्ट्रांतहि शंभर टक्के मतदान होत नाहीं, जें होतें त्यांतून अनेक मतें रद्दबातल ठरतात, आणि अवैध, अनैतिक व अत्याचारी प्रकारांनीं मतदान झालें असल्याच्या तक्रारीहि कांहीं थोड्याथोडक्या ऐकूं येत नाहींत. अर्थात् लोकशाही ही भौतिक किंवा संख्येच्या आणि नैतिक अगर तत्त्वाच्या दृष्टीनें संपूर्ण स्थितींत जशी आज दिसत नाहीं तशीच यापुढेंहि दिसणें शक्य नाहीं. ती नेहमीं एक ‘ आदर्श ’ स्थितीच राहील असें या लोकांनीं आपल्या अंतर्मनांत–कळत वा न कळत–ठाम ठरवून टाकलेलें असतें. अत्यंत अनियंत्रित अशी राजसत्ताक अथवा एकसत्ताक हुकूमशाही आणि सर्व प्रौढांना मताधिकार देणारी मतदारसत्ताक अगर सर्वसत्ताक लोकशाही या दोन्ही राज्यपद्धति एकटोंकी किंबहुना केवळ काल्पनिक असून, वास्तव म्हणजे प्रत्यक्ष व्यवहारांत वावरणारी राज्यपद्धति ही अल्पसत्ताकच असते, असें कित्येक राज्यशास्त्रज्ञांचें

म्हणणें असतें. अगदीं अनियंत्रित वागणारा राजा किंवा हुकूमशहा झाला तरी आपली सत्ता टिकवण्यासाठीं अन्य थोड्यातरी बुद्धिमान्, धनवान व शस्त्रास्त्रबलवान लोकांचें साह्य व सहकार्य त्याला घ्यावेंच लागतें. आणि परमावधीची नियंत्रित लोकशाही म्हटली तरी राज्यकारभार सुरळीत, सुसूत्र, सुरक्षित आणि सुखकर पद्धतीनें चालवण्यासाठींहि कांहीं बुद्धिमान्, कर्तबगार, नीतिमान् व बलवान लोकांवरच विसंबून राहणें प्राप्त असतें; राज्यकारभार चालवण्याचें काम कांहीं मिळेल त्याच्यावर किंवा सर्वांवर सोंपवणें शक्यच नसतें. अर्थात् दोन्ही पद्धतींत खरा प्रभाव असतो तो 'अल्पसंख्य' व्यक्तींचाच होय, असें या राज्यशास्त्रज्ञांचें आत्मसमर्थन असतें. लोकशाही ही आदर्शवत् स्थिति आहे, व्यवहारांत साकार होऊं शकणारी नाहीं, असें ज्यांचें मत आहे त्यांनीं, बोधपूर्वक किंवा अबोधपूर्वक, या राज्यशास्त्रज्ञांच्या मताचाच प्रत्यक्ष अगर पर्यायानें अंशतः तरी स्वीकार केलेला असतो, असें म्हणावें लागतें.

## आदर्श पण अपेक्षणीय

परंतु, यावरून लोकशाही ही अग्राह्य किंवा अनपेक्षणीय होय असें अनुमान मुळींच काढतां यावयाचें नाहीं. आकाशध्रुवावरच काय, पण प्रत्यक्ष भूध्रुवावरहि जाऊन मानवप्राण्यांस सुखानें वास्तव्य करून राहतां येत नाहीं. पण त्यावरून ध्रुवताऱ्याची अनवश्यकता, अग्राह्यता किंवा अनुपयुक्तता सिद्ध होत नाहीं; तर प्रचंड विस्ताराच्या सागरांत आणि भयाण अंधःकारांतहि तो मानवाचें मार्गदर्शन करीतच असतो. तसेंच पाहिलें तर, कोणतीहि परमोच्च अवस्थाहि आदर्शवतच असते; ती व्यवहारांत पूर्णावतार कधींच घेत नसते. तरीदेखील मानव तिची अपेक्षा सोडूं शकत नाहीं. तिच्या अधिकांत अधिक जवळ जाण्याचा प्रयत्न करण्यांतच त्याला पुरुषार्थ वाटत असतो, आणि त्या प्रयत्नांत रत राहणें यांतच तो समाधान मानून घेत असतो. लोकशाहीपेक्षां अधिक उदात्त व अधिक सर्वकल्याणकर अशी दुसरी राज्यपद्धति राज्यशास्त्रज्ञांस किंवा तत्त्वज्ञान्यांस अजून दाखवून देतां आलेली नाहीं; म्हणून तोंपर्यंत तरी मानवसमाजाला तिचीच आराधना करणें प्राप्त आहे.

## मानवाची विकसनशीलता

मानवाचा आत्मा हा मूलतः अगर स्वभावतः चांगला आहे कीं वाईट आहे? आणि मूलतः म्हणजे केव्हां? तो जन्माला आल्यापासून, गर्भात संभवल्यापासून किंवा आद्य मानवाच्या गर्भसंभवापासून? या प्रश्नांचें उत्तर सर्वसंमत रीतीनें,

कोणीचि देऊं शकत नाहीं. त्याचप्रमाणें, तो सतत सारखाच सुष्ट राहूं शकतो अगर नित्यनियमानें दुष्टबुद्धिच असतो, तेंहि निर्विवादपणें सांगतां येत नाहीं. परंतु, आजच्या मानवाची स्थिति बारकाईनें पाहिली तर तो सत् आणि असत्, सुष्ट आणि दुष्ट, मूर्ख आणि शहाण्या प्रवृत्तींचें एक गुंतागुंतीचें, विलक्षण, चमत्कारिक मिश्रण असतें ; कांहीं प्रसंगीं त्याच्यांतील कांहीं प्रवृत्ति उचंबळून येतात तर कांहीं प्रसंगीं तद्विरोधी प्रवृत्ति उफाळून येतात, आणि त्या त्या प्रसंगीं त्याचें वर्तन बरें झालें कीं वाईट झालें तें आपण ठरवीत असतों ; जें वर्तन एका प्रसंगीं 'सत्' ठरतें तेंच दुसऱ्या प्रसंगीं 'असत्' ठरत असतें आणि जें एकाच्या बाबतींत 'सत्' असतें तें दुसऱ्याच्या बाबतींत 'असत्' ठरत असतें, हें मात्र अनुभवसिद्ध आहे. समाजाशिवाय आपलें कौटुंबिक व वैयक्तिक जीवन ही केवळ अशक्य गोष्ट होय, हें त्याला मनोमन पटलेलें असतें. परंतु, प्रसंगवशात् तो सबंध समाजाच्याहि जीवावर उठूं पहात असतो. तो नियमतः स्वसुखार्थी असतो ; पण प्रसंगीं इतरांच्या सुखासाठीं किंवा एखाद्या शुद्ध काल्पनिक ध्येयासाठींदेखील स्वसुखाचाच काय, पण प्रत्यक्ष प्राणाचाहि त्याग करण्यास सिद्ध असतो. आपली कामवासना भागवण्यासाठीं पुरुषाला स्त्री व स्त्रीला पुरुष आत्मवत् प्रिय असतो. आपली कीर्तिलालसा भागवण्यासाठीं समाजाला प्रिय होण्याची धडपड स्त्री-पुरुष अव्याहतपणें करीत असतात. परंतु, तींच माणसें केव्हां कोणाचा कोणत्या कारणासाठीं खून पाडतील तें बिनचूक सांगणें कोणासच शक्य नसतें. 'ते केन जानेमहे' असें ज्यांचें वर्णन भर्तृहरीनें केलें आहे तें तंतोतंत लागू पडणारे कांहीं नीच स्वार्थांधहि प्रसंगीं सर्वसंगपरित्याग करून परार्थीच नव्हे तर परमार्थीहि बनलेले, पुराणकालांत जसे सांपडत तसे आजहि आपण पाहतों. उलटपक्षीं त्यागी, तपस्वी, साधु, सिद्ध, योगी इत्यादि पदव्यांनीं ओळखले गेलेले कांहीं लोक काम, क्रोध, राग, लोभ, मोह, मद, मत्सर, भीड, भीति इत्यादि विकारांना विवश होऊन दुष्कर्माचरणास प्रवृत्त झाल्याचींहि उदाहरणें अनेक आहेत. तेव्हां, मानवप्राणी मूलतः किंवा स्वभावतः कसाहि असल्याचें ठरलें तरी अजून तो बऱ्यावाईट प्रवृत्तींचें चमत्कारिक मिश्रण राहिलेला आहे, असें म्हणणें भाग पडतें. तथापि, लोकशाहीचे व विशेषतः सार्वत्रिक प्रौढमताधिकारदानाचे जे प्रामाणिक पुरस्कर्ते आहेत त्यांच्यामतें तो परिवर्तनीय, विकासशील, अंधाराकडून प्रकाशाकडे वळलेला, सन्मार्गाभिमुख असाच प्राणी आहे. आणि म्हणून आजच्या जगांतहि योग्य

वातावरण तयार केल्यानें तो जसा सदाचार करूं शकेल तसाच कालान्तरानें त्याचा समाज विचारान्तीं, उपदेशान्तीं, उदाहरणान्तीं, प्रयोगान्तीं, शिक्षणान्तीं, सुसंस्कारान्तीं, अनुभवान्तीं संपूर्णपणें विकसित होईल, म्हणजेच आपल्या सर्व सद्गुणांनीं या पृथ्वीतलावर अवतरेल, अशी त्यांची दृढ श्रद्धा, अविचल निष्ठा असते.

## मुद्द्याचा प्रश्न कलाचा किंवा रोंखाचा

आजचा मानवसमाज, लोकशाहीच्या प्राणभूत पंचतत्त्वांच्या दृष्टीनें अपूर्ण वा अल्पप्रगत आहे, आणि आजचीं सर्वसत्ताक म्हणवणारीं राष्ट्रेंहि अंतस्थतः किंवा सारतः अल्पसत्ताकच आहेत, हें लोकशाहीच्या निस्सीम उपासकांनाहि अमान्य नाहींच. पण त्यांचा मुद्याचा प्रश्न आहे तो असा कीं, ज्यांना लोकशाही ही खरोखरच इष्ट, अवश्य व प्रिय वाटते त्यांनीं स्वतःच्या मतीचा, उक्तींचा आणि कृतींचा कल किंवा रोंख, कोणत्या दिशेकडे ठेवावयाचा ? जेणेंकरून लोकशाही प्रगत होत जाईल त्या दिशेनें कीं अडकून पडेल अगर परागत होत राहील त्या दिशेनें ? आजच्या लोकशाहीच्या अपूर्णतेबद्दल प्रश्न नाहीं. पण तुम्हीं तुमच्या विचार–उच्चार–आचारांनीं ती अपूर्णता कायम ठेवण्यास कारणीभूत होणार कीं तिला पूर्णतेकडे नेण्यास झटणार, याबद्दलचा आहे. लोकशाही आपल्या संपूर्ण विकसितावस्थेंत कदाचित् कधींच अवतीर्ण होणार नाहीं, ती सदैव आदर्शवतच राहील. पण आदर्शाकडे जावयाचें म्हणजे त्याच्यावर निष्ठा ठेवल्याशिवाय गत्यंतर नाहीं !

## आदर्श म्हणूनच निष्ठेय

लोकशाही ही एक राज्यपद्धति आहे हें तर खरेंच, पण ती एक निष्ठाहि आहे, हें वर केलेल्या विवेचनावरून वाचकांना कळून आलें असेल, अशी आशा आहे. किंबहुना, क्षणभर असेंदेखील म्हणतां येईल कीं, पद्धतीपेक्षां निष्ठेचाच भाग तींत अधिक आहे. हा मुद्दा नीट ध्यानांत ठेवला नाहीं तर तिच्यासंबंधीं केलेली सर्व चर्चा व चिकित्सा प्रमादपूर्ण तरी ठरते किंवा व्यर्थ तरी जाते. लोकशाहीवर ज्यांची अशी अव्यभिचारी निष्ठा नसेल त्यांनीं तिच्याबद्दल वादविवाद करण्याच्या किंवा तिला पुरस्कारण्याच्या फंदांत न पडणेंच बरें. कारण, त्यामुळें कालापहरणाविना अन्य कांहींच पदरांत पडावयाचें नाहीं. आणि लोकशाहीवरील निष्ठा म्हणजे अंतस्थतः व अंतिमतः मानवाच्या

विकसनशीलतेवरील श्रद्धाच होय. ईश्वर म्हणून कांहीं आहे कीं नाहीं, सत्य-अहिंसेनें जगासमोरच्या साऱ्या समस्या न्याय्यपणें सोडवतां येतील कीं नाहींत, पूर्वजन्म-पुनर्जन्म आहे का नाहीं, इत्यादि प्रश्नांच्या बाबतींत अनेक मोठमोठ्या विचारवंतांमध्यें तीव्र मतभेद आहेत. परंतु, ईश्वरवादी, अहिंसावादी किंवा पुनर्जन्मवादी पतिव्रता ज्या दृढ निष्ठेनें वागत असतात, त्याच दृढ निष्ठेनें लोकशाहीवाद्यांनींहि वागलें पाहिजे. आजच्या मानवाच्या अगर स्वतःच्या समाजाच्या अपूर्णतेचा मुद्दा पुढें करून किंवा व्यवहार्य-अव्यवहार्यतेचा घोळ उभा करून त्या निष्ठेला मुरड घालतां कामा नये. एखाद्या देवतेच्या मातीच्या किंवा धातूच्या मूर्तीमध्यें वमन-विष्ठेतहि सांपडणारीं कांहीं द्रव्यें रासायनिकांना आढळून येतात. पण एकदां का मूर्ति सजवून पूजेला लावली म्हणजे तिच्या-मधल्या मूलद्रव्यांचा विसर पाडून घेऊन तिची अपरंपार भक्तीनें उपासना करणें हेंच तिचा उपासक स्वतःचें कर्तव्य मानीत असतो. तिची अवहेलना किंवा निर्भर्त्सना तो स्वप्नांतहि स्वतः कधीं करूं शकत नाहीं. अन्य कोणी केलेली साहूं शकत नाहीं. ईप्सित कामना सिद्धीस गेली नाहीं, देव नवसास पावला नाहीं तरीहि त्याची ईश्वरावरील श्रद्धा लवमात्र ढळत नाहीं. लोकशाहीचे पुरस्कर्ते म्हणवून घेणाऱ्यांची तिच्यावर अशीच नितांत भक्ति असली तरच तिला ते उपकारक होऊं शकतील.

## आधीं हें ठरवा, मग पुरस्कार करा

तेव्हां, लोकशाहीचे पुरस्कर्ते समजणाऱ्यांनीं प्रथम अंतर्मुख होऊन किंवा आत्मसंशोधन करून, मानवाच्या विकासक्षमतेवर, सत्प्रवृत्तीवर, ऊर्ध्वगामीत्वावर स्वतःची अविचल अशी श्रद्धा आहे कीं नाहीं हें ठरविलें पाहिजे. आणि जर ती असली तर, आपले विचारोच्चाराचार त्या श्रद्धेला बाधक ठरणार नाहींत असे ठेवण्याची आपली प्रज्ञा व प्रतिज्ञा आहे कीं नाहीं तें पाहिलें पाहिजे. निवडणुकीचा निकाल स्वतःच्या इच्छेनुसार लागला किंवा एखाद्या ठरावावर आपल्याला बहुमत मिळालें तर मतदारांना व विधिमंडळ-सदस्यांना शहाणे व सज्जन म्हणून गौरविणारे आणि विरुद्ध घडलें तर त्यांना मूर्ख व दुर्जन म्हणून हिणवणारे; अगर आपणाला इष्ट असलेला माणूस निवडून न आला तरी त्याला प्रधानमंडळांत घेण्यास हरकत नाहीं म्हणणारे व इष्ट नसलेल्या उमेदवाराला पराभूत झाल्याच्या मुद्द्यावर मंत्रिमंडळांत स्थान नाकारणारे हे तोंडानें लोकशाहीचे केवढेहि

मोठे पुरस्कर्ते असले तरी मनानें तिचे सैतानाहूनहि अधिक भयंकर शत्रू होत ! लोकशाहीवर ज्यांची खरोखरच अव्यभिचारी निष्ठा असेल तेच तिच्यासंवर्धांचे विचार, विवेचन व कृति सुसंगतपणें करूं शकतील व तेच तिला साकार बनवण्यास समर्थ ठरतील. या निष्ठेखातर त्यांना पुष्कळ खस्ता खाव्या लागतील, अपयशाचे वाटणारे पुष्कळ प्रसंगहि सहन करावे लागतील; 'पी हळद हो गोरी' या न्यायानें हें कार्य झटपट होणार नाहीं. त्यासाठीं दीर्घ काळच कदाचित् जाऊं द्यावा लागेल, असा भास होईल. पण ती नितांत निष्ठाच अखेरीस लोकशाहीची खरी तारक व लघुतम वाट अथवा साधना ठरेल !

# राजकीय पक्षांचें यथार्थ स्वरूप

## प्रतिपाद्य विषयाचें स्मरण

लोकशाहीचे चार घटक, तिचा मूलाधार, तिचीं प्राणभूत पंचतत्त्वें, तिची अन्वर्थक व्याख्या, तिच्यासाठीं आवश्यक असणारें बाह्य वातावरण, तिच्यावर ठेवणें जरूर असलेली निष्ठा इत्यादींची माहिती घेतल्यावर आपणांस आपल्या मुख्य प्रतिपाद्य विषयाकडे वळण्यास हरकत नाहीं. राजकीय पक्ष हे लोकशाहीला आवश्यक नाहींत, अपरिहार्यहि नाहींत आणि इष्टतर नाहींतच नाहींत, उलट सर्वस्वीं घातक आहेत ; हीच गोष्ट थोड्याअधिक गांभीर्यानें सांगावयाची तर, पक्षपद्धति ही प्राप्तापत्ति नव्हे आणि इष्टापत्तीहि नव्हे; तर आमंत्रितापत्ति आहे, हें सिद्ध करणें हा आपला प्रतिपाद्य विषय आहे. तेव्हां आतां पक्ष म्हणजे काय, त्याची उत्पत्ति कशी होते, प्रकृति कशी असते, त्याच्यांत विकृति कशी शिरते आणि ती लोकशाहीच्या प्राणभूत तत्त्वांचा जीव घेण्यास कशी कारणीभूत होते वगैरेंच्या विचारास लागूं.

## राजकीय पक्षांची उत्पत्ति

राष्ट्रासमोर जे अनेक प्रश्न प्रतिदिन उत्पन्न होत असतात त्यांची सोडवणूक कोणत्या उपायांनीं, कोणत्या क्रमानें, किती वेगानें केली असतां देशांतील अधिकांत अधिक लोकांचें अधिकांत अधिक हित साधेल या बाबतींत मतदारांमध्यें निरनिराळ्या विचारसरणी नेहमीं असणें स्वाभाविकच असतें. कारण, परमेश्वरानें किंवा निसर्गानें ज्या क्षणास दोन मस्तकें उत्पन्न केलीं त्याच क्षणास दोन मतेंहि उत्पन्न झालीं, आणि भिन्न भिन्न मतांत कांहीं साम्यें तर कांहीं वैषम्येंहि त्याच क्षणीं जन्मास आलीं. अर्थात् मतभेद व मतसाम्यें हीं अनादिकालापासूनचींच होत, असें म्हणण्यास प्रत्यवाय नाहीं. जे लोक सामान्यतः समान विचाराचे असतात ते लोक एकत्रित येऊन राष्ट्रहिताचा असा स्वतःचा म्हणून एक खास कार्यक्रम आंखतात व तो व्यवहारांत उतरविण्यासाठीं आपली एक संघटना किंवा संस्था उभारतात; आणि राज्यसंस्था किंवा सरकार हस्तगत करूनच आपला उद्देश लवकर व परिपूर्णपणें सिद्धीस जाईल असें त्यांना वाटत असल्यानें ते सत्तासंपा-

दनाच्या कार्यासच आधीं हात घालतात. राष्ट्रोद्धाराचा कोणताहि कार्यक्रम अंमलांत आणावयाचा तर आधीं कायदा करावा लागतो; कायद्यांचे मसुदे तयार करून ते विधिमंडळासमोर ठेवण्याचें काम सामान्यतः मंत्रिमंडळानेंच करावयाचें असतें; मंत्रिमंडळानें सुचविलेले कायदे अंमलांत यावयाचे तर विधिमंडळांत बहुसंख्य सभासदांकडून त्यांना मान्यता मिळणें जरूर असतें; विधिमंडळांत बहुमत मिळावयाचें तर त्याचे बहुसंख्य सभासद आपल्या संघटनेच्या सांगण्यानुसार वागणारे असणें प्राप्त असतें आणि विधिमंडळांत बहुसंख्य सभासद असावयाचे तर त्यांना निवडून देणारे बहुसंख्य मतदारहि त्याच संघटनेच्या आदेशानुसार मत देणारे असावे लागतात. यासाठीं संघटनेचा प्रारंभ मतदारांपासूनच करणें अपरिहार्य होऊन बसतें. म्हणून समविचाराचे जे खटपटी लोक असतात ते बहुसंख्य मतदारांना एकत्रित करून त्यांनाच आपल्या लगामीं आधीं लावीत असतात. राज्यसंस्था हातांत घेण्याच्या उद्देशानें मतदारांच्या अशा ज्या निरनिराळ्या संघटना अस्तित्वांत येत असतात त्यांनाच 'राजकीय पक्ष' अशी संज्ञा असते.

## पक्षाची व्याख्या व व्यवच्छेदक मुख्य लक्षण

परंतु राज्यसंस्था हातांत घेण्याची आकांक्षा आणि विचारसाम्य किंवा मतैक्य हीं दोनच राजकीय पक्षाचीं मुख्य कारणें व लक्षणें नव्हत; तर, त्यांच्याशिवाय अमुक इतक्या कालावधीसाठीं अमुक इतकी वर्गणी भरणें अगर अमुक एक कार्य करणें, पक्षाच्या अधिकार मंडळांत अगर समित्यांत जागा स्वीकारणें, पक्षाची घटना व नियमावलि यांना अनुसरून वागणें वगैरे अटीहि पक्षांत भाग घेऊं इच्छिणाऱ्यांना पाळाव्या लागतात. या सर्व अटी पाळण्याचें मान्य केल्याशिवाय पक्षाचा सभासद होतां येत नाहीं. आणि या अटी, व पक्ष आपल्या सभेंत जे ठराव एकमतानें किंवा बहुमतानें संमत करील ते ठराव हीं पाळावयाचीं नसलीं तर पक्षांतून बाहेर पडावें लागतें. या सर्व गोष्टी लक्षांत घेतल्या तर, "आपापसांत विचारविनिमय करून जें जें काय एकमतानें किंवा बहुमतानें ठरेल तें सर्व मतैक्यानेंच ठरलें आहे असें मानण्याचा; आधीं निवडणुकांत, मागाहून विधिमंडळांत व तदनंतर मंत्रिमंडळांत—अर्थातच त्यांत जागा मिळाली असतां—तदनुसारच बोलण्याचा व मत देण्याचा आणि पक्षसभांबाहेरहि त्याला अनुकूल असाच प्रचार व आचार करण्याचा करार बांधलेल्या,

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे, स्थळ
अनुक्रम 23688 दि:
क्रमांक नों. दि.

राज्यसंस्था हस्तगत करूं इच्छिणाऱ्या मतदारांचा अगर नागरिकांचा समुदाय म्हणजे ' राजकीय पक्ष ' होय " अशी त्याची व्याख्या करावी लागते. हा करार लिखित असतोच असें नव्हे; तर तो बहुधा सांकेतिकच असतो. पण तो पाळण्याचें बंधन मात्र सर्वच सभासदांवर असतें. या बंधनाला " शिस्त " अशी संज्ञा असते. पक्ष एकदां स्थापन केला म्हणजे त्याच्यावर अनन्य निष्ठा ठेवणें अवश्य व इष्टहि असतें; आणि त्या निष्ठेचें निदर्शक म्हणून पक्षाची शिस्त सांभाळणें हें प्रत्येक सभासदाचें सहजप्राप्त असें कर्तव्यच होऊन बसतें. या शिस्तीला अनुसरून पक्षसभासदानें अशी प्रतिज्ञा केली असल्याचें गृहीत धरण्यांत येतें कीं, " एखाद्या प्रश्नाच्या बाबतींत इतर सभासदांशीं जर आपले कांहीं मतभेद असले तर ते फक्त पक्षांच्या सभेंत किंवा बैठकींत व्यक्त करीन; पण पक्षानें एकदां का त्या प्रश्नावर निर्णय घेतला म्हणजे मग मात्र ते मतभेद कोठेंहि व्यक्त करणार नाहीं आणि त्या निर्णयाला अनुकूल असाच सारा विचार–आचार–प्रचार सर्वत्र ठेवीन. " पक्षीय राजकारणांत पक्षनिष्ठा हा बहुमोल गुण समजला जावा हें स्वाभाविकच असतें आणि त्या निष्ठेची द्योतक जी शिस्त तिचा भंग कोणा सभासदानें केला तर ठरलेल्या नियमांन्वयें किंवा विधींप्रमाणें पक्षश्रेष्ठींनीं अगर अन्य अधिकाऱ्यांनीं त्याला योग्य ती शिक्षा करणें व अखेरीस त्याला पक्षांतून बाहेरहि घालवणें न्याय्य व क्रमप्राप्तच मानावें लागतें. तात्पर्य, ' शिस्त ' हेंच राजकीय पक्षाचें मुख्य व्यवच्छेदक लक्षण समजणें भाग असतें.

## पक्षशिस्त म्हणजे वैचारिक गुलामगिरी

एरव्हीं, शिस्त म्हणजे व्यवस्थितपणा ; चारचौघ सुज्ञांनीं ठरवलेल्या चांगल्या नियमांनुसार एखादा आचार किंवा कृति सर्वांनीं सहकार्यानें व एकसमयावच्छेदें करणें. अशी शिस्त लहान–मोठ्या सर्वच सार्वजनिक व्यवहारांत सदाच फार उपयुक्त असते, याबद्दल वाद नाहीं. परंतु, पक्षाची शिस्त कितीहि वाखाणली जात असली तरी तिचें वास्तव स्वरूप व अंतिम पर्यवसान वैचारिक गुलामगिरी हेंच असतें, असें अनुमान तिचें बारकाईनें पृथक्करण केल्याअन्तीं काढावें लागतें. जे इसम पक्षाच्या बैठकांबाहेरच्या जगांत स्वतंत्र उच्चार व आचार करूं शकत नाहींत त्यांची स्वतंत्र विचार करण्याची शक्तीहि दिवसेंदिवस बधिर होत जाते व कालान्तरानें मृतवत् होण्याचाहि संभव असतो. प्रथम प्रथम हें कोणाच्या लक्षांतहि येत नसतें. ज्याच्यापाशीं लाखों

रुपये असतात तो रोज एकेक रुपया हरवूं लागला तरी त्याला त्याचा चटका तत्क्षणीं बसत नाहीं. पण कालान्तरानें तो सर्व संपत्ति गमावून बसेल हें साध्या गणितानेंहि सहजसिद्ध होतें. आचार, विचार आणि उच्चार यांचा संबंध अत्यंत निकटवर्ती व परस्परावलंबी असतो. एकाच्या स्वातंत्र्याचा अगर बंधनाचा दुसऱ्यावर हटकून परिणाम झाल्याशिवाय सहसा राहत नाहीं, असा मानसशास्त्राचा सिद्धांत आहे. कोणी म्हणेल, पक्षसभांच्या बाहेर जरी सभासदांना आचार-प्रचाराचें स्वातंत्र्य नसलें तरी पक्षांतर्गत कारभारांत त्यांना संपूर्ण स्वातंत्र्य असतें; अर्थात् त्यांची स्वतंत्र विचारशक्ति कमकुवत होत जाण्याचें कारण नाहीं. पण पक्षाच्या सभा वारंवार भरतात असें जरी मानलें तरी सभासदांचा पुष्कळच अधिक काळ बाहेरच्याच जगांत जात असतो हें अमान्य करतां यावयाचें नाहीं. आणि फार काळ स्वातंत्र्याला मुकलेल्यांना थोडा काळ स्वातंत्र्य मिळालें तरी तें पूर्णतः कार्यकर व फलपुष्पान्वित होऊं शकत नाहीं. दीर्घकाल कारावासांत राहिलेल्या असामान्य बुद्धिवानांना वेड लागल्याचीं उदाहरणेंहि आढळलेलीं आहेत. वास्तविक कारागृहांत झालें तरी मस्तकांत विचार करण्याचें त्यांचें स्वातंत्र्य बाह्यतः कोणीच हिरावून घेत नाहीं, घेऊं शकत नाहीं. परंतु, उच्चार व आचार यांना मुकल्यामुळेंच त्यांची विचारशक्ति मरून गेलेली असते व म्हणूनच वेड लागण्याची आपत्ति त्यांच्यावर ओढवत असते. याच न्यायानें पक्षांतर्गत स्वातंत्र्यहि निरर्थक ठरत असतें. मग तें कारावासी जनांच्या मानानें अल्प प्रमाणांत व दीर्घ कालावधीनें का असेना ?

या आपत्तींतून सुटून कांहीं पक्षनिष्ठांची स्वतंत्र विचारशक्ति थोडी शाबूद राहिलीच तर ती एकांगी बनून जाते. कोणत्याहि प्रश्नाचा विचार पक्षाच्या चाकोरीबाहेर जाऊन करण्यास ती असमर्थ ठरते. त्यामुळें सत्याचें, वस्तुस्थितीचें समग्र व साकल्यानें दर्शन घेणें तिला अशक्य होऊन बसतें.

## पक्षाचा आद्य उगमबिंदु

येथेंच, पक्षाचा आद्य उगमबिंदु कोठें असतो त्याचें थोडें संशोधन करूं. पक्षसंघटनेसाठीं अनेक लोक एकत्र यावे लागतात हें उघड आहे. पण ते आपोआप एकत्र कसे येतील ? त्यांना कोणीतरी एकत्र आणावेंच लागतें. राष्ट्रांत जे महत्त्वाकांक्षी, राजसत्तापिपासू, बुद्धिमान् व कर्तबगार लोक असतात त्यांच्यांतून कोणीतरी एखादा पक्षसंघटनेच्या कार्याचा पुढाकार घेत असतो. अशा लोकांमध्यें

जनतेचें हित इच्छिणारे लोक नसतातच असें मुळींच नव्हे. परंतु, जनकल्याणापेक्षां स्वतःच्या महत्त्वाकांक्षेची परिपूर्ति हेंच पक्षाच्या उभारणीचें आद्य प्रेरकस्थान असतें, असेंच सर्वत्र दिसून येतें. जे लोक एकमेकांना समान महत्त्वाकांक्षेचे, समान बुद्धिमत्तेचे, समान पात्रतेचे किंवा समान सामर्थ्याचे समजत असतात ते स्वभावतःच एकत्र येत नसतात. कारण एकाच म्यानांत अनेक तरवारी सुखानें नांदूं शकणार नाहींत हें त्यांना ठाऊकच असतें. जाणूनबुजून अस्तनींत निखारे कोण शहाणा घालून घेणार? अर्थात्, जो तो आपल्याहून बुद्धीनें, लायकीनें व सामर्थ्यानें जे थोडे तरी अल्पसरस किंवा हिणकस असतील त्यांचीच मोट आपापल्या पक्षसंघटनेच्या कामीं बांधीत असतो. परंतु, सर्वच लोक निर्बुद्ध, अकार्यक्षम, निष्प्रभ असले तर पक्षाचीं कामें सुरळीत चालून तो यशस्वी होणें अशक्य असल्यानें कांहीं बुद्धिमान् लोकांच्या स्वार्थाला चाळवून पक्षनेते त्यांना स्वतःच्या कळपांत ओढीत असतात. आणि ज्यांना आपण एकाकी किंवा फटकून राहिलों असतां महत्पद किंवा स्वार्थसाधनें प्राप्त करून घेण्यास असमर्थ आहों असें वाटतें ते त्या पक्षांत शिरत असतात. हे दुय्यम दर्जाचे लोक आपल्याहून खालच्या दर्जाचे लोक स्वतःभोंवतीं गोळा करून त्यांची भरती पक्षांत करीत असतात. आणि राजसत्तेच्या कृपाप्रसादानें आपला कोणताना कोणता स्वार्थ साधणें सुलभ होईल अशी दृष्टि ठेवून तिय्यम दर्जाचे लोक पक्षांत प्रविष्ट होत असतात. याचा साहजिकच परिणाम असा होतो कीं, पक्षाचें नेतृत्व पहिल्या वर्गांतील, म्हणजे अव्वल दर्जाच्या बुद्धिमान व धूर्त गटांतील मूठभर लोकांकडे जात असतें, हें नेतृत्व टिकवण्यासाठीं पक्षांतील दुय्यम दर्जाच्या कांहीं लोकांच्या कोणत्याना कोणत्या स्वार्थी वृत्तीचें समाधान त्यांना करणें प्राप्त असतें, त्यासाठीं कांहीं मानाचीं व कांहीं धनाचीं फालतू स्थानें त्यांना निर्माण करावीं लागतात; पुन्हा या दुय्यम दर्जाच्या लोकांनाहि तिय्यम दर्जाच्या, त्यांतल्यात्यांत अधिक महत्त्वाकांक्षी असणाऱ्या, कांहीं लोकांचें समाधानहि तत्सम मार्गांनीं करणें भागच असतें आणि अखेर पृथक्करणांत राजकीय पक्ष म्हणजे मूठभर महत्त्वाकांक्षी, बुद्धिमान, कावेबाज, कर्तबगार लोकांनीं आपल्यांतीलच एकाला देव बनवून त्याच्याभोंवतीं शिताफीनें गोळा केलेली गाडाभर स्वार्थी लोकांची रास, अशी स्थिति होऊन बसते! सामान्य जनतेचें वा एकंदर राष्ट्राचें कल्याण हेंच आपलें एकमेव उद्दिष्ट, अंतिम ध्येय असल्याचें सर्वच पक्ष सदासर्वदा सांगत सुटतात. पण त्यांची आंतरिक घडण व वास्तविक स्थिति हीच असते.

कोणताहि पक्ष राष्ट्रहिताचें असें कोणतेंच कार्य करूं इच्छित नाहीं व प्रत्यक्ष करीत नाहीं, आणि पक्षांतील एकूण एक लोक व्यक्तिस्वार्थीच असतात, असें मुळींच नव्हे. खरोखर राष्ट्रहिताचीं अशीं कांहीं कार्यें केल्याखेरीज आणि कांहीं पक्षप्रमुखांनीं कोणत्या स्वार्थाचा त्याग केल्याखेरीज किंवा तसेंच कांहीं तरी दिव्य कृत्य करून दाखवल्याखेरीज पक्ष फुलूं शकत नाहीं व फुलला तरी फार काळ टिकत नाहीं, हें पक्षप्रमुखांना ठाऊकच असतें; आणि म्हणून ते त्या दृष्टीचीं थोडींतरी कार्यें करीतच असतात. पण त्यांच्या उभारणीची खरीखुरी व आद्य प्रेरणा एकाच्या किंवा कांहींच्या वैयक्तिक महत्त्वाकांक्षेंतच असते; आणि आपल्या-इतक्या महत्त्वाकांक्षेचे व सामर्थ्याचे अन्य लोक पक्षांत शिरूं नयेत अशी खबरदारी त्यांनीं ठेवलेली असते, याबद्दल शंका घेण्याचें कांहीं एक कारण नाहीं. ही महत्त्वाकांक्षा धनकनकसंपन्न होण्याची नसेल, राजविलास व राजोपचार भोगण्याचीहि नसेल; तर केवळ कीर्तिलालसा भागवण्याची, अथवा राष्ट्रांतील किंवा जगांतील श्रेष्ठ व्यक्ति म्हणून मिरवण्याची, अगर मृत्यूनंतर स्वर्गलोकांत जाण्याची, मोक्ष मिळवण्याची किंवा निर्वाणपद प्राप्त करून घेण्याचीहि असूं शकेल. ज्यांचा असला वैयक्तिक स्वार्थ समूळ सुटला आणि लोककल्याण हें केवळ एक विहित कर्तव्य म्हणूनच करीत रहावें अशी ज्यांची निर्मम बुद्धि झाली ते राजदंडधारी होण्याची मनीषा बाळगणारच नाहींत व अर्थात् पक्षसंघटनेच्या भानगडींतहि पडणार नाहींत; आणि त्यांना त्यांचें तें कर्तव्य करण्यासाठीं तिची गरजहि खरोखर पडत नाहीं. राजकीय पक्षाची उभारणी आणि वैयक्तिक महत्त्वाकांक्षेचा अभाव या गोष्टी स्वभावतःच एकत्र राहूं शकणाऱ्या नाहींत हें अगदीं स्थलकालाबाधित त्रिवार सत्य होय!

# विकृति हीच राजकीय पक्षांची प्रकृति

## व्यक्तींची कीर्तिलालसा व पक्षाची उभारणी

पक्षाची व्याख्या, त्याचें मुख्य व्यवच्छेदक लक्षण आणि त्याची कुळकथा हीं लक्षांत घेतलीं म्हणजे त्यांचें जनकत्व व नेतृत्व महत्त्वाकांक्षी, बुद्धिमान, कर्तबगार, धूर्त किंवा मुत्सद्दी अशा थोड्याच व्यक्तींकडे कां असतें तें सहज कळून येतें. कनक आणि कांता यांचा मोह अनिवार्य असल्याचीं वर्णनें आपण अतिप्राचीन कालापासून जगांतील सर्व वाङ्मयांतून वाचीत असतों. पण सत्तेचा आणि तिच्या-पेक्षांहि अधिक कीर्तीचा किंवा स्तुतीचा मोह कमी अनिवार्य असतो असें म्हणतां यावयाचें नाहीं. परमेश्वर म्हणून कांहीं आहे कीं नाहीं हें कोणीच सर्वप्रत्ययनेय रीतीनें सिद्ध करून देऊं शकत नाहीं. तथापि ज्या तत्त्ववेत्त्यांनीं किंवा कविमुनींनीं ईश्वराची भव्य व उदात्त कल्पना केली त्यांनादेखील तो स्तुतिप्रिय व निंदा-द्वेष्टाच कल्पावा लागला! पृथ्वीवर जेव्हां दैत्य किंवा असुर माजत आणि प्रजाजनांचा छळ करीत तेव्हां स्वर्गांतले देव स्वतः होऊन कांहीं अवतार घेऊन पृथ्वीवर येत नसत. तर प्रजेच्या प्रतिनिधींनीं स्वर्गावर जाऊन जेव्हां देवांची स्तुति व प्रार्थना करावी तेव्हांच ते पृथ्वीवर जन्म घेत व लोकांची छळांतून मुक्तता करीत. पुराणान्तरीं सांपडणाऱ्या या आख्यायिका तर्काला जरी पटण्याजोग्या नसल्या तरी त्यांच्यावरून देवपदाला पोंचलेल्यांना किंवा पोंच-वलेल्यांनासुद्धां स्तुति कशी प्रिय असते तें उत्तम समजून येतें. "मरावें परी कीर्तिरूपें उरावें," हें ध्येय नजरेसमोर ठेवण्यास साधुसंत मानले गेलेल्यांनींहि उपदेशिलें आहे, यावरूनहि त्याचीच प्रतीति येते. अर्थात् 'थोर' समजले गेलेले अगर विभूतिपदाला पोंचलेले लोकहि जर कीर्तीच्या पाठीमागें लागलेले असले तर त्यांत अस्वाभाविक किंवा नवलाचें असें कांहींच नाहीं. स्वतःमध्यें असल्याचे मानलेले स्तुत्य किंवा कौतुकास्पद गुण व्यक्तीगणिक भिन्नभिन्न असतील; ज्यांनीं आपली स्तुति करावी अशी मनीषा त्या व्यक्तीला असते त्या लोकांची संख्या, पात्रता व स्थलमर्यादा हीं वेगवेगळीं असतील, स्तुतीचे अपेक्षित प्रसंगहि व्यक्ती-नुसार निरनिराळे असतील. पण आपल्यामध्यें सामान्य जनांहून भिन्न व श्रेष्ठ, असामान्य, अतुलनीय, अद्वितीय असें कांहींतरी आहे; आणि त्याबद्दल अधिकांत

अधिक लोकांनीं जास्तींत जास्त काल आपली स्तुति केलीच पाहिजे, त्यांचें तें कर्तव्य आहे व ती करून घेण्याचा आपला हक्क आहे, अशी भावना 'थोर' म्हटल्या जाणाऱ्या लोकांच्या मनांत, अगदीं अंतर्मनाच्या कोणत्यातरी एका कोपऱ्यांत, दडून बसलेली असतेच असते. एखादा धूर्त माणूस करीत असलेली आपली स्तुति, फसवण्याच्या, लुबाडण्याच्या किंवा स्वतःचा स्वार्थ साधून घेण्याच्या इराद्यानें करीत आहे हें स्तुतिप्रियाला कळून चुकलें तरी त्याला ती मनांतून नकोशी वाटत नाहीं; इतकेंच काय, पण स्तुतिपाठकानें त्याला तसें स्पष्टपणें सांगून टाकलें तरीदेखील तो तिला बळी पडतो, म्हणजे मनांत संतुष्ट होतो! अशी ही स्तुतीची किंवा कीर्तीची अजब जादूगिरी असते! पक्षप्रमुखत्व स्वतःकडे घेण्याच्या, तें बळकावण्याच्या किंवा टिकवण्याच्या मूळाशीं अन्य कोणताच व्यक्तिस्वार्थ नसला तरी हा कीर्तिस्वार्थ असतोच, याबद्दल शंका बाळगण्याचें कारण नाहीं.

## पुढाऱ्यांना अहंगंड, तर अनुयायांना न्यूनगंड

याचा एक साहजिक परिणाम म्हणजे पक्षश्रेष्ठींच्या मनांत नकळत उत्पन्न होणारी असूयाबुद्धि व कारस्थानी वृत्ति होय. तुल्यबल अगर समान सामर्थ्याच्या लोकांना पक्षांत येऊं न देणें, जे कोण तुल्यबल होऊं पाहतील त्यांना शिस्तीच्या बडग्यानें पक्षाबाहेर घालवणें किंवा त्यांची स्वार्थबुद्धि चाळवून त्यांना एखाद्या मानाच्या स्थानीं चिकटवून टाकणें इत्यादि हिकमती पक्षश्रेष्ठींना लढवाव्या लागतात. जगांतल्या कोणत्याहि राजकीय पक्षाचा इतिहास पाहिला तर, या श्रेष्ठींनीं आपलें प्रमुखत्व टिकवण्यासाठीं असल्याच उपायांचा अवलंब केला असल्याचें आढळून येतें. पक्षाच्या सभांत विचारविनिमय होतो, चर्चा चालतात, वादविवाद निकरावरहि येत असतात, ठराविक कालावधीनें पक्षाच्या अधिकाऱ्यांच्या निवडणुकाहि होत असतात. पण पक्षश्रेष्ठींचें म्हणणें कोणी अवमानूं धजत नाहीं, त्यांचें स्थान कोणी हिरावून घेऊं शकत नाहीं. एकदां निवडले गेलेले, किंवा कांटेकोर बोलायचें तर स्वयंनियुक्त झालेले श्रेष्ठी कसे दीर्घकाल–बहुधा आजन्म किंवा मरणापर्यंत–पदस्थित राहिले त्याचा अभ्यास करावा व या विधानाचें प्रत्यंतर पटवून घ्यावें. याचा दुसऱ्या बाजूनें जो परिणाम ओघानेंच घडतो तो म्हणजे, स्वतंत्र बुद्धीच्या व त्यांतल्यात्यांत निःस्वार्थी वृत्तीच्या लोकांमध्यें उत्पन्न होणारी एक प्रकारची असहाय्यता, न्यूनगंड, आत्मविश्वासशून्यता होय. आपण आपले विचार कितीहि निर्विवाद रीतीनें मांडले तरी या तल्लख बुद्धीच्या स्थिरपदस्थ श्रेष्ठींच्या इच्छेपुढें

कांहींहि चालूं शकणार नाहीं अशी त्यांची खात्री पटून चुकते; आणि पक्षांत रहावें तर निष्प्रभ होऊन, बुद्धि गहाण टाकून जीवन घालवावें व पक्षाबाहेर पडावें तर त्याच्या अवकृपेमुळें उद्भवूं शकणाऱ्या संकटपरंपरेला तोंड देण्यास सज्ज रहावें अशा चक्रापत्तींत ते सांपडत असतात! त्यामुळें ते बहुधा पक्षांतच राहतात, पण स्वतंत्र विचारशक्ति व कर्तबगारी वाढवण्याऐवजीं तिचा उपयोग खुद्द पक्ष-सभांतहि करण्याचें सोडून देतात; आणि, विधिमंडळांत असणारे पक्षसदस्य प्रतोदाच्या आदेशानुसार 'होय' किंवा 'नाहीं' म्हणणें, अथवा हात वर किंवा खालीं करणें अगर या किंवा त्या लॅबींत शिरणें एवढेंच कार्य करीत राहतात; आणि जे विधिमंडळांत नसणारे पक्षसभासद असतात ते निवडणुकांच्या प्रसंगीं पक्षनियोजित उमेदवाराला मत देणें एवढेंच आपलें इतिकर्तव्य असल्याचें मानून चालतात!

## नीचे मुंडी, उपर हाथ!

विधिमंडळांत सरकारपक्षाच्या सभासदांपैकीं किती सभासद भाषणें करतात, जे तीं करतात त्यांत किती ऐकण्यासारखीं, म्हणजे मुद्देसूद, श्रोत्यांच्या ज्ञानांत भर घालणारीं होतात; आणि किती निरर्गल, कालापव्यय करणारीं, कंटाळवाणीं, स्वपक्षाचें समर्थन किंवा स्तवन व प्रतिपक्षाची निंदा करणारीं असतात, आणि अखेरीस मतदानाच्या प्रसंगीं "नीचे मुंडी उपर हाथ" अशी त्यांची केविल-वाणी स्थिति कशी असते त्याचा आढावा कोणीहि घेऊन पहावा व या प्राण्यांच्या निसर्गदत्त बुद्धिमत्तेचा, कार्यक्षमतेचा कसा असह्य, निंद्य कोंडमारा चाललेला असतो त्याचा पुरावा पडताळून घ्यावा! स्वतंत्र विचारसामर्थ्य दिवसेंदिवस अधिकाधिक विकसित होत जावें व तें कालांतरानें संपूर्णपणें प्रकाशमान व्हावें या कार्यास पक्षांतर्गत स्वातंत्र्य कसें निरुपयोगी ठरतें तेंहि यावरून चांगलें दिसून येतें. मात्र तें पहावयाचें असलें तर पक्षनिष्ठेच्या अंधःकारस्थलांतून बाहेर पडणें जरूर आहे.

## पक्ष, पडदा, पक्षांधता

पक्ष म्हटला कीं सहजच पडदा येतो, आणि पक्षामुळें राष्ट्रांतील प्रजेमध्यें स्व-पर भेदभाव निर्माण होतो. एकदां एका पक्षाचें अस्तित्व मान्य केलें कीं, तत्पक्षियेतरांचें अस्तित्व कबूल करणें तर्कतःच प्राप्त असतें; आणि या पक्षियेतरां-

नींहि एक अगर अनेक पक्ष स्थापन करणें असमर्थनीय किंवा अनिष्ट मानतां येत नाहीं. दोन अगर अधिक पक्ष अस्तित्वांत आले म्हणजे 'स्वपक्षीय' व 'परपक्षीय' असे भेद राष्ट्रांतील मतदारांमध्यें पडून राहणें स्वाभाविक ठरतें; आणि या पक्षांची आपापसामध्यें चुरस किंवा प्रतिस्पर्धा असलीच पाहिजे ही गोष्टहि मान्य करणें भाग पडतें. कारण, राष्ट्र किंवा सरकार यांचें राष्ट्रोद्धाराच्या कार्यक्रमाबद्दलचें ध्येय व धोरण यांच्यांत सर्व पक्षांमध्यें मतैक्य आहे, असें मानावें तर पक्ष-प्रतिपक्षांची आवश्यकताच उत्पन्न होऊं शकत नाहीं; आणि त्यांतील एका अगर अनेक बाबतींत पक्षांमध्यें मतभेद आहेत असें मानावें तर आपापल्या मतानुसार राज्यकारभार हांकण्यासाठीं अधिकारारूढ होण्याची तीव्र मनीषा त्या सर्वच पक्षांमध्यें असली पाहिजे हें मान्य करण्याशिवाय गत्यंतर उरत नाहीं! अर्थात् या महत्त्वाकांक्षेमुळें पक्षांची आपापसांत स्पर्धा लागणें व ती तीव्रतर होत जाणें क्रमप्राप्तच ठरतें. स्पर्धेंत टिकाव धरावयाचा व प्रतिपक्षावर मात करावयाची तर स्वतःचा पक्ष संख्याबलानें होईल तितका मोठा करणें अपरिहार्यच असतें. त्यामुळें नागरिकांची व मतदारांची संख्या आपल्या बाजूस ओढण्यासाठीं हरप्रकारचे उपाय व युक्त्या योजणें प्राप्त होऊन बसतें. त्यासाठीं त्यांच्यावर भिडांचा भडिमार व धाकदपटशाचा प्रयोग केला जातो. कांहींना आमिषें दाखवलीं जातात, तर कांहींना मानाच्या मोहांत गुंतवलें जातें. आणि जेथें हे अनाचार अपुरे पडतात किंवा निरुपयोगी ठरतात तेथें अत्याचारहि केले जातात! युद्ध–मग तें शांततापूर्ण मार्गांनींच का असेना–करून प्रतिपक्षावर विजय मिळवायचाच असा एकदां निर्धार केला म्हणजे, रणांगणांत उतरलेल्या सर्वच पक्षांचा तोल सुटणें, विवेकापासून, सत्यापासून दूर होऊन असत्य व असत् यांचा आश्रय धरणें, स्वाभाविकच असतें. वास्तविक, निवडणुका म्हणजे लोकमताचें शुद्ध, स्पष्ट, संपूर्ण प्रतिबिंब जाणून घेण्याचा प्रभावी उपाय; पण या निवडणुकांच्या पायीं कोणकोणतीं पापें केलीं जातात व तीं करण्याच्या बाबतींत सर्वच पक्षांची कशी शर्यत लागून राहते हें कोणास वर्णन करून सांगण्याची गरज नसते. अर्थात्, निवडणुकांचा खराखुरा उद्देश बाजूलाच रहातो! निवडणुका जिंकण्यासाठीं शक्य तितका मोठा प्रचार, सतत प्रचार, भंपक प्रचार चालू होतो. स्वपक्षाच्या स्तुतीच्या व प्रतिपक्षाच्या निंदेच्या नद्या वाहविल्या जातात. निवडणुकांत जो कोण स्वपक्षाच्या उमेदवारास अधिकांत अधिक मतें मिळवून देण्यास किंवा स्वतःसाठीं मिळवण्यास समर्थ वाटत असेल तो स्वार्थांध, लोकहितविरोधी कृत्यें करणारा, पूर्वबहिष्कृत असला तरी त्याला पक्षांत ओढून घेतलें जातें, किंवा

उमेदवार म्हणून उभें करण्यांत येतें, त्याला पक्षांत ठेवून घेण्यासाठीं त्याच्या स्वार्थी कारवाया चालू दिल्या जातात, त्याच्या बेकायदेशीर कृत्यांवर पांघरूण ओढण्यांत येतें. एखादा उमेदवार निवडणुकांत पडला तर दुसऱ्या मतदार-संघांतील नियुक्त प्रतिनिधीला राजीनामा देण्यास लावून त्या संघातर्फे पूर्वपराभूत उमेदवाराला उभें केलें जातें व सर्व खटपटी लटपटी लढवून त्याला निवडून आणलें जातें. हें कृत्य, राजीनामा देण्यास लावलेल्या प्रतिनिधीच्या अधिकाराचा अपहार व वैयक्तिक प्रतिष्ठेचा अपमान करणारें जसें असतें तसेंच त्याच्या मतदार-संघांतील मतदारांचा विश्वासभंग करणारेंहि असतें. शिवाय, मारून–मुटकून निवडून आणलेल्या नव्या प्रतिनिधीलाहि तें भूषणास्पद नसतें. पण तें करतांना पक्षांतील सारेच लोक जनलज्जा मनलज्जा कोळून पीत असतात. असे पराभूत उमेदवार थोडेसे विशेष तोलाचे असले तर त्यांच्यासाठीं पक्षाच्या घटनेंत व नियमावलींत तडकाफडकीं फेरफार घडवून आणले जातात व भलभलत्या नीतिबाह्य मुद्यांवर त्यांचें समर्थन केलें जातें !

पक्ष म्हटला कीं स्व-पर भेदभावनिर्मिता पडदा जसा उत्पन्न होतो तद्वतच पक्षांधताहि कशी उत्पन्न होते तें यावरून दिसून येईल. पक्ष म्हटला कीं पक्षांधता ही आलीच पाहिजे. ती त्याची जन्माचीच सहचारिणी असते व त्यांचा विवाह-विच्छेद अशक्य असतो. एक वेळ प्रकाशांतील वस्तु सावलीला सोडील, अग्नि उष्णतेचा त्याग करील, ध्वनि आवाजापासून दूर राहील, पृथ्वी आपलें भ्रमण बंद करील; पण पक्ष पक्षांधतेचा अव्हेर करूं शकणार नाहीं ! या पक्षांधतेला पक्षप्रेम, पक्षनिष्ठा इत्यादि सुंदर, कोमल, गोजिरवाण्या शब्दांनीं गौरविलें जातें, शृंगारण्यांत येतें हें खरें, पण पक्षनिष्ठा म्हणजे मूलतः व सारतः अंधताच असते !

## पक्षशुद्धीचा अन्वयार्थ !

पक्षाचा एखादा सभासद ही अंधता सोडून डोळस व्हावयास लागला तर पक्षश्रेष्ठी अधिकृत यंत्रणेमार्फत त्याच्यावर शिस्तभंगाचें शस्त्र चालवण्यास कमी करीत नाहींत. त्याला पक्षबाह्य करूनच ते थांबतात असाहि विश्वास धरतां येत नाहीं; तर त्याला सार्वजनिक जीवनांतून अजिबात उठवून लावण्याचा आणि त्याचें खाजगी जीवनहि दुःखमय करण्याच्या कारवाया खेळण्यास ते तत्पर राहूं शकतात. हें सारें अर्थात्च, "पक्षशुद्धीच्या" गोंडस नांवाखालीं केलें जातें. अनेक थोर थोर लोकांचीं शिरकाणेंहि, या पक्षशुद्धीच्या ऊबदार नांवाखालीं उडवलीं

गेल्याचीं व जात असल्याचीं उदाहरणें राजकीय पक्षाच्या इतिहासांत पुष्कळच सांपडलेलीं आहेत. "पक्षशुद्धि" करण्याचे प्रसंग सर्व राष्ट्रांतल्या सर्व पक्षांवर वारंवार येत असतात, याचा अर्थ हाच कीं, जन्मजात ते अशुद्ध होत राहतच असतात; विकृति हीच त्यांची प्रकृति असते आणि त्यांची संस्कृति ही अशक्य, अप्राप्य, असाध्य अशी गोष्ट असते. तसें नसतें तर पक्षशुद्धीचे प्रसंग पुनः पुनः कां उत्पन्न झाले असते? पण पक्षांधतेमुळें ही वस्तुस्थिति कोणाच्याच लक्षांत येत नसते. पक्षशुद्धीचा अर्थ, स्वार्थांध, नीतिशून्य, राष्ट्रद्रोही लोकांची हकालपट्टी असा नसतोच मुळीं; तर पक्षश्रेष्ठींचे अंधभक्त, स्तुतिपाठक, सांगकामे होऊं न शकणारे; आपल्या निसर्गदत्त बुद्धिमत्तेचा, कर्तृत्वशीलतेचा, नीतिप्रियतेचा स्वतंत्रपणें उपयोग करूं पहाणारे जे कोण विरोधक असतील त्यांची मुस्कटदाबी व कापाकापी हाच तिचा खराखुरा अन्वयार्थ असतो! एखाद्या सामर्थ्यवान पक्षसभासदाचा थोडासा संशय पक्षश्रेष्ठींना येऊं लागला म्हणजे हे त्याच्यावर गुप्तहेराची रवानगी करतात; या हेराविषयीं शंका उद्भवली म्हणजे हेरावर हेर नेमला जातो आणि या दुसऱ्यावर पुनः तिसरा हेर योजण्याची गरज भासणार नाहींच असा नेम धरतां येत नाहीं! असें हें राक्षसचक्र सारखें गरगर फिरत राहत असतें आणि शिरकाणांमागून शिरकाणें घडवून आणण्याचें कार्यहि पक्षश्रेष्ठींना चालू ठेवणें प्राप्त होऊन बसतें. पण लक्षांत ठेवण्यासारखा मुद्दा हा कीं, एवढी मोठी भरघोंस पक्षशुद्धि करूनहि ते अशुद्ध ते अशुद्धच राहत असतात! तात्पर्य हें कीं, राजकीय पक्ष हें प्रकृतीनेंच विकृतियुक्त असतात व त्यांची संस्कृति ही असाध्य गोष्ट असते!

---

# पक्षविकृतीचे राष्ट्रासी दुष्परिणाम

## सूडबुद्धीचें चक्र

राष्ट्रांत जो सत्ताधारी पक्ष असतो तो सत्ताभिलाषी असतो म्हणूनच सत्तारूढ झालेला असतो हें अगदीं उघड आहे. पण एकदां तो अधिकारपदस्थ झाला म्हणजे इतर पक्षांना 'सत्तापिपासू' अशी शिवी हांसडून निर्लज्जपणें हिणवूं पहातो, हें मागें सांगितलेंच आहे. पण तेवढ्यावरच तो थांबत नाहीं; तर निवडणुकांत प्रतिपक्षांना विजय मिळूं नये याबद्दल अगोदरपासूनच काळजी घ्यावयास लागतो. एका पक्षावर तो अत्याचारी असल्याचा आरोप सरकारपक्षीय लादीत असतात, तर दुसऱ्यावर तो राजसत्तेच्या जीवावरच उठलेला अराज्यवादी पक्ष असल्याचा प्रचार करीत असतात. त्यांना देशद्रोही, समाजघातकी, आततायी, अविचारी, अव्यवहार्य, परराष्ट्रधार्जिणे इत्यादि नांवें ठेवून प्रसंगीं त्यांना बेकायदेशीर ठरवण्यास व त्यांच्या पुढाऱ्यांना कारागृहांत डांबण्यासहि पक्षीय सरकार कमी करीत नाहीं. या आरोपांत कधींच तथ्य नसतें अशांतला भाग नाहीं. तथापि, पुष्कळ वेळां सरकार, राईचा पर्वत करून निवडणुकांतील विजयासाठीं अन्य पक्षपुढाऱ्यांना धारेवर धरण्यास धजतच नाहीं, असेंहि नव्हे. हें करतांना समर्थनीय कारणें मिळावींत म्हणून तें, राष्ट्र अंतर्गत बंडाळीच्या व परराष्ट्रीय आक्रमणाच्या धोक्यांत असल्याचा बकवाहि करूं शकतें; व त्या निमित्तानें एकंदर नागरिकस्वातंत्र्याचा अपहार व उपमर्द करणारे तात्पुरते कायदे किंवा वटहुकूमहि जारी करण्यास क्षीति बाळगीनासें होतें. अर्थात् ज्या शांतता व सुव्यवस्थासंरक्षणाच्या नांवानें हें सारें केलें जातें तें बिघडवण्यास हा सत्ताधारी पक्षच इतरांआधीं कारणीभूत होत असतो! प्रतिपक्षांशीं अशा रीतीनें वागल्यामुळें सत्तारूढ पक्षाविषयीं त्यांच्या मनांत द्वेषबुद्धि निर्माण होऊन राहणें मनुष्यस्वभावास धरून असतें. त्यामुळें तो पक्ष सत्ताच्युत होऊन दुसरा पक्ष सत्तारूढ झाला म्हणजे तो पहिल्याचा वचपा त्याच उपायांनीं व त्याच मापांनीं घेत असतो. अर्थात् एकमेकांचा सूड उगवण्याचें एक दुष्ट चक्र राष्ट्रांत उत्पन्न होत असतें.

## लोकशाहीच्या मूलतत्त्वांवर घाव

प्रथम मतदारांची, व नंतर निवडणुकींत विजय मिळवून प्रतिनिधि बनलेल्या उमेदवारांची विचारशक्ति, म्हणजे हरेक प्रश्नांच्या बाबतींत योग्य मत बनवण्याची पात्रता, जितकी अधिक विकसित होईल तितकी ती होण्यास वाव मिळणें हें लोकशाहीसाठीं अपरिहार्य असलेल्या पांचांपैकीं आद्य तत्त्व आहे, हें आपण मागें पाहिलेंच आहे. पण पक्षसंघटना ही जर पहिला घाव कोणावर हाणीत असेल तर या पहिल्या तत्त्वावरच होय. पक्ष म्हटला कीं त्याच्या विस्तारासाठीं प्रचार हा आलाच. पण पक्षप्रचारांत असत्याला सत्याचा मुलामा चढवला जातो, मतदारांना अशक्य आश्वासनें दिलीं जातात, देशोद्धाराच्या बड्याबड्या पण अवास्तव योजना लोकांपुढें ठेवल्या जातात; कृतीपेक्षां उक्तीला, सहजतेपेक्षां कृत्रिमतेला महत्त्व दिलें जातें. प्रतिपक्षाच्या कार्यक्रमाची अवास्तव निंदा केली जाते, स्वपक्षाच्या कार्यक्रमाचीं स्तुतिस्तोत्रें अत्युक्तीनें गायिलीं जातात. त्यामुळें मतदारांची दिशाभूल होते, सत्यापासून असत्य वेगळें काढण्याच्या कामीं ते असमर्थ ठरतात, त्यांची बुद्धि गोंधळून जाते. अशा स्थितींत ते वस्तुस्थितीचें यथार्थ ज्ञान, सत्याचें स्पष्ट दर्शन कसें घेऊं शकतील ? आणि तें जर त्यांना घेतां आलें नाहीं तर ते योग्य मत कसें बनवतील ?

निवडणुकीसाठीं सत्पात्र उमेदवार उभे राहणें ही लोकशाहीसाठीं अपरिहार्य असणारी दुसरी गोष्ट. पण पक्षपद्धतीच्या राजकारणांत जो तो पक्ष उमेदवाराच्या बौद्धिक व नैतिक पात्रतेपेक्षां त्याची निवडून येण्याची सांपत्तिक व हिकमतगारीची पात्रता किती आहे याच्याकडेच अधिक लक्ष देतो, आणि बिचाऱ्या मतदारांना अत्यंत तिरस्करणीय वाटणाऱ्या उमेदवारालाहि आपलें पवित्र मत देण्याच्या पातकांत पडावें लागतें.

अनिर्बंध मतदान हें लोकशाहीचें तिसरें मूलतत्त्व. पण पक्ष म्हटला की शिस्त ही आलीच; आणि शिस्त आली कीं मतदानाचें स्वातंत्र्य गेलेंच म्हणून समजावें !

मतदारांची मतदानकेंद्रावर जाण्याची शक्ति व योग्य वेळीं मतदान करण्याची दक्षता या ज्या लोकशाहीसाठीं आवश्यक असणाऱ्या आणखी दोन गोष्टी त्या मात्र चांगल्या रीतीनें अंमलांत येण्यास पक्षसंघटना कारणीभूत होत असतात. अपंग व अकिंचन मतदारांना मतपेट्यांपर्यंत पोंचवण्याची व त्यांच्याकडून वेळेवर मतदान करून घेण्याची खबरदारी सर्व पक्ष घेत असतात. परंतु, अनेक मत-

दारांच्या स्वार्थाला संतुष्ट करूनच किंबहुना त्यांना एकप्रकारच्या अनैतिक कार्यास प्रवृत्त करूनच पक्षांना हें कार्य पूर्णत्वानें सिद्धीस नेणें शक्य असतें. अगदीं थोडक्यांत सांगावयाचें तर निवडणुकांतील पक्षाचें बरेंचसें मतबल हें या नैतिक दोषानें बरबटलेलें असतें. अर्थात्, तें लोकशाहीच्या पावित्र्याला बाधकच मानणें प्राप्त ठरतें.

निवडणुकांतील प्रचाराच्या प्रसंगीं व प्रत्यक्ष मतदानाच्या समयासहि पक्ष-प्रतिपक्षांची, आधीं तोंडातोंडी, नंतर गुद्दागुद्दी, मागाहून मारामारी आणि अखेरीस खुनाखुनीपर्यंत पाळी जात असल्याचेंहि अनेक राष्ट्रांत अनेक वेळीं दिसून आलेलें आहे. लोकशाहीसाठीं एकंदर वातावरणांत सत्य-अहिंसेचें वारें भरून राहणें कसें आवश्यक असतें तेंहि मागें आपण पाहिलें आहे. पण राष्ट्रांत एकदां पक्षबाजी बोकाळली म्हणजे हें वारें वितळून जाणें साहजिकच होऊन राहतें !

सारांश, पक्षपद्धतीचें राजकारण हें लोकशाहीच्या प्राणभूत अशा सर्वच तत्त्वांचा संहार करण्यास कारणीभूत असतें ! अर्थात् त्याचे दुष्परिणाम केवळ पक्षासच ग्रासून न थांबतां ते सर्वच राष्ट्राचा ग्रास घेत असतात !

## महापुरुषांचें सहकार्य अशक्य ठरतें

पण इतक्यानें संपत नाहीं. पक्षीय राजकारणामुळें सबंध राष्ट्र एका अति-महत्त्वाच्या कार्यास मुकत असतें आणि तें म्हणजे, जवळजवळ तुल्यबळ, बहुतेक समसमान योग्यतेच्या महापुरुषांचें सहकार्य होय. पक्षाचें उगमस्थान व प्रकृतिमान हीं जात्याच अशीं द्वाड असतात कीं, तीव्र बुद्धिमत्तेच्या, विशाल कार्यक्षमतेच्या, अत्युच्च नीतिमत्तेच्या, तळमळीच्या राष्ट्रभक्तीच्या आणि धीरगंभीर पण स्वतंत्र वृत्तीच्या महान् नरपुंगवांनीं एकत्रित होऊन सुखासमाधानानें आणि मानसन्मानानें राष्ट्राचा प्रपंच चालवावा हें त्यांना मानवूंच शकूं नये ! त्यामुळें तुल्यबळ नरश्रेष्ठांचीं महान् सामर्थ्यें संघटित होण्याऐवजीं बहुधा विघटितच राहत असतात. अर्थात्, तीं परस्परांना छेद देण्यांत किंवा आपापला प्रपंच वेगळा थाटण्यांत खर्च होऊन जातात. अखिल राष्ट्राच्या दृष्टीनें उच्च शक्तिसंचयाचा हा मोठाच अपव्यय असतो. हीं सर्व तुल्यबळ सामर्थ्यें एकवटून जर राष्ट्रकार्य हांकूं लागलीं असतीं तर एकेका राष्ट्राचाच काय पण सबंध जगाचाच संसार सुखमय झाला नसता काय, असा प्रश्नहि मनांत उभा राहिल्याशिवाय राहत नाहीं. आणि पक्षपद्धतीच्या राजकारणाचें जें पिशाच जगाच्या मानगुटीवर बसलें आहे तें त्यानें झटकून टाकल्याशिवाय

असें सहकार्य शक्य नाहीं, हेंच उत्तर त्याला मिळत असल्यामुळें त्या पिशाच्चाचा तिटकारा अधिकच वाटल्याशिवायहि राहत नाहीं !

## अपरिहार्य काय तें नीट ध्यानांत ठसवा

कोणी म्हणेल, " राजकीय पक्ष हे लोकशाहीला घातक आहेत हें समजलें; आणि जे घातक ते अनावश्यक होत, हें मान्य करणें क्रमप्राप्त ठरतें, हेंहि पटलें. पण ते अपरिहार्य, टाळतां न येणारे आहेत एवढें तरी तुम्ही कबूल करणार नाहींत का? तुम्हीच म्हणतां कीं, निसर्गानें जेव्हां भिन्न भिन्न मस्तकें निर्माण केलीं तेव्हांच भिन्न भिन्न मतेंहि जन्मास आलीं आणि त्यांचें साम्य किंवा वैषम्य यांना अनुसरून भिन्न भिन्न गटहि उत्पन्न झाले. तेव्हां मतभेदजन्य गट जर नैसर्गिक किंवा अपरिहार्य तर पक्षहि अपरिहार्यच होत असें मानणें ओघानेंच भाग पडत नाहीं काय? आणि जर तें पडलें तर पक्षपद्धतीचें राजकारणच त्यांतल्या त्यांत अधिक निर्दोष रीतीनें, किंबहुना लोकशाहीला पोषक ठरेल अशा पद्धतीनें कसें चालवतां येईल त्याचा विचार करणें हेंच क्रमप्राप्त ठरणारें कर्तव्य होत नाहीं काय?"

याचें उत्तर हेंच कीं, जें अटळ, अपरिहार्य आहे तें राजकीय पक्षांचें संघटन नव्हें; तर मतभेदांचें व तदुत्पन्न भिन्न भिन्न गटांचें किंवा फळ्यांचें प्रसंगजन्य अस्तित्व होय. हे गट आणि राजकीय पक्ष हे एक नव्हत. राजकीय पक्ष हे मनुष्यनिर्मित आहेत, तर मतभेदजन्य गट हे निसर्गनिर्मित आहेत. मनुष्य-निर्मित किंवा कृत्रिम आणि निसर्गनिर्मित किंवा साहजिक यांच्यामधील भेदरेषा नक्की ठरणें कठीण आहे हें खरेंच; पण तारतम्य बुद्धीचा उपयोग करून त्यांतील फरक आपणांस अंदाजतां खास येतो. राजकीय पक्षांना एक घटना असते, त्यांचें सभासदत्व ठराविक अटी पुऱ्या करणाऱ्यांनाच मिळूं शकतें; ते शिस्तबद्ध असतात; तर मतभेदजन्य गटांतील लोकांमध्यें असलें कोणतेंच बंधन नसतें. राजकीय पक्ष हे कोणीतरी पुढाकार घेऊन उत्पन्न केलेले असतात; तर मतभेद-जन्य गट हे आपोआपच जन्मास आलेले असतात. अपरिहार्य, टाळतां न येणारे ते हे गट होत, मुद्दाम निर्माण केलेले राजकीय पक्ष नव्हत !

## 'मूले कुठारः'

अशा रीतीनें राजकीय पक्ष हे लोकशाहीला अपरिहार्य नव्हत व आवश्यकहि नव्हत, तर उलट अनिष्ट किंवा घातक होत हें एकदां मान्य केलें म्हणजे एकपक्षीय

लोकशाही अधिक चांगली कीं, द्विपक्षीय अगर बहुपक्षीय लोकशाही अधिक चांगली हे प्रश्न मुळांतच खुंटून पडतात. पण ज्यावरून तुल्यबळ अशी द्विपक्षीय लोकशाही चांगली हा विचार आज जगावर साम्राज्य चालवीत आहे; अनेक राष्ट्रांत एकाहून अधिक राजकीय पक्ष दिसून येतात ही वस्तुस्थिति आहे, आणि एकपक्षीय लोकशाही म्हणूनहि एक राज्यपद्धति असूं शकते असा एक विचार-प्रवाह कांहीं राष्ट्रांत जोरानें शिरूं लागला आहे, त्यावरून त्यांचाहि थोडा समाचार घेणें प्राप्त आहे. शिवाय, राजकीय पक्ष मुळांतच नसले तर मंत्रिमंडळ कोण बनवणार, किंवा व्यवहारांत ज्याला 'सरकार' म्हणतात तें कसें प्रस्थापित करण्यांत येणार असा प्रश्नहि ज्यावरून अनेकांना पडत असतो त्यावरून त्याचींहि उत्तरें देणें प्राप्तच आहे. कारण त्याखेरीज राजकीय पक्षपद्धतीचे लोकशाहीशीं असलेले अहिनकुल संबंध वाचकांना संपूर्णपणें कळून येणार नाहींत.

# पक्ष व कार्यक्रमाची बजावणी हीं अविच्छेद्य नाहींत

लोकशाहीला राजकीय पक्ष अपरिहार्य नाहींत, आवश्यकहि नाहींत आणि इष्टतर नाहींतच नाहींत, असें म्हटलें म्हणजे कोणाच्याहि मनांत दोन प्रश्न उभे राहतात. पक्ष नसले तर राष्ट्रकल्याणाच्या कार्यक्रमाची आंखणी व अंमलबजावणी कशी होणार ? व मंत्रिमंडळ कोण बनवणार ? हेच ते दोन प्रश्न होत. हे प्रश्न आपल्या प्रतिपाद्य विषयाशीं अधिक निगडित आहेत. म्हणून त्यांचीं उत्तरें आधीं शोधूं. पक्षपद्धतीमुळें लोकशाही विकृत होते, तींत भयंकर दोष शिरतात व ते द्विपक्षीय अगर बहुपक्षीय लोकशाहीमुळें–म्हणजे विधिमंडळांत अधिकारारूढ पक्षाशीं तुल्यबळ असा विरोधी किंवा पर्यायी पक्ष असल्यामुळें–लोप पावूं शकत नाहींत ; आणि 'एकपक्षीय लोकशाही' म्हणजे तर सुधारून वाढविलेली हुकूमशाहीचीच पुनरावृत्ति होय ! पण हे विषय, आपल्या मुख्य प्रतिपाद्याशीं, त्या मानानें, कमी निगडित आहेत. म्हणून त्यांचा विचार मागाहून करूं.

## पक्षांची आवश्यकता कां भासते ?

प्रथम, पक्षांची आवश्यकता कोणत्या मुद्यावर प्रतिपादली जाते तें पाहूं. राष्ट्रांतील प्रजेच्या कल्याणाच्या कितीहि चांगल्या योजना एखाद्या नागरिकानें आंखल्या तरी त्या अंमलांत कशा आणावयाच्या ? त्या सार्वत्रिक व परिपूर्ण रीतीनें आणि सातत्यानें व्यवहारांत उतरावयाच्या तर सरकारनेंच हातांत घेतल्या पाहिजेत; एखाद्या व्यक्तीला किंवा व्यक्तिगटालाहि हें कार्य पार पाडतां यावयाचें नाहीं; पण सरकारच्या किंवा मंत्रिमंडळाच्या मार्फत त्या पार पाडून घ्यावयाच्या म्हणजे त्यांना प्रतिनिधिमंडळांतील बहुसंख्य सभासदांचें मत अनुकूल पडणें अवश्य असतें ; प्रतिनिधिमंडळाच्या बहुमताच्या मर्जीविरुद्ध मंत्रिमंडळाला कोणताच कायदा अंमलांत आणतां येत नाहीं, तेव्हां ज्या एका अगर अधिक प्रतिनिधींना आपला लोकहितवर्धक कार्यक्रम सरकारमार्फत अंमलांत आणून घ्यावयाचा असतो त्यांना आपल्या त्या कार्यक्रमाला विधिमंडळांतील बहुसंख्य प्रतिनिधींचें मत

अनुकूल करून घेणें भाग पडतें; अर्थात्, कार्यक्रमाचे जनक प्रतिनिधि स्वतःच्या मताशीं जुळणाऱ्या व जुळवून घेऊं शकणाऱ्या अन्य प्रतिनिधींची जुळवाजुळव करून घेऊं लागतात; परंतु निवडणुका होऊन गेल्यावर सहजगत्या जे प्रतिनिधि निवडून येतात त्यांच्यामध्यें स्वतःच्या मतांशीं जुळवून घेणारे प्रतिनिधि हवे तितके सांपडतीलच असा भरंवसा कार्यक्रमवाल्या प्रतिनिधींना धरतां येतोच असें नाहीं; तेव्हां निवडणुकांसाठीं उमेदवार उभे करतांनाच ते आपल्याशीं सहमत व सहकार्य करणारे असावे अशी तजवीज करणें त्यांना जरूरीचें वाटतें; पण असे सहकार्यकर्ते उमेदवार हटकून निवडून यावयाचे तर त्याच्याहि मूळाशीं जाऊन मतदारांची बहुसंख्या आपल्या लगामीं लावणें त्यांना क्रमप्राप्त ठरतें; पण अशी जुळवाजुळव दर निवडणुकीच्या समयास करण्यासाठीं थांबून राहिलें असतां ती यशस्वी निघतेच अशी खात्री बाळगतां येत नाहीं; म्हणून सहमतवाल्या मतदारांची अशी जुळवाजुळव कायमच्या स्वरूपांतच करून ठेवणें त्यांना अपरिहार्य होत असतें; इतकेंच नव्हे तर, अधिकांत अधिक मतदार आपल्याशीं सहकार्य करणारे निघतील अशा अनेक युक्त्याप्रयुक्त्या योजणें त्यांना प्राप्त होत असतें; हेंच थोडक्यांत सांगावयाचें तर कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठीं मंत्रिमंडळ मुठींत ठेवणें, त्यासाठीं विधिमंडळांतील बहुसंख्य सभासदांना आपल्या गोटांत ओढणें, त्यासाठीं उमेदवारांची निवड स्वमतानुसार करणें, आणि त्यासाठीं मूळ मतदारांनाच आपल्या कच्छपीं लावणें अशी ही कार्यपरंपरा असून तिचेंच नांव राजकीय पक्षाची उभारणी किंवा संघटना हें आहे, आणि पक्ष म्हटला कीं 'शिस्त' आदीकरून सर्व लक्षणांनीं तो सुसज्ज करणें हें क्रमतःच प्राप्त ठरणारें कर्तव्य आहे. राजकीय पक्षांचे समर्थक ज्या मुद्द्यांवर किंवा कोटिक्रमांवर त्यांची आवश्यकता प्रतिपादन करतात ते हे असे आहेत. राजकीय पक्षांच्या उद्गम-विकासाची जी मूलभूत उपपत्ति मागें दिली आहे ती पक्षवादी लोक सांगूं शकत नाहींत व समजूंहि शकत नाहींत. त्यांच्या मतें, राष्ट्रोद्धाराच्या कार्यक्रमाची सुकर, सुसंगत, सर्वांगीण व सातत्ययुक्त अंमलबजावणी हेंच पक्षसंघटनेचें मुख्य उद्दिष्ट असतें, व तिच्याशिवाय तें सिद्धीस जाणें अशक्य असतें.

## पक्षांत विकृति केव्हां शिरते?

त्यांच्या या प्रतिपादनांत बरेंच तथ्य आहे, असें आपण क्षणभर गृहीत धरूं. कार्यक्रमाची आंखणी व त्याच्या अंमलबजावणीची इच्छा हीं नेहमींच अप्रामाणिक

व स्वार्थप्रेरित असतात, असें मुळींच नव्हे; अनेक वेळां ती खरोखरच प्रांजळ व राष्ट्रोद्धारकारक असतात, आणि म्हणून पक्षसंघटनेला जेव्हां प्रारंभ होतो तेव्हां निःस्पृह, निःस्वार्थी, पराक्रमी, बुद्धिमान असें देशहितैषी लोक तींत प्रवेश करून घेत असतात. एखादें राष्ट्र जेव्हां पारतंत्र्यांत असतें तेव्हां स्वातंत्र्य संपादन करावयास धडपडणाऱ्या पक्षांत तर निःस्वार्थी, पराक्रमी तरुणांचा भरणा फार मोठ्या प्रमाणांत होत असतो. तथापि पक्ष जेव्हां सत्ताधारी होऊन बसतो तेव्हां त्यांत शिरण्यासाठीं स्वार्थी व कावेबाज लोकांची जणुं काय शर्यतच लागून राहत असते. पक्षाच्या प्रवर्तकांना किंवा नेत्यांना सभासदांच्या अधिकांत अधिक संख्येची गरज असल्यानें ते अशा लोकांना प्रतिबंध करूं शकत नाहींत; इतकेंच काय तर अनेकांच्या नीच, देशद्रोही, बेकायदेशीर कृत्यांकडेहि दुर्लक्ष करणें त्यांना भाग पडतें व प्रसंगीं त्यांचें समर्थन करणेंहि नशिबांत येतें. पक्ष मूळांत शुद्ध असला तरी येथेंच तो अशुद्ध होऊं लागतो, त्याच्या अधोगतीस प्रारंभ होतो आणि मागें वर्णन केलेले सर्व दोष किंवा विकृति त्यांत अपरिहार्यपणें उत्पन्न होतात. तेव्हां, पक्षांत जे कोणी खरोखरीचे सच्चे देशभक्त होते ते हळुहळू बाहेर पडूं लागतात; आणि अखेरीस, (मागें म्हटल्याप्रमाणें) कांहीं थोड्या महत्त्वाकांक्षी, तेजस्वी व धूर्त लोकांनीं आपल्याभोंवतीं गोळा केलेल्या स्वार्थी, आपमतलबी किंवा भोळसट लोकांचा घोळका म्हणजे पक्ष, अशी त्याची स्थिति होऊन बसते! त्यामुळें, 'कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठीं पक्षस्थापना' अशी जी प्रारंभींची अवस्था होती ती विपरीत होऊन 'पक्षसंवर्धनासाठीं कार्यक्रमाची आंखणी अशी उलटी अवस्था प्राप्त होत असते! अर्थात्, हा कार्यक्रम राष्ट्रहितकर असण्याऐवजीं पक्षहितकर ठेवण्याकडे आधीं व अधिक लक्ष देणें भागच पडतें. पण तो सर्वलोकहितसंवर्धक आहे असा भास उत्पन्न करणें त्याहूनहि जरूरीचें भासतें. मतदारांची प्रचंड संख्या आपल्या पक्षांत ओढण्यासाठीं स्वतःचा कार्यक्रम अन्य पक्षांच्या कार्यक्रमापेक्षां अधिक सरस, व्यवहार्य, राष्ट्रहितकर आहे, असें समर्थन करावें लागतें व अनेक प्रसंगीं खरोखरच तसा तो आंखणेंहि भाग पडतें. त्यामुळें शक्याशक्यतेचा व तो अंमलांत आणण्याच्या स्वतःच्या सामर्थ्याचा विचारहि पक्षनेत्यांना जाणूनबुजून डोळ्यांआड करणें इष्ट वाटूं लागतें. अगदीं थोडक्यांत सांगावयाचें तर, कार्यक्रम आंखतांना दृष्टि अखिल जनतेवरून दूर होऊन ती स्वपक्षसंरक्षण व परपक्षनिर्दाळण या कार्यावरच अधिक खिळून बसते. पक्षबाज लोकांना हें कळत नाहीं, अशांतला भाग नाहीं. पण पक्षाशिवाय कार्यक्रमाची

अंमलबजावणी शक्य नाहीं असा जो त्यांनीं आपला पक्का ग्रह निष्कारण करून घेतलेला असतो त्यामुळें अगतिक होऊन या परिस्थितीला ते शरण-जात असतात !

## ही घ्या पक्षाशिवाय कार्यक्रमाची बजावणी !

म्हणून, कार्यक्रमाची बजावणी व पक्ष यांचा अविच्छेद्य असा कार्यकारणसंबंध नाहीं हें दाखवून देणें आवश्यक ठरतें. विधिमंडळांत, आणि अर्थातच राष्ट्रांतहि, राजकीय पक्ष मुळींच नसले, विधिमंडळाचा प्रत्येक सभासद स्वतंत्र किंवा पृथक्-पृथक् असला आणि त्यांच्यामध्यें जरी मतभेद असले तरी त्यांतलाच एखादा सभासद किंवा एखादा मंत्रि विवक्षित कार्यक्रम अगर योजना कायद्याच्या अगर ठरावाच्या मसुद्याच्या रूपानें विधिमंडळाच्या विचारासाठीं, अभिप्रायासाठीं व निर्णयासाठीं त्याच्यासमोर मांडूं शकणारच; विधिमंडळांत त्या कार्यक्रमाच्या अंगांप्रत्यंगांवर वादविवाद, साधकबाधक चर्चा होणारच आणि त्याचें पृथक्करण होतां होतां अखेरीस प्रत्येक कलमावर किंवा मुद्द्यावर प्रतिनिधींना 'होय' किंवा 'नाहीं' या दोहोंपैकीं एक कांहींतरी म्हणावेंहि लागणारच. अर्थात्, कांहीं प्रतिनिधि कांहीं मुद्द्यांवर अनुकूल मत देतील, तर कांहीं प्रतिकूल मत देतील. कांहीं मुद्यांवर सर्वच प्रतिनिधी अनुकूल निर्णय देतील, तर कांहीं मुद्दे सर्वचजण सपशेल फेंटाळून लावतील; आणि अशा प्रकारें बहुमतानें किंवा एकमतानें मूळ योजनेंतील एकंदर कलमांचा निकाल लागून नवी सुधारलेली योजना अगर कार्यक्रम तयार होईल; व मग मंत्रिमंडळ त्याची अंमलबजावणी केल्याशिवाय राहूं शकणार नाहीं. पक्ष नसले तर विधिमंडळांतले लोकप्रतिनिधि व तन्नियुक्त मंत्रि कांहीं बोलणारहि नाहींत व करणारहि नाहींत, तर तेथें जाऊन निर्जीव पुतळ्यांप्रमाणें गुपचूप बसूनच राहतील, असें गृहीत धरून चालण्याचें काय कारण आहे ? जगांतील कोणत्याहि राष्ट्राच्या लोकसभेंत अपक्ष किंवा स्वतंत्र सभासद हे थोडेतरी असतातच; त्यांतले कांहींजण, कायद्यानें दिलेल्या अधिकारानुसार, ठराव किंवा कायद्याचे मसुदे विधिमंडळांत मांडतातच आणि त्यांच्यावर चर्चा होऊन ते बहुमतानें अगर एकमतानें पास अगर नापासहि होतातच. मग लोकसभेंतले सर्वच सभासद जर असे अपक्ष किंवा पक्षातीत असले तर मात्र हेंच कार्य ते करूं शकणार नाहींत असें कोणत्या आधारावर समजावयाचें ? पक्ष नसले तर कांहीं महत्त्वाकांक्षी, स्वार्थसाधू, धूर्त लोकांना हवा असलेला कार्यक्रम हव्या त्या तांतडीनें अंमलांत येणें अशक्यप्राय

होईल हें खरें; पण त्यावरून पक्षांशिवाय विधिमंडळाकडून व मंत्रिमंडळाकडून राष्ट्रहिताचा कोणताच कार्यक्रम आंखलाहि जाऊं शकणार नाहीं व अंमलांतहि येऊं शकणार नाहीं, असें अनुमान काढतां यावयाचें नाहीं. त्याचप्रमाणें पक्षाला हवें तें घडणें अशक्यप्राय झालें तर राष्ट्राला हवें तें घडणेंहि अशक्यप्राय होईल, असा तर्कहि बसवतां यावयाचा नाहीं !

## पक्षाचा कार्यक्रम कसा तयार होतो, हाहि मुद्दा लक्षांत घ्या

ज्याला "पक्षाचा कार्यक्रम" म्हणतात तो तरी कसा तयार होतो ? पक्षाचे सर्व सभासद अगदीं एकाच क्षणांत, एकसमयावच्छेदें तो तयार करतात काय ? नाहीं. तर पक्षांतला कोणतातरी एक तज्ज्ञ सभासद सुरुवातीस तो कागदावर घालतो, मग त्याच्यावर आणखी कांहीं तज्ज्ञ, विचारांची देवघेव त्यांत फेरबदल अगर चढउतार करतात, नंतर तो पक्षाच्या कार्यकारी मंडळांत जाऊन कांहीं अन्य संस्कारान्तीं पास होतो आणि अखेरीस सर्वसाधारण सभेंत त्याला मान्यता मिळवून तो "पक्षाचा कार्यक्रम" म्हणून जाहीर होतो. वास्तविकरीत्या, राष्ट्रोद्धाराचा कोणताहि संकलित अगर विभागीय कार्यक्रम तयार करतात ते तज्ज्ञ लोकच होत; पक्षाच्या सभांत त्याला मान्यता मिळवण्याचा जो भाग असतो तो केवळ एक औपचारिक विधि असतो. हे तज्ज्ञ लोक कोणत्याहि पक्षांतले असले तरी मूलतः राष्ट्रांतले असतात आणि पक्षांतले नसले तरीहि राष्ट्रांतलेच असतात, आणि जर त्यांना पक्षाचा टिळा लावून राष्ट्रोद्धाराचा कार्यक्रम आंखतां येतो तर तो न लावतांहि त्यांना आलाच पाहिजे; इतकेंच काय तर, पक्षाचा टिळा लावून आंखलेला कार्यक्रम राष्ट्रापेक्षां पक्षहितैषी अधिक होण्याचा जो संभव असतो तोहि अपक्ष तज्ज्ञानें आंखलेल्या कार्यक्रमाच्या बाबतींत नाहींसा होतो. पक्षांतर्भाव हा कांहीं कार्यक्रम आंखण्याची बुद्धिमत्ता किंवा स्फूर्ति देणारा वेदमंत्र नव्हे; अपक्ष राहूनहि तज्ज्ञाला आपली तज्ज्ञता टिकवतां येते व कार्यक्रमाच्या रूपानें फलद्रूपहि करतां येतेच. मग ज्या प्रक्रियेनें पक्षाचा कार्यक्रम आंखतां येतो त्याच प्रक्रियेनें सरळ, थेट राष्ट्राचा कार्यक्रम आंखतां येत असतांना, आधीं तो पक्षाचा म्हणून आंखावा व नंतर राष्ट्राचा बनवावा हा द्राविडी प्राणायामाचा नसता उपद्व्याप कराच कशाला ? जे पक्षांत शिरत नाहींत ते तज्ज्ञ, कार्यक्रम आंखूंच शकत नाहींत अशी वस्तुस्थिति असती तर गोष्ट निराळी झाली असती. पण वस्तुस्थिति असते ती अगदींच वेगळी. राष्ट्रोद्धाराचा व्यवहार्य कार्यक्रम

खरोखर आंखतात ते तज्ज्ञ, अधिकारी लोक; आणि तो आंखून घेतात ते सरकारी मंत्रि, पक्षाचे पुढारी नव्हत. आतां ही गोष्ट खरी कीं, सरकारी मंत्रि हेच जेव्हां पक्षाचे नेते असतात तेव्हां कार्यक्रम आंखून घेतात ते कोण, मंत्रि कीं पक्षनेते अशी गुंतागुंतीची शंका उभी राहते. पण ती आपण पुरी फेडून टाकली पाहिजे. तात्पर्य हेंच कीं, कार्यक्रमाची आंखणी, किंवा त्याची अंमलबजावणी आणि पक्ष-संघटना यांचा कार्यकारण संबंध मुळींच नाहीं व म्हणून कार्यक्रमासाठीं पक्षाची [illegible]

# पक्ष आणि मंत्रिमंडळ हींहि अविच्छेद्य नव्हत

## मंत्रिमंडळ बनवण्याचा प्रश्न कां उत्पन्न होतो?

आधुनिक लोकशाही राष्ट्रांचे, एका विवक्षित दृष्टीनें, महामंत्रिप्रधान व राष्ट्रपतिप्रधान असे दोन वर्ग, पाडतां येतात हें मागें, "लोकशाहीचे चार घटक व मूलाधार" या प्रकरणांत सांगितलेंच आहे. इंग्लंड, भारतादि राष्ट्रांत महामंत्रिप्रधान लोकशाही असून अमेरिकेंतील संयुक्त संस्थानांत राष्ट्रपतिप्रधान लोकशाही आहे. महामंत्रिप्रधान लोकशाहींत, विधिमंडळामध्यें ज्या पक्षाचे सभासद सर्वांत अधिक असतील त्या पक्षानें नियुक्त केलेल्या आपल्या नेत्यासच राष्ट्रपतीनें पाचारण करून मंत्रिमंडळ बनवण्यास सांगावें असा शिरस्ता असतो; राष्ट्रपतिप्रधान लोकशाहींत मंत्रिमंडळ स्वतः राष्ट्राध्यक्षच निवडीत असतो; मात्र या मंडळाच्या सभासदांना अमेरिकेंत 'मंत्रि' ही पदवी नसते, त्यांना त्या त्या खात्याचे 'सेक्रेटरी' म्हणजे चिटणीस हीच संज्ञा दिली जाते, याचाहि उल्लेख मागें होऊन गेला आहे. राष्ट्रपतीनें किंवा घटनाप्रमुखानें विधिमंडळांतील बहुमतवाल्या पक्षप्रमुखाला बोलावून मंत्रिमंडळ बनवण्यास सांगण्याच्या या शिरस्त्याचा प्रभाव अनेकांच्या मेंदूवर इतक्या जबरदस्तपणें पडलेला आहे कीं, पक्ष व मंत्रिमंडळ यांचा संबंध अतुट किंवा अविच्छेद्य नसतो ही कल्पनाहि त्यांना शिवूं शकत नाहीं! आणि म्हणूनच "पक्ष नसले तर मंत्रिमंडळ कोण कसें बनवणार?" असा प्रश्न ते तत्काल विचारूं लागतात.

## राष्ट्राध्यक्षप्रधान राज्यपद्धतींत मंत्रिमंडळ कसें बनवलें जातें?

याचें एक उत्तर असें कीं, राष्ट्राध्यक्षप्रधान लोकशाही राज्यपद्धतींत 'चिटणीसमंडळ,' म्हणजेच 'मंत्रिमंडळ' बनवतांना प्रतिनिधिमंडळांत बहुमतवाला पक्ष कोणता आहे, अल्पमतवाला कोणता आहे तें लक्षांत घेण्याची आवश्यकता भासत नाहीं. अमेरिकेंत झाले तरी राजकीय पक्ष हे आहेतच आणि खुद्द राष्ट्राध्यक्षहि कोणत्यातरी पक्षामार्फतच निवडून येत असतात. म्हणून ते आपल्या चिटणीसमंडळाची निवड करतांना पक्षैक्य दृष्टि बाळगीत असणें शक्य आहे. तथापि त्यांनीं ती दृष्टि बाळगलीच पाहिजे असें बंधन मात्र त्यांच्यावर मुळींच नसतें. कारण त्यानें

मराठी ग्रंथ स... ठाणे
अनुक्रमांक ... दि: ...
क्रमांक ... नों दि: ...



निवडलेले चिटणीस हे विधिमंडळाला जबाबदार नसतात, तर त्याला स्वतःलाच ते जबाबदार असतात. एखादा चिटणीस जर राष्ट्राध्यक्षांच्या धोरणानुसार वागत नसेल तर ते त्याला राजीनामा द्यावयास लावण्यास समर्थ असतात. यावरून असें स्पष्ट दिसून येतें कीं, जगांत एकतरी लोकशाही राज्यपद्धति अशी आहे कीं, जींत मंत्रिमंडळ बनवतांना पक्षविशिष्ट दृष्टि बाळगण्याचें कारण, तत्त्वतः तरी, मुळींच पडत नाहीं. हेंच दुसऱ्या भाषेंत सांगावयाचें म्हणजे मंत्रिमंडळ व पक्ष यांचा संबंध जन्य-जनक किंवा अविच्छेद्य असा असत नाहीं. कोणी म्हणेल या पद्धतींत, मंत्रि किंवा चिटणीस हे ज्यावरून राष्ट्राध्यक्षालाच जबाबदार असतात त्यावरूनच त्याला पक्षविशिष्ट दृष्टि सोडून त्यांची निवड करतां येते, नाहीं तर येतीना. ठीक आहे. कारण कोणतेंहि असो, पक्ष आहेत कीं नाहींत हें मुळींच लक्षांत न घेतां मंत्रिमंडळ बनवणें शक्य असतें, हा मुद्दा त्या कारणावरून असिद्ध ठरूं शकत नाहीं. मग, जें एका राज्यपद्धतींत शक्य आहे तेंच दुसऱ्या राज्यपद्धतींत, घटना किंवा शिरस्ता यांच्यामध्यें जरूर ते फेरफार घडवून आणून कां करतां येऊं नये ? तें अवश्य करतां येईल हें तात्त्विक दृष्टीनें तरी मान्य करावेंच लागतें.

## खुद्द पक्षांची रचना कशी असते ती पहा

याचें दुसरें उत्तर मिळवण्यासाठीं खुद्द पक्षांची रचना कशी असते तिच्याकडे लक्ष द्या. प्रत्येक पक्षाचें एक कार्यकारी मंडळ असतें, कार्याच्या प्रसंगीं किंवा धोरणाबाबत नवे प्रश्न उत्पन्न होतात त्या समयीं त्याला सल्ला-संमती देण्यासाठीं एक जनरल कौन्सिल सल्लागार मंडळ किंवा महा-समिति असते आणि पक्षाच्या एकंदर सभासदांचीं जाहीर अधिवेशनेंहि असतात. कार्यकारीमंडळ व सल्लागारमंडळ यांची निवड, विवक्षित पद्धतीनुसार, पक्षाच्या सर्व सभासदांकडून केली जाते. कित्येक पक्षांत अध्यक्ष तेवढा ठराविक वर्गांतील पक्षसभासदांकडून निवडण्यांत येतो व हा अध्यक्ष नंतर आपली कार्यकारिणी नेमीत असतो. पदाधिकाऱ्यांच्या या निवडणुका करतांना पक्षांत पुनः पोटपक्ष पडूं शकतात; पण असे पोटपक्ष असूं नयेत असाच कटाक्ष पक्षश्रेष्ठी ठेवीत असतात. अर्थात्, ज्या पद्धतीनें खुद्द पक्षाच्या पदाधिकारी मंडळींची निवडणूक किंवा नेमणूक केली जाते त्याच पद्धतीनें विधिमंडळाच्या, प्रतिनिधिमंडळाच्या किंवा लोकसभेच्या पदाधिकारी मंडळींचीहि निवडणूक किंवा नेमणूक करतां येईल, हें उघड होतें.

## सर्व प्रतिनिधिमंडळच एक ‘ पक्ष ’ मानावा

ज्यांना पक्षाची कल्पना आपल्या डोक्यांतून पुरी हांकलून लावतां येत नाहीं त्यांनीं क्षणभर अशी कल्पना करावी कीं, प्रतिनिधिमंडळाचे सर्वच्या सर्व सभासद मिळूनच एक ‘ पक्ष ’ बनलेला आहे व त्याला आपल्या पदाधिकाऱ्यांची नियुक्ति करावयाची आहे. त्यांनीं आणखी असेंहि समजावें कीं, प्रतिनिधिमंडळाचा अध्यक्ष म्हणजे पक्षाचा अध्यक्ष, मुख्यप्रधान म्हणजे पक्षाच्या विधिमंडळांतील सभासदांचा नेता किंवा पक्षप्रमुख, मंत्रिमंडळ म्हणजे पक्षाचें कार्यकारी मंडळ, सबंध प्रतिनिधिमंडळ म्हणजे पक्षाचें सल्लागार मंडळ आणि मतदार म्हणजे पक्षाचे प्राथमिक सभासद होत. ही कल्पना डोक्यांत ठाकठीक बसवली तर, ज्या पद्धतीनें पक्षाचे पदाधिकारी निवडले किंवा नेमले जातात त्याच पद्धतीनें प्रतिनिधिमंडळाचे अध्यक्षोपाध्यक्ष, मुख्यप्रधान, मंत्रिमंडळ इत्यादि अधिकारी निवडले किंवा नेमले जाण्यास कोणतीच हरकत असण्याचें कारण नाहीं, हें कोणाच्याहि लक्षांत येण्यास उशीर लागणार नाहीं. आतां इतकें खरें कीं, पक्षाच्या पदाधिकाऱ्यांचे निवडणूकविषयक नियम व विधिमंडळाच्या अधिकाऱ्यांचे निवडणूकविषयक नियम यांत बरीच तफावत असूं शकेल. पण त्या तफावतीमुळें मुख्य मुद्दा बाधित होऊं शकणार नाहीं.

## विधिमंडळाचा अध्यक्ष सर्वच सभासद निवडतात

आतां, विधिमंडळाच्या अध्यक्षोपाध्यक्षांची निवड कशी करतात तें पहा. विधिमंडळाच्या अध्यक्षोपाध्यक्षपदांसाठीं बहुमतवाला पक्ष स्वतःचे उमेदवार उभे करतो व तेच बहुधा निवडून येतात, ही गोष्ट खरी. पण त्यांच्या निवडणुकींत विधिमंडळाचे सर्व सभासद मत देत असतात ; अन्यपक्षीय अगर अपक्षीय सभासदांना मताधिकार नाकारलेला नसतो ; तर सर्व सभासद मिळून जणुं काय एकच पक्ष आहे असें मानूनच या निवडणुका होत असतात. आणि बहुमतवाल्या पक्षाबाहेरचा एखादा उमेदवार उभा असला व या पक्षाचे कांहीं सभासद गैरहजर असले तर हा बाहेरचा उमेदवार यशस्वीहि होऊं शकतो. शिवाय, आणखीहि एक मुद्दा या बाबतींत लक्षांत घेण्याजोगा असतो. विधिमंडळाच्या अध्यक्षोपाध्यक्षपदांसाठीं जे उमेदवार उभे करावयाचे ते बहुमतवाला पक्षदेखील इतर पक्षीयांना मान्य होतील असेच, त्यांची पूर्ण संमति घेऊनहि, करीत असतो. असें करण्याचें बंधन नसलें तरी सामान्य शिरस्ता किंवा प्रथा अशीच असते. ज्या पद्धतीनें

अध्यक्षोपाध्यक्ष निवडले जातात त्याच पद्धतीनें, म्हणजे सर्वच सभासद मिळून एक पक्ष आहे असें मानून, मुख्य प्रधान व मंत्रिमंडळ यांचीहि निवड कां करतां येऊं नये ?

## मंत्रिमंडळ मात्र लादलें जातें !

पण, पक्षपद्धतीच्या लोकशाहींत मंत्रिमंडळ मात्र विधिमंडळावर लादलें जातें ! कारण, बहुमतवाला पक्ष, अन्यपक्षीय व अपक्षीय सभासदांशीं यत्किंचितहि पूर्वविचारविनिमय न करतां, आपला विधिमंडळनेता किंवा पक्षप्रमुख, स्वैरपणें निवडीत असतो, त्यालाच राष्ट्राध्यक्ष मंत्रिमंडळ बनवण्यास सांगतो व हें मंत्रिमंडळ विधिमंडळाच्या सर्व सभासदांना बिनतक्रार मान्य करावें लागतें ! विधिमंडळावर ही एक प्रकारची जबरदस्तीच नव्हें काय ? कोणी म्हणेल, महामंत्रि व त्याचें मंडळ हीं पक्षनियुक्त असलीं तरी ते करणार असलेले सर्वच कायदे विधिमंडळासमोर ठेवले जातात व त्यांवर सर्व सभासदांना हवें तसें भाषण व हवें तसें मतदान करतां येतें. पण वाचाधिकार व मताधिकार हे मंत्रिमंडळाच्या घडवणीच्या बाबतींत वापरावयास न मिळतां फक्त तें पुढें ठेवीत असलेल्या कायद्यांच्या बाबतींत वापरावयास मिळणें म्हणजे कोंबडी पत्करून तिच्या अंड्यांवर हुज्जत घालीत बसण्याचा, किंवा घोडा बिनबोभाट स्वीकारून त्याच्या लगामाच्या किंमतीबद्दल घासाघीस करण्याचा अधिकार मिळविण्याइतकेंच हास्यास्पद व दुःखद होय !

## राजकीय पक्ष नसले तर...

घटकाभर असें समजा कीं, राष्ट्रांत राजकीय पक्ष असे मुळींच नाहींत. तर काय ज्ञानी, विचारवंत, तज्ज्ञ, कर्तबगार; कर्तव्यदक्ष, देशप्रेमी लोक त्यांत शिल्लकच राहणार नाहींत ? पक्ष हींच कायती या सर्व सद्गुणांची प्रेरकशक्ति किंवा जनकखनि आहे काय ? पक्षाशिवाय सद्गुण ही स्थिति एकजात असंभाव्यच काय ? नाहीं, मुळींच नाहीं. पक्ष असतांना राष्ट्रांत जे सद्गुण असूं शकतात ते पक्ष नसले तर अधिकच उत्कटतेनेंहि नांदूं – विलसूं शकतात. अर्थात्, राष्ट्रोद्धारकारक गुणवत्ता असणारे लोक असतील; ते लोकहितवर्धक असे आपापले कार्यक्रम तयार करतील, निवडणुकांच्या समयास ते मतदारांसमोर ठेवण्याची दक्षता ते बाळगतील ; सत्पात्र लोक उमेदवार म्हणून उभे राहतील किंवा नागरिक त्यांना उभे करतील; अनुरूप उमेदवारांना मतदार निवडून देतील; ते प्रतिनिधि

बनून विधिमंडळांत जातील; तात्पर्य, पक्ष असतांना या बाबतींत जें जें काय घडतें तें सारें घडून येईल, व पुनः पक्षांधतेशिवाय देशप्रेमानेंच घडून येईल. मूळ राष्ट्रांतच पक्ष नसल्यानें विधिमंडळांतहि पक्ष असणार नाहींत; त्याचे सर्व सभासद-मिळून ज्याप्रमाणें विधिमंडळाच्या अध्यक्षोपाध्यक्षांची निवड करतात त्याचप्रमाणें आपल्या नेत्याची किंवा प्रमुखाचीहि करतील; त्याला बोलावून राष्ट्राध्यक्ष मंत्रिमंडळ बनवावयास आज्ञापील; तो मंत्रिमंडळ बनवील; तें राष्ट्रोद्धाराच्या योजना तज्ज्ञांकडून आंखून घेईल व विधिमंडळासमोर निर्णयासाठीं ठेवील; एखाद्या पक्षाच्या सभेंत कोणत्याहि योजनांचा ज्याप्रमाणें निर्णय लागतो त्याचप्रमाणें त्यांचा निकाल विधिमंडळांत लागेल; नंतर मंत्रिमंडळ त्या कार्यवाहींत आणील. तात्पर्य, सर्व कांहीं सुरळीतपणें पार पडेल आणि तेंहि विधिमंडळावर मंत्रिमंडळाची लादालादी न होतां व पक्षांधता न बाधतां पार पडेल!

## संयुक्त जबाबदारीचें तत्त्वहि पाळतां येईल

अशा प्रकारें निःपक्षपद्धतीनें निवडलेल्या मंत्रिमंडळाला संयुक्त जबाबदारीचें तत्त्वहि स्वीकारतां व पाळतां येईल. तसें त्यानें स्वीकारलें म्हणजे त्याचा एखादा महत्त्वाचा कार्यक्रम विधिमंडळानें फेटाळून लावला किंवा यानें त्याच्यावर अगर एखाद्या मंत्र्यावर अविश्वासदर्शक ठराव पास केला तर त्याला राजीनामा देऊन अधिकारपद सोडावें लागेल, आणि असा प्रसंग आला तर विधिमंडळानें ज्या-प्रमाणें पहिल्यांदा आपला पंतप्रधान निवडला त्याचप्रमाणें त्याला दुसरा नवा पंतप्रधान निवडून नवें मंत्रिमंडळ यथाविधि बनवून घेतां येईल. विधिमंडळाच्या अध्यक्षाविरुद्ध अविश्वासदर्शक ठराव संमत झाला तर त्याचे सर्व सभासदमिळून नवा अध्यक्ष निवडीत असतातच कीं नाहींत? त्याच न्यायानें त्यांना आपला पंतप्रधानहि निवडण्यास अडचण भासण्याचें कोणतेंच कारण नाहीं.

या शेवटच्या दोन प्रकरणांतील विवेचन जर नीट लक्षांत घेतलें तर वाचकांना हें पटावयास पाहिजे कीं, कार्यक्रम व पक्ष हीं जशीं अन्योन्यावलंबी नाहींत तशींच पक्ष व मंत्रिमंडळ हींहि नाहींत; तीं संपूर्णपणें विच्छेद्य आहेत हें अन्वय व व्यतिरेक या दोन्ही पद्धतींनीं सिद्ध होतें.

# राष्ट्रनिष्ठेविरुद्ध पक्षनिष्ठेचे प्रताप

## पक्ष व मंत्रिमंडळानें घ्यावयाची शपथ

राज्यसंस्थेच्या किंवा शासनसंस्थेच्या विधिसत्ता, कार्यकारी सत्ता व न्यायसत्ता अशा तीन सत्ता मानल्या जात असून त्यांतील कार्यकारी सत्तेला किंवा मंत्रिमंडळालाच सामान्य व्यवहारांत 'सरकार' असें संबोधलें जातें, हें मागें सांगितलेंच आहे. ज्या राष्ट्रांत हें सरकार पक्षपद्धतीनें बनवलें जातें तेथें तें कोणाचें असतें, एका पक्षाचें कीं अखिल राष्ट्राचें? असा एक फार महत्त्वाचा तात्त्विक प्रश्न उत्पन्न होत असतो, आणि त्याचें जें उत्तर येतें त्यावरूनहि पक्षपद्धतीचें राजकारण लोकशाही कशी विकृत, राष्ट्रघातकी करीत असतें तें चांगलें दिसून येतें. सामान्य लोकांच्या मनांत हा प्रश्न सहसा येतच नसतो.

सरकार म्हणजे मंत्रिमंडळ किंवा त्याचा अंशभागी जो एखादा मंत्रि त्यानें अधिकारारूढ होतांना शपथ घेतली पाहिजे किंवा प्रतिज्ञा केली पाहिजे, असा प्रघात सर्वच राष्ट्रांत असतो. आपल्या भारतांतहि तो अर्थात् आहेच. भारताच्या राज्यघटनेच्या ७५ व्या कलमांत संघराज्याच्या मंत्र्यानें अधिकारपदस्थ होतांना शपथ घेतली पाहिजे असें बंधन त्याच्यावर घातलें असून, परिशिष्ट क्रमांक ३ मध्यें शपथेचें किंवा प्रतिज्ञेचे नमुने दिले आहेत. त्या शपथेंत आपण पक्षाशीं निष्ठा ठेवीन असें त्यानें म्हणावयाचें नसतें; तर "राष्ट्रावर श्रद्धा आणि राज्यघटनेबद्दल निष्ठा बाळगीन आणि सर्व प्रकारच्या लोकांना योग्य रीतीनें वागवीन", असेंच वचन त्यानें द्यावयाचें असतें. सर्व राष्ट्रांत सामान्यतः अशाच अर्थाची प्रतिज्ञा केली जाते. याचा स्पष्ट व एकमेव उद्देश हाच कीं, प्रधानमंडळाची किंवा तें बनवण्याची जबाबदारी ज्याच्यावर सोंपवलेली असते त्या महामंत्र्याची निवड होईपर्यंत, जरी तो पक्षप्रतिनिधित्व करणारा असला तरी अधिकारारूढ झाल्याक्षणापासून त्याचें तें पक्षप्रतिनिधित्व गळून पडावें व त्यानें अखिल राष्ट्राचें प्रतिनिधित्व करावें. सरकार व त्याची आद्य सूचना करणारा पक्ष यांनीं घटनेंतील या शपथेकडे दुर्लक्ष करणें उचित नसतें. कारण, ती केवळ तात्त्विक किंवा नैतिक दृष्टीनेंच महत्त्वाची असते असें नव्हे; तर व्यावहारिक व भौतिक दृष्टीनेंहि ती अर्थपूर्णच असते. सरकार आपल्या कारभारासाठीं करभाराच्या रूपानें जें

द्रव्य, जी बुद्धि किंवा जे श्रम घेत असते ते केवळ त्याची आद्य सूचना करणाऱ्या पक्षाच्या सभासदांकडून तेवढे घेत नसतें, तर राष्ट्रांतील यच्चयावत् प्रजाजनांकडूनच घेत असतें. राष्ट्रावर परचक्र आलें आणि त्याच्या संरक्षणार्थ सक्तीची लष्करभरती करावी लागली तर ती सरकार फक्त आपल्या पक्षाच्या लोकांतूनच करून घेत नाहीं; तर सर्वच लायक लोकांतून करून घेते. अर्थात्, राष्ट्राचें संरक्षण व संवर्धन जर सर्वच प्रजाजनांनीं जीवित व वित्त अर्पण करून करावयाचें असतें तर सरकारनें प्रतिनिधित्व करावयाचें, हित सांभाळावयाचें व जबाबदार राहावयाचें तें फक्त आपल्या पक्षाला नसून अखिल राष्ट्राला असलें पाहिजे हें अगदीं उघड होतें. सरकार जर केवळ पक्षैकदृष्टि राहिलें तर तत्पक्षियेतरांकडून जीवित व वित्त आपल्या कारभारासाठीं मागण्याचा हक्क त्याला उरूंच शकत नाहीं. " खानेको हम किंवा हमारा पक्ष, और लढ़नेको हमारा राष्ट्र " ही स्थिति नैतिकदृष्ट्याहि गैर आहे व व्यवहारदृष्ट्याहि नुकसानकारक ठरणारी आहे. यावरून असा सिद्धांत काढावा लागतो कीं, खुद्द पक्षीय लोकशाहींतदेखील सरकार हें, प्रारंभीं पक्षसूचित असलें तरी, अधिकारपदस्थ होतांक्षणींच तें अखिल राष्ट्राचें बनून जावें, असाच राज्यघटनेचा उद्देश असतो, आणि हा सिद्धांत एकदां मान्य केला म्हणजे त्याचाच उपसिद्धांत म्हणून हेंहि मान्य करणें तर्कशुद्ध ठरतें कीं, पक्षसूचित मंत्रिमंडळानेंहि अधिकारस्वीकार करतांक्षणींच आपल्या पक्षाशीं असलेले धागेदोरे किंवा लागेबांधे तोडून टाकणें उचित असतें. विधिमंडळाच्या अध्यक्षाच्या बाबतींत सामान्यतः हा उपसिद्धांत पाळला जावा असा कल सर्वच राष्ट्रांत दिसून येतो. म्हणजे असें कीं, हा अध्यक्ष मुळांत एखाद्या पक्षाचा सभासद असला व त्या पक्षाच्याच शिफारशीमुळें तो निवडून आलेला असला तरी अधिकारारूढ झाल्याक्षणापासून त्यानें अगदीं पक्षातीतपणें वागावें असें खुद्द पक्षसभासदहि मानतात, इतरहि मानतात व प्रत्यक्ष अध्यक्षहि तसाच वागण्याचा कसून प्रयत्न करीत असतो.

## नागरिकांच्या हातीं नरोटी, पक्षाच्या तोंडांत खोबरें !

पण मंत्रिमंडळाच्या बाबतींत मात्र, हा उपसिद्धांत काय किंवा तो मुख्य सिद्धांत काय, दोघांचीहि कदर कोणीच करीत नाहीं! वास्तविक पाहतां, एका अर्थी अकर्त्या व निरुपद्रवी अशा अध्यक्षाच्या बाबतींत हें निःपक्षपातित्वाचें व्रत एकपट आवश्यक मानलें तर ' कर्तुमकर्तुमन्यथा कर्तुम् ' अशा महामंत्र्याच्या व

त्याच्या मंडळाच्या बाबतींत तें शतपट आवश्यक मानणेंच योग्य ठरेल. पण पक्षपद्धतीच्या राजकारणांत बिचाऱ्या नागरिकांच्या हातांत नरोटी आणि पक्षाच्या तोंडांत खोबरें असा प्रकार झाला तर त्यांत आश्चर्य तें कसलें? आणि म्हणूनच अध्यक्षाच्या बाबतींत इष्ट ठरलेली प्रथा महामंत्र्याच्या बाबतींत इष्ट मानली जात नाहीं! इतकेंच नव्हे तर, राष्ट्राचा मुख्य प्रधान व त्यांतील बहुबलधारी पक्षाचा अध्यक्ष एकच महापुरुष असावा अशीच प्रथा अनेक राष्ट्रांत पडलेली असते! पक्ष किंवा तन्नियुक्त मंत्रिमंडळ आणि विविध पक्षोपपक्षांनीं व अपक्षीयांनीं बनलेलें विधिमंळ यांचें राज्यकारभारविषयक ध्येयधोरण जोंपर्यंत एकसूत्रि, समस्वरूपी, किंवा समांतरगामी राहतें तोंपर्यंत वरील सिद्धांत व तज्जन्य उपसिद्धांत यांची जाणीव कोणास होत नाहीं व महत्त्व पटत नाहीं. पण सत्तारूढ पक्ष व विधिमंडळाचे तत्पक्षेतर सभासद यांच्या ध्येयधोरणांत जसजसें अंतर पडतें, त्यांचे आपसांत खटके उडतात तसतसें तें लक्षांत येतें व पटत जातें. सरकार हें बहुमतवाल्या पक्षानेंच निवडून दिलेलें असल्यानें त्याच्या बऱ्यावाईट सर्व कारभाराला विधिमंडळांत बहुमतानें मान्यता मिळते व तें पदच्युत होत नाहीं. पण त्याचें जनतेंत नैतिक आसन अस्थिर होत जातें व शेवटीं तें अपमानास्पद व राष्ट्राला त्रासदायक ठरून पुढच्या निवडणुकांत स्थानभ्रष्ट होत असतें; व प्रसंगवशात् बंडाळी माजून मध्यंतरींहि त्याला आपली जागा सोडावी लागते, हें विसरून चालत नाहीं. पण पक्षीय राज्यपद्धतींत या नैतिक प्रश्नाकडे व भावी अपेक्षाकडे दूरदृष्टीनें पाहणें स्वभावतःच अशक्य असतें!

## दगलबाजी कोणाशीं? पक्षाशीं कीं राष्ट्राशीं?

पक्षाध्यक्ष व पंतप्रधान एकच व्यक्ति असली आणि मंत्रिमंडळ पक्षनियंत्रित असलें म्हणजे त्यांच्यासमोर कोणता नैतिक पेंचप्रसंग उत्पन्न होण्याचा संभव असतो तोहि लक्षांत घेणें वाजवी आहे. एकदां निवडून आलेलें सरकार, घटनेंत निर्दिष्ट केलेल्या मुदतीपर्यंत आपलें नैतिक वजन यत्किंचितहि घटूं न देतां स्थिर राहिलें आणि तेंच पुनः सत्तारूढ व्हावें अशी लोकांची इच्छा दिसून आली तर तें लोकशाहीनुसार वागलें असें म्हणतां येत असतें. आणि असें व्हायचें असेल तर अधिकारारूढ झाल्यापासून पक्षनिष्ठेपेक्षां राष्ट्रनिष्ठेलाच आधीं व अधिक महत्त्व देणें अपरिहार्य असतें. हें एकदां मान्य केलें म्हणजे पंतप्रधान आणि बहुबळवाल्या पक्षाचा अध्यक्ष एकच व्यक्ति असणें व मंत्रिमंडळहि तन्नियुक्त

असणें हें लोकशाहीला नेहमीं पोषकच होईल असा भरंवसा धरतां येत नाहीं. पक्षाध्यक्षानें व त्याच्या सहकारी मंत्र्यांनीं आपल्या पक्षाशीं कमालीची निष्ठा बाळगणें हें त्यांचें कर्तव्यच असतें. पक्षनिष्ठा व राष्ट्रनिष्ठा हीं जोंपर्यंत समधात असतील तोंपर्यंत ठीक आहे. पण उभयतांत विरोध उत्पन्न झाला आणि दोहोंपैकीं कोणत्यातरी एकीचा त्याग किंवा अव्हेर केल्याशिवाय गत्यंतर नाहीं असा पेंचप्रसंग उभा राहिला तर त्यांतून कसें निभावून जावयाचें ? कोणत्यातरी एका निष्ठेशीं त्यांना दगलबाजी करणें भाग आहे हें उघड नाहीं काय ? आणि यावरूनहि पक्षपद्धतीचें राजकारण ऐन कसोटीच्या प्रसंगीं कसें दगेखोर ठरूं शकतें ते दिसून येत नाहीं काय ?

## पेंचप्रसंगामुळें पुनः अधःपात

पण असले पेंचप्रसंग आलेच तर त्यांतूनहि सहीसलामत बाहेर पडण्याची युक्ति अगर हिकमत पक्षबाज राजकारणानें काढून ठेवलेली आहे. पण ही हिकमतहि सरकारचा किंवा मंत्रिमंडळाचा व पर्यायानें राष्ट्राचाहि अधःपातच करणारी असते. राष्ट्रनिष्ठा व पक्षनिष्ठा यांत विरोधच आलेला नाहीं असा भास उत्पन्न करण्याकरतां सत्ताधारी पक्षाचे वरपासून खालपर्यंतचे सारे प्रवक्ते आपला पक्ष व राष्ट्र हीं जणुं काय अगदीं समव्याप्त, समरस वा एकात्म झालेलीं आहेत अशा आविर्भावानें मोठमोठ्यानें व पुनः पुनः बोलूं लागतात. पण त्यांत जितकी परवंचना असते तितकीच आत्मवंचनाहि असते. कारण कोणत्याहि राष्ट्रांतील सत्ताधारी पक्ष केवढाहि मोठा असला तरी त्यांत अन्यपक्षीय, अपक्षीय व उदासीन लोकांची एकंदर संख्या त्या पक्षाच्या सभासदांच्यापेक्षां अनेक पटींनीं अधिक असते, म्हणजे राष्ट्र व आपला पक्ष हीं समव्याप्त नसतात; व ही वस्तुस्थिति सर्वांनाच, खुद्द त्या पक्षाच्या प्रवक्त्यांनाहि, पूर्णपणें ठाऊक असते. पण पक्षनिष्ठा व राष्ट्रनिष्ठा या दोघांशींहि आपण सारख्याच इनामदारीनें वागत आहों अशी जगाची दिशाभूल करण्यासाठीं त्यांना स्वपक्ष व राष्ट्र हीं एकजीव होऊन चुकलीं असल्याच्या लटक्या ऐटीनें बोलणेंच प्राप्त होत असतें ! हा सर्व अधःपात टाळावयाचा असेल आणि राष्ट्रांत खरीखुरी लोकशाही नांदवावयाची असेल तर पक्षपद्धतीचें राजकारण अजिबात सोडून देणें हाच एकमेव व मूलभूत उपाय आहे.

# पर्यायपक्षामुळेंहि लोकशाही विकृत होण्याचें टळत नाहीं !

## सरकार व विरोधी पक्ष

विधिसत्ता, कार्यकारी किंवा बजावणी सत्ता आणि न्यायसत्ता अशा तीन सत्तांनीं जरी राज्यसंस्था बनत असली तरी बहुतेक वेळीं बहुतेक लोक बजावणी-सत्तेलाच ' सरकार ' असें म्हणत असतात ; आणि या सत्तेचें अंतिम नियंत्रण मंत्रिमंडळ करीत असल्यानें तें म्हणजेच सरकार अशी स्थिति होऊन बसते, हें मागें सांगितलेंच आहे. अर्थात् " सरकारविरोधी पक्ष " असें जेव्हां म्हटलें जातें तेव्हां मंत्रिमंडळ सुचवणाऱ्या किंवा बनवणाऱ्या पक्षाहून ध्येयधोरणांनीं भिन्न असणारे पक्ष असा अर्थ घेतला जातो, हें लक्षांत ठेवलें पाहिजे.

विधिमंडळांत एखाद्या पक्षाला प्रचंड बहुमत मिळालेलें असलें आणि दुसरा किंवा दुसरे पक्ष क्षीणबल निघाले तर तें देशाला हितकर होईलच अशी ग्वाही देतां येत नाहीं. कनक आणि कान्ता यांच्या मोहाइतकाच सत्तेचा मोहहि अनिवार्यच असतो ; आणि सत्तासामर्थ्यामुळें व्यक्ति जशी मदांध होऊं शकते तद्वतच पक्षहि होणें संभवनीय असतें. सत्ताधारी झालेला पक्ष विधिमंडळांतील आपल्या हुकुमी बहुमताच्या जोरावर इतर पक्षांवर अन्याय व जुलूम-जबरदस्ती करणें अशक्य नसतें. सत्तारूढ पक्ष, विधिमंडळांतील इतर प्रत्येक पक्षोपपक्षांपेक्षां संख्याबलानें मोठा असला तरी या सर्व पक्षांच्या सभासदांच्या बेरजेहून त्याचे सभासद अल्प-संख्य असूं शकतात. अर्थात्, सत्ताधिष्ठित पक्षाच्या सभासदांना निवडून देणाऱ्या मतदारांची संख्या इतर सर्व पक्षांच्या मागें असणाऱ्या मतदारांच्या संख्येहून कमी भरणें संभाव्य असतें. पक्षीय लोकशाहींत सुसंघटित बहुमतवाल्या पक्षानें तुटीर–फुटीर अल्पमतवाल्या पक्षांवर सत्ता चालवणें अपरिहार्यच असतें, असें म्हटलें तर एक वेळ मान्य रतां येईल; पण बहुमतवाला पक्ष इतर सर्व पक्षांच्या संयुक्त संख्येच्या मानानें भरणारा, पण दरेक पक्षापेक्षां मोठा असल्यानें सत्तारूढ झालेला, अशी स्थिति असेल तर अल्पमतवाला पक्ष बहुमतवाल्या

पक्षांवर सत्ता गाजवतो असेंच म्हणणें वस्तुस्थितीला धरून होईल व तें लोकशाहीशीं विसंगत ठरेल. व्यवहारतः अशी परिस्थिति अपवादात्मकच असते. कारण, विधिमंडळांत त्यांतल्यात्यांत अधिकसंख्य असणारा पक्ष, दुसऱ्या कोणत्या तरी पक्षाचा किंवा अपक्षीय सभासदांचा पाठिंबा मिळवून आपलें बहुमत निरपेक्ष किंवा निर्विवाद आहे असा विश्वास वाटूं लागल्यावरच मंत्रिमंडळ बनवीत असतो. पण तत्वतः विचार करतांना सर्व विकल्प जमेस धरणें इष्ट व अवश्य ठरतच असतें.

इतर प्रत्येकाहून बहुसंख्य, पण सर्व इतरांच्या बेरजेनें अल्पसंख्य अशा पक्षानें सत्ताधारी होऊन मनमानेल तसें वागूं नये यासाठीं विधिमंडळांत जे छोटेछोटे पक्ष असतात त्यांची व अपक्षीय किंवा स्वतंत्र सभासदांचीहि एकजूट करून एक ‘ सरकारविरोधी संयुक्त पक्ष ’ उभा करण्याचे प्रयत्न सर्वच राष्ट्रांतून होत असतात. निरनिराळ्या पक्षांच्या आंवळ्यांची ही मोट बांधणें बरेंच दुस्तर व दुर्घट काम असतें; पण अनेक वेळीं व स्थळीं तें यशस्वीहि होत असतेंच. अशा विरोधी पक्षामुळें सत्ताधिष्ठित पक्ष आपल्या सत्तेचा दुरुपयोग करण्यापासून परावृत्त होऊं शकतो, अशी अपेक्षा केली जाते. विरोधी पक्ष अनेक लहान लहान पक्षांची ‘ संयुक्त आघाडी ’ असण्यापेक्षां एकमतवाल्या सभासदांचा बांधीव, एकसांची असणें—व तो सरकारपक्षाशीं तुल्यबल असणें—हें अधिक उपयुक्त ठरणारें असतें, हें उघड आहे. कारण छोटे पक्ष संयुक्त आघाडींतून केव्हां फुटतील व सरकारपक्षालाहि मिळतील त्याचा नेम सांगतां येत नाहीं. एकसांची, एकध्येयी विरोधी पक्षांत अशी फूट असंभाव्य मानली जाते. इंग्लंडसारख्या अनेक राष्ट्रांत विरोधी पक्षाच्या पुढाऱ्याला विश्वासांत घेऊन त्याच्याशीं हरेक महत्त्वाच्या प्रश्नांच्या बाबतींत मनमोकळेपणानें व अगत्यपूर्वक विचारविनिमय करण्याचा प्रघात पडलेला असतो व त्याला पगारहि दिला जातो. आणि पुढाऱ्याचा पाठिंबा मिळवणें म्हणजे त्याच्या पक्षाचाच पाठिंबा मिळवण्यासारखें असतें, हें स्पष्टच आहे. इंग्लंडांत अनेक वर्षांपासून तीन पक्ष असल्याचें दिसलें तरी व्यवहारतः दोनच मोठे पक्ष विधिमंडळांत निवडून येतात व ही द्विपक्षीय लोकशाही तेथें यशस्वी झाली आहे, असेंहि पक्षीय राजकारणाचे पुरस्कर्ते सांगत असतात.

## पक्ष विरोधी कीं पर्यायी ?

सत्ताधारी पक्षाच्या विचारप्रणालीशीं सहमत नसणाऱ्या पक्षांना सामान्यतः ‘ विरोधी ’ असेंच संबोधण्याचा प्रघात सर्वत्र दिसून येतो. पण हा शब्द तितकासा

अनुरूप किंवा यथार्थ नव्हे. कारण सरकारच्या एकूणएक कृत्याला विरोध, सतत विरोध, कांहीं झालें तरी विरोध करणें हें अन्यपक्षीयांचें ध्येय किंवा धोरण असतेंच, असें नाहीं. तर त्यांना सरकारच्या अनेक कृत्यांना पाठिंबा देणें इष्ट व अवश्य वाटत असतें. शिवाय, प्रसंगोपात्त स्वतः आपण सत्तारूढ होऊं व राज्यकारभार अधिक सुयोग्यपणें चालवून दाखवूं अशी धमक त्याच्या अंगांत आहे असें मानावें लागतें. कारण, अशी धमक त्याच्या अंगांत नाहीं अशी जर सरकार-पक्षाची खात्री असली तर तो त्याची कदर करणार नाहीं व अपकृत्यांपासून परावृत्तहि होऊं इच्छिणार नाहीं. त्यासाठीं त्याला 'विरोधी' न म्हणतां 'पर्यायपक्ष' म्हणणेंच अधिक अन्वर्थक असतें.

## उजवा व डावा पक्ष

जो पक्ष सत्तारूढ असतो त्याच्या सभासदांना विधिमंडळांत, अध्यक्षाच्या उजव्या बाजूस व अन्यपक्षीय सभासदांना डाव्या बाजूस बसण्याच्या जागा दिलेल्या असतात. त्यावरून सत्ताधारी पक्षाला 'उजवा' व इतरांना 'डावे' म्हणण्याचा प्रघात पडलेला आहे. सरकारी पक्ष, सत्तारूढ होण्यापूर्वी स्वतःस गति-प्रिय किंवा क्रांतिकारी असें कितीहि तारस्वरानें म्हणणारा असला तरी राज्यकार-भार प्रत्यक्ष चालवावयास लागला म्हणजे त्याला त्यांतील अडचणींची खरी जाणीव होत असते; आणि म्हणून तो हळुहळू प्रगति करण्याचा पुरस्कार करूं लागतो व कालांतरानें स्थितिप्रिय होऊन बसणेंहि शक्य असतें; विरोधी पक्ष हे शीघ्रप्रगतीचे पुरस्कर्ते असतात, असें स्थूलतः मानण्यांत येतें. म्हणून उजव्यांना 'मवाळ' व डाव्यांना 'जहाल' असेंहि कोठें कोठें म्हटलें जातें. आपल्या विष-याशीं या संज्ञांचा फारसा संबंध नाहीं. तथापि त्या अनेक वेळीं वापरल्या जात असल्यानें त्यांचा अर्थ येथें सांगून ठेवणें इष्ट वाटलें.

## पर्यायपक्षापासून फायदे

विधिमंडळांत पर्यायपक्ष असला, सत्तारूढ पक्षाशीं तुल्यबळ, म्हणजे जवळजवळ समबळ असला व तो अत्यंत जागरूकपणें, अक्कलहुशारीनें कार्य करीत राहिला तर अधिकारपदस्थ पक्ष, आपण पदच्युत होऊं या भीतीनें राज्यकारभार चालवतांना पुष्कळच सावधगिरी घेतो, पर्यायपक्षियांचीं, अपक्षियांचीं व बाहेरील अधिकारी नागरिकांचींहि मतें लक्षपूर्वक व सहानुभूतीनें ऐकत राहतो व स्थूलतः तरी लोक-शाहीला व लोकमताला विरोधक असें कांहीं करीत नसतो, असें या पद्धतीच्या

समर्थकांचें प्रतिपादन असतें. ब्रिटिश राष्ट्रांत याचा अनुभव येत आहे असेंहि ते सांगतात. परंतु, या बाबतींत पहिला प्रश्न आहे तो हा कीं, ब्रिटनमध्यें लोकशाही उत्तमप्रकारें नांदत आहे याचा अर्थ तेथें तिची प्राणभूत पंचतत्त्वें पूर्णतः व्यवहारांत उतरलेलीं असतात असा आहे काय ? पक्षनिष्ठेमुळें जें अधःपतन होत असल्याचें मागें वर्णिलें आहे तें तेथें मुळींच होत नाहीं, असा त्यांचा समज आहे काय ? कीं, तीं पंचतत्त्वें अंमलांत येवोत – न येवोत ; पक्षनिष्ठेमुळें जो काय अधःपात होत असतो तो होवो – न होवो, जो कायदा आपण केला आहे व जे शिरस्ते आपण पाडले आहेत ते विशेष खळखळ न करतां पाळावे व जें कांहीं घडतें तें चालवून घ्यावें असा जो स्वभाव ब्रिटिश जनतेचा बनलेला आहे, त्यावरून आपणांस तसें वाटतें ? आणि दुसरा प्रश्न असा कीं, तेथील राजकारण जर पक्षविहीन पद्धतीनें चाललें असतें तर तेथें लोकशाही आजच्याहून अधिक विकसित झाली नसती हें सिद्ध कसें करून दाखवायचें ? परंतु, द्विपक्षीय किंवा पर्यायपक्षीय राजकारण हें लोकशाहीचें संरक्षण किंवा संवर्धन करण्यास कुचकामी असतें हें सिद्ध करून दाखवणारे युक्तिवाद हे नव्हत, ते दुसरे आहेत. पण ते मांडण्याआधीं पर्यायपक्षीय राजकारण, त्यांतल्यात्यांत लोकशाहीपोषक होण्यासाठीं मतदारसंघ व मतदान-पद्धति हीं कशीं असावीं लागतात त्याचें थोडें दिग्दर्शन करणें अवश्य आहे.

## मतदारसंघांची रचना

मतदारसंघांची रचना निरनिराळ्या राष्ट्रांत निरनिराळ्या प्रकारांनीं केली जाते. कांहीं संघ सर्वसामान्य असतात, तर कांहीं खास किंवा राखीव असतात. पदवी-धरांचा, अध्यापकांचा, डॉक्टरादि व्यावसायिकांचा, व्यापाऱ्यांचा, वगैरे, खास मतदारसंघाचीं उदाहरणें होत. ज्या क्षेत्रमर्यादेंतील सर्व प्रौढ मतदारांना, अन्य कोणत्याहि भेदभावाशिवाय, मतदान करतां येतें ते प्रदेशवार विभाग हे 'सर्वसामान्य' मतदारसंघ होत. यांत पुनः 'एकप्रतिनिधि'-मतदारसंघ व 'बहु-प्रतिनिधि' मतदारसंघ असे दोन प्रकार असतात. एका प्रदेश-विभागातर्फें एकच प्रतिनिधि निवडतां येत असला तर तो 'एकप्रातिनिधिक' मतदारसंघ होईल व अनेक किंवा बहुप्रतिनिधि निवडतां येत असले तर 'बहुप्रातिनिधिक, मतदारसंघ होईल. एकप्रातिनिधिक मतदारसंघ हे पर्यायपक्षीय लोकशाहीला बहुधा मारकच ठरत असून, त्यामानानें बहुप्रातिनिधिक संघ हे पोषक असतात. राज्यांतील सर्व मतदारसंघांत मिळून पर्यायपक्षीय, अन्यपक्षीय

व अपक्षीय मतदारांचें प्रचंड मताधिक्य असलें, पण प्रत्येक मतदारसंघांत सत्ताधारी पक्षीयांचें अधिकतम मत असलें तर एकप्रातिनिधिक मतदार-संघातर्फे सत्ताधारीपक्षीय उमेदवारच निवडून येणें विशेष संभवनीय असतें. उदाहरणार्थ, एकप्रातिनिधिक मतदारसंघ असलेल्या भारत राष्ट्रांतील मद्रास-राज्यांतल्या जानेवारी–फेब्रुवारी १९५२ मध्यें पार पडलेल्या सार्वत्रिक निवडणुकांकडे पहा. या विधिमंडळाच्या सभासदांची एकंदर संख्या ३७५ आहे. त्यांत कॅाँग्रेसपक्षाला १५२, म्हणजे शेंकडा ४१ या प्रमाणांत, जागा मिळाल्या; पण जें एकंदर मतदान झालें त्यांतलि फक्त शेंकडा ३५ मतेंच कायतीं सर्वांना मिळून पडलीं. कम्युनिस्टपक्षाला सभासद ६१, म्हणजे १६ टक्के लाभले, पण मतें अवघीं १२ टक्केच मिळालीं. उलटपक्षीं कृषक–मजदूर प्रजापक्षानें ३५, म्हणजे ९ टक्के जागा जिंकल्या, पण मतें १० टक्के मिळवलीं. समाजवाद्यांनीं मतें ७ टक्के मिळवलीं पण जागा केवळ ४ टक्के, म्हणजे १३ मिळवल्या. कम्युनिस्ट व समाजवादी यांनीं मिळवलेल्या जागा व मतें यांचें प्रमाण पाहिलें तर असें दिसून येतें कीं, पहिल्यांनीं दुसऱ्यापेक्षां जागा साडेचारपट जिंकल्या; पण मतें मात्र फक्त दुप्पट मिळवलीं. इतर पक्ष व स्वतंत्र यांनीं मिळवलेल्या जागांचें व मतांचें प्रमाण बघितलें तरीहि असाच विलक्षण प्रकार दिसून येतो. तेथें कोणत्याच पक्षाला निर्विवाद बहुमत मिळालेलें नसल्यानें स्थिर सरकार कसें बनवावें हा प्रश्न राज्यधुरिणांपुढें उभा राहिलेला आहे; पण त्याच्याशीं आपल्या विषयाचा संबंध नाहीं. आपला संबंध आहे तो एवढ्यापुरताच कीं, एकप्रातिनिधिक मतदारसंघांमुळें, द्विपक्षीय काय, बहुपक्षीय काय कोणत्याच प्रकारची लोकशाही स्थिर स्वरूपांत नांदूं शकत नाहीं त्याऐवजीं बहु-प्रातिनिधिक मतदारसंघच तिला अधिक साधक होऊं शकतात.

## मतदान पद्धति

मतदानांच्या पद्धतीहि अनेक आहेत. मतदारसंघांचे प्रकार असोत किंवा मतदानाच्या पद्धति असोत, त्यांची सविस्तर व गुणदोषदर्शक चर्चा करणें हा आपला विषय नव्हे. तर कोणती पद्धति पर्यायपक्षीय लोकशाहीसाठीं, त्यांतल्या-त्यांत, अधिक अनुकूल ठरेल तें पाहणें एवढेंच आपलें अतिमर्यादित विषयक्षेत्र आहे. मतदारसंघ बहुप्रातिनिधिक असणें आणि त्या संघातर्फे जितके सभासद निवडून द्यावयाचे तितकीं मतें देण्याचा अधिकार प्रत्येक मतदाराला असणें ही

एक मतदानाची पद्धति असते. आणि पुनः, हीं सर्व मतें मतदारानें कोणत्यातरी एकाच उमेदवाराला दिलीं पाहिजेत, किंवा त्याला तीं विभागून हव्या त्या उमेदवाराला हवीं तितकीं देतां येतील, असे दोन पोटप्रकार असतात. पहिल्या पोटप्रकाराला 'अविभाज्य' व दुसऱ्याला 'विभाज्य' मतदानपद्धति अशा संज्ञा असतात. पर्यायपक्षीय लोकशाहीला द्विप्रातिनिधिक मतदारसंघ व विभाज्य मतदानपद्धति हीं त्यांतल्या त्यांत अधिक अनुकूल असतात, असा अनेक राज्यशास्त्रज्ञांचा अभिप्राय आहे.

## पण...नकटीचें नाक नकटेंच !

पण हें, व अन्य जें काय जरूर असेल तें, सर्व करूनहि पर्यायपक्षामुळें लोकशाहीची विकृति टळेल किंवा ती निर्मळ होईल ही आशा मात्र सर्वथैव वृथाच होय. कारण, समजा कीं एका राष्ट्राच्या लोकसभेंत ६०० सभासद आहेत; त्यांतून एक अध्यक्ष वगळला तर ५९९ सभासद उरतात; या सभासदांचे दोन पक्ष पडले आहेत, असें आणखी समजा; एकांत ३०० सभासद असून दुसऱ्यांत २९९ आहेत; अशा स्थितींत ३०० सभासदांचा पक्ष सत्तारूढ होईल व २९९ चा पर्यायपक्ष म्हणून काम करील; अध्यक्ष हाहि सत्तारूढ पक्षाचाच असेल, पण तो निःपक्षपाती आहे असें गृहीत धरून त्या पक्षाचे सभासद ३०१ न म्हणतां ३०० च म्हटलेले आहेत; याच्याहून अधिक तुल्यबळ किंवा सामर्थ्यवान् पर्यायपक्ष कल्पितांच यावयाचा नाहीं, हें अगदीं उघड आहे; कारण त्यांत सत्ताधारी पक्षापेक्षां केवळ एकच सभासद कमी धरलेला आहे. वस्तुस्थिति अशी कोठेंच नसते; कमींतकमी तीन पक्ष व थोडेतरी अपक्षसभासद प्रत्येक राष्ट्राच्या लोकसभेंत असतात, असेंच सामान्यतः आढळून येतें; पण अधिकांत अधिक बलवान पर्यायपक्ष असला तरी त्यामुळें लोकशाही अविकृत कशी राहूं शकत नाहीं हें दाखवून दिलें म्हणजे त्याहून कमकुवत पक्षामुळें ती निर्दोष होऊं शकणार नाहीं हें निराळें सांगण्याचें कारण उरणार नाहीं. पर्यायपक्षाचे सभासद आपण अधिकारारूढ व्हावें या बुद्धीनें किंवा खरोखरच राष्ट्रभक्तीनें भारून गेल्यामुळें सत्तारुढ पक्षाच्या कायदेकानूंतील व प्रत्यक्ष अंमलबजावणींतील चुका कसोशीनें दाखवून देतील; विद्वत्ताप्रचुर भाषणें करतील; अखंडणीय युक्तिवादांच्या फैरी झाडतील; त्यामुळें सत्तारूढ पक्ष सामान्यतः आपला कारभार शक्यतितका लोकहितकर व निर्दोष व्हावा यत्प्रीत्यर्थ भरपूर

खबरदारीहि घेईल. पण प्रश्न प्रामाणिक मतभेदाचा किंवा पक्षप्रतिष्ठेचा उभा राहिला तर काय? कल्पना करा कीं, अमुक एका राष्ट्राशीं युद्ध करावें कीं करूं नये असा प्रश्न उत्पन्न झालेला आहे; सत्ताधारीपक्षानें आपल्या एका खास बैठकींत या प्रश्नाचा कसून विचार केला आहे आणि आपल्या तीनशेंपैकीं फक्त १५१ सभासदांच्या अनुकूल मतानें 'युद्ध करावें' असा निर्णय घेतला आहे. याउलट, पर्यायपक्षानेंहि आपली खास बैठक भरवून व तितक्याच कसोशीनें विचार करून 'युद्ध करूं नये' असा निर्णय सर्वच्यासर्व २९९ सभासदांच्या अनुकूल मतानें घेतला असल्यामुळें लोकसभेंत त्या ठरावाला प्राणपणानें विरोध करण्याचें त्यानें ठरवलें आहे. हा ठराव जेव्हां लोकसभेंत येईल तेव्हां त्याची काय गत होईल तें अवधानपूर्वक लक्षांत घ्या. ठरावावर अनुकूल प्रतिकूल अशा अप्रतिम वक्तृत्वाच्या तोफगोळयांच्या सरबत्ती झडतील, सर्व श्रोते शब्द-बंबाळ होऊन निघतील, अतितीव्र असें एक वाग्युद्ध होऊन जाईल. पण अखेरीस सत्ताधिष्ठितपक्षाचे सर्वच्यासर्व ३०० सभासद, शिस्तीच्या बंधनामुळें 'युद्ध करावें' या बाजूला मत देतील आणि पर्यायपक्षाच्या सर्वच्या सर्व २९९ सभासदांनीं प्रतिकूल मत दिलें तरी तो ठराव पास होईल, व सबंध राष्ट्र युद्धाच्या खाईंत लोटलें जाईल! आतां या मतदानाचें पृथक्करण करून काय दिसून येतें तें पहा: लोकसभेच्या एकंदर ५९९ सभासदांपैकीं सत्ताधारी पक्षाचे १४९ सभासद युद्ध पुकारूं नये अशा मताचे होते व त्यांनीं तें आपल्या पक्षांतर्गत खास सभेंत जोरदारपणें व्यक्तहि केलें होतें; आणि पर्याय-पक्षाचे सारे २९९ हि सभासद त्याच मताचे होते; म्हणजे ५९९ पैकीं १४९+२९९=४४८ लोकप्रतिनिधि वस्तुतः युद्धविरोधी होते. पण पक्षपद्धतीमुळें सत्तारूढपक्षाच्या केवळ १५१ सभासदांनीं आपलें मत ४४८ सभासदांच्या डोक्यावर लादलें, तें लोकसभेचें, म्हणजे अखिल राष्ट्राचें मत म्हणून जगाच्या बाजारांत खपवलें आणि आपली युद्धाची खुमखुमी जिरवून घेतली! लोकसभेचें, आणि पर्यायानें एकंदर राष्ट्राचेंहि खरेंखुरें मत अधिक असत्य, अधिक विकृत, किंबहुना थेट विरुद्ध करून दाखवणें शक्य आहे काय? केवळ १५१ सभासदांनीं आपल्या, लगभग तिप्पट सहकाऱ्यांच्या प्रामाणिकपणावर लाथ मारून, किंबहुना राष्ट्रांतील एकतृतीयांश मतदारांनीं आपल्या दुप्पट मतदारांच्या विचारसरणीचा अव्हेर करून स्वतःचें मत अखिल राष्ट्रावर लादून त्याला युद्धाच्या होमकुंडांत लोटून द्यावें काय? लोकसभेंत पक्षच नसते तर ४४८ सभासदांचीं मतें युद्ध-

विरोधी पडलीं असतीं, लोकसभेचें व पर्यायानें राष्ट्राचें खरें बहुमत यथार्थ प्रतिबिंबित झालें असतें व राष्ट्र युद्धाच्या वणव्यांतून वांचलें असतें, असेंच नाहीं का म्हणणें भाग पडत? आतां बोला: खऱ्या कसोटीच्या, कात्रीच्या, संकटाच्या प्रसंगीं पर्यायपक्षाचा उपयोग काय झाला? त्याचा उपयोग जर अशा महान् आपत्प्रसंगीं न होतां केवळ मामुली, दूरवर व खोलवर परिणाम करूं न शकणाऱ्या प्रसंगींच व्हावयाचा असला तर, द्विपक्षीय किंवा पर्यायपक्षीय लोकशाहीची महति गावयाची, तिच्यावर स्तुतिसुमनें उधळावयाचीं तीं कां म्हणून?

## अंधःकार अंधःकारानें कसा नष्ट होईल?

वास्तविक, पक्षामुळें पक्षांधता येणें अपरिहार्य असतें, पक्षांधतेमुळें पक्षपात करणें प्राप्त होतें; पक्षपात अधःपाताला जन्म देतो आणि तो लोकशाहीच्या प्राणभूत पंचतत्त्वांचा स्वाहाकार करून टाकतो हें जर का पटलें, तर पर्यायपक्षीय लोकशाही चांगली, बहुपक्षीय चांगली कीं एकपक्षीय चांगली हे प्रश्नच उत्पन्न होऊं शकत नाहींत. एका पक्षामुळें उत्पन्न होणारे दोष टाळण्यासाठीं म्हणून दुसरा किंवा दुसरे पक्ष उभे करणें म्हणजे चिखलानें चिखल धुऊन काढून तो साफ करूं पाहण्यासारखें, किंवा काळोखाविरुद्ध काळोख उभा करून प्रकाश पाहूं इच्छिण्यासारखें अशक्य व हास्यास्पदच नव्हे काय?

# एकपक्षीय लोकशाही म्हणजे हुकूमशाहीच
# आणि
# बहुपक्षीय लोकशाही म्हणजे बजबजपुरी

## “एकपक्षीय लोकशाही”: “वदतो व्याघाता” चें उदाहरण?

एखाद्या लोकशाही राष्ट्रांत व त्याच्या लोकसभेंत एकच पक्ष विशेष संघटित असला आणि इतर मतदार व लोकप्रतिनिधि स्वतंत्र अगर छोट्या–छोट्या पक्षांत विभागलेले असल्यामुळें निष्प्रभ अथवा निष्क्रिय झालेले असले तर तेथील राज्यपद्धति “एकपक्षीय” आहे असें वास्तविक रीत्या म्हणतां येईल व सामान्यतः तसें म्हटलेंहि जातें. आपल्या भारतांतील लोकसभा आज एकपक्षीयच आहे, असें म्हटलें तरी चालण्याजोगें आहे. पण जिला “एकपक्षीय” अशी संज्ञा तत्त्वशः किंवा यथार्थतः लावावयाची ती अशा जातीची नव्हे. या राज्यपद्धतींत लोकसभेमध्यें जें अत्यल्पबल छोटे पक्ष किंवा स्वतंत्र सभासद असतात ते अतिबहुबल पक्षानें किंवा राज्यघटनेनें कोणतें तरी प्रतिबंधक कारण उत्पन्न केल्यामुळें उत्पन्न झालेले नसतात; तर सहजगत्याच असतात. पण खऱ्याखुऱ्या “एकपक्षीय” राज्यपद्धतींत राज्यघटनेच्या द्वारेंच एकाहून अधिक राजकीय पक्ष असण्यास प्रतिबंध केलेला असतो. राष्ट्रांत एकच पक्ष असावा, व अर्थात् तोच सतत सत्तारूढ असावा, अशी तरतूद घटनेनेंच केलेली असते. वास्तविक, एकपक्षीय अशी ‘राज्यपद्धति’ असूं शकेल. पण “एकपक्षीय लोकशाही” हा शुद्ध ‘वदतो व्याघात’च होय. कारण ‘पक्ष’ म्हटला कीं ‘पक्षेतर’ लोकांचें अस्तित्व राष्ट्रांत आहे हें मान्य करणें तर्कतःच प्राप्त ठरतें. पण संघटित पक्षाबाहेरचे लोक हे विस्कळीत, पृथक्-पृथक् आहेत असें समजावें लागत असल्यामुळें त्यांच्या समुदायाला ‘पक्ष’ असें म्हणतां येत नाहीं, आणि म्हणून “एकपक्षीय लोकशाही” हा ‘वदतो व्याघात्’ होत नाहीं असें तिच्या पुरस्कर्त्यांचें म्हणणें दिसतें. परंतु, “लोकशाही” या शब्दाचा खराखुरा अर्थच “सर्वसत्ताक राज्यपद्धति” असा असतो; आणि “एकपक्षीय लोकशाही” म्हणजे

'पक्षसत्ताक'—अर्थात् 'सर्वसत्ताक नसणारी'—असा अर्थ घेणें सहजप्राप्त असतें व म्हणून तो 'वदतो व्याघात्' आहे हें म्हणणें मान्य केल्याशिवाय गत्यंतर उरत नाहीं. पण हा भाषेचा खेळ आहे असें एखादा म्हणूं शकेल, सबब तो मुद्दा सोडून देऊं.

## अत्यल्पसंख्यांचें अतिबहुसंख्यांवर आक्रमण

राष्ट्रांत एकच एक पक्ष असला व आणखी पक्ष स्थापण्यास प्रतिबंध असला म्हणजे विस्कळीत असणाऱ्या नागरिकांची संख्या कितीहि प्रचंड असतां कांहीं थोडेसे धूर्त व बलवान लोक आपल्या पक्षसंघटनेच्या जोरावर सत्तारूढच नव्हत तर सर्वसत्ताधार व सतत सत्ताधारी होऊं शकतात. दहा हजार सुट्या सुट्या सैनिकांनाहि फक्त दहांची संघटित तुकडी चारीमुंड्या चित करूं शकते हें कोणासहि विशद करून सांगण्याचें कारण नाहीं. सत्ताधारी पक्षानें ज्या हेतूनें अन्य पक्षांच्या स्थापनेस प्रतिबंध केलेला असतो तो पूर्णांशानें सिद्धीस जावा म्हणून त्याला नागरिक-स्वातंत्र्यावर बंधनें घालणें प्राप्त होत असतें. म्हणजे संघटना-स्वातंत्र्याबरोबरच भाषण, लेखन, मुद्रण इत्यादींच्या स्वातंत्र्याचाही अपहार होत असतो. प्रकाशनपूर्व तपासणी अपरिहार्य होऊन बसते, आणि प्रसंगीं व्यवसाय व संचार-स्वातंत्र्यहि हिरावून घेतलें जातें.

## मताधिकाराचा फार्स

एकपक्षीय राज्यपद्धतींत नागरिकांना मताधिकार नाकारण्यांत येत नाहीं. परंतु, एकतर नागरिक-स्वातंत्र्यावर कडक बंधनें असल्यामुळें सत्ताधीश पक्षियेतरांस कसलाच मतप्रचार करतां येत नाहीं; व शिवाय निवडणुकींत एका सत्तारूढ पक्षाचेच उमेदवार उभे राहूं शकावे अशी कडेकोट व्यवस्था राखली जात असल्यामुळें तो मताधिकार निरर्थक ठरत असतो, किंबहुना एक थट्टेचा विषय होऊन राहतो; आणि स्वतंत्र नागरिकांच्या दुःखावर डागण्या देण्याचाच तो एक प्रकार असतो असें म्हटलें तरी खपण्यासारखें असतें!

## एकपक्षीय पद्धति व 'वाद' यांची वृथा सांगड

एकपक्षीय लोकशाही आणि समाजसत्ता, श्रमिकसत्ता, एकवर्ग समाजरचना इत्यादि 'वादां'ची कांहीं लोक सांगड घालीत असतात. उदाहरणार्थ, समाजांतील आर्थिक वैषम्य दूर सारून एकवर्ग समाजाची स्थापना करावयाची असेल तर

एकपक्षीय लोकशाहीची, कांहीं कालापुरती तरी, जरुरी असते असें हे लोक प्रतिपादतात. पण ही सांगड वृथा असते. रशिया व चीन या राष्ट्रांत श्रमिक-सत्तावाद व एकपक्षीय लोकशाही यांची संगति जुळली आहे ही गोष्ट खरी. पण त्यांची ही संगति सततची किंवा अविच्छेद्य असते ही समजूत खरी नव्हे. इंग्लंडांत, अल्पप्रमाणावर तरी, समाजसत्तावाद अस्तित्वांत आला आहे. पण तेथें एकपक्षीय लोकशाही नाहीं, तर द्विपक्षीय किंवा त्रिपक्षीय लोकशाही आहे, हें जगविश्रुतच आहे. पोर्तुगाल व स्पेन या राष्ट्रांत आज एकपक्षीय लोकशाहीच चालू आहे. पण तीं कट्टीं श्रमिकसत्ताविरोधी असून धनिकसत्तावादीच आहेत. अर्थात् या पद्धतीचीं जीं दोषस्थळें आहेत तीं तिचीं अंगभूतच आहेत, कोणत्याहि 'वादा'च्या अंमलबजावणीसाठीं तात्पुरत्या स्वरूपांत तीं तिच्यांत शिरलेलीं नाहींत.

## एकपक्षीय लोकशाहीच्या रक्षणाचे दुहेरी उपाय

एकपक्षीय लोकशाही टिकवून धरण्यासाठीं, नागरिक-स्वातंत्र्याच्या अपहारा-सारखे कांहीं प्रतिबंधक उपाय योजणें जसें तिच्या समर्थकांना भाग पडतें तसेंच कांहीं संरक्षक उपाय योजणेंहि त्यांना प्राप्त असतें. त्यांतला एक हा कीं, ही पद्धति कांहीं काळापुरती, संक्रमणावस्था संपेपर्यंत, किंबहुना सारे सामान्य नागरिक खऱ्या लोकशाहीला लायक बनेपर्यंत रहावयाची आहे असा जोरदार प्रचार करून स्वराष्ट्रीय व परराष्ट्रीय लोकांची दिशाभूल करण्याचा होय. दुसरा, याहून परिणामकारक उपाय म्हणजे आर्थिक स्थिति सुधारण्याच्या कांहीं मुदतबंद योजना आंखून त्या पार पाडावयाच्या; आणि या योजनाबद्ध अर्थपद्धतीनें सर्वसामान्य जनतेच्या पोटापाण्याची व्यवस्था लावून राष्ट्राचें लष्करी सामर्थ्य वाढवीत राहण्याचा होय. पोट भरल्यामुळें स्वराष्ट्रीय जनता आपल्या वाटेस पोटतिडकीनें जाणार नाहीं आणि लष्करी सामर्थ्याकडे पाहून परराष्ट्रीय जनता आपल्यास नमून राहील अशी या एकपक्षीय लोकशाहीच्या समर्थकांची दृढ समजूत असते, व त्यांची ती समजूत कांहीं कालापुरतीतरी सफळ झाली असल्याचें दिसूनहि येतें. आर्थिक व सामाजिक वैषम्य नष्ट झालें रे झालें कीं आपण आपल्या पक्षाचेंच काय, पण खुद्द शासनसंस्थेचेंहि विसर्जन करणार असून, संपूर्ण विकसित लोकशाहीच्या पुढची पायरी जी अराज्यावस्था तीहि गांठणार आहोंत, असा निर्वाळा देण्यासहि हे समर्थक कमी करीत नाहींत! या दुहेरी उपायांमुळें लोकांचें पोट भरतें, आशावृत्ति स्तिमित होतात,पण त्यांचें मन, बुद्धि आणि आत्मा हीं मात्र मरून जात असतात.

## अखेरचें पर्यवसान हुकूमशाहींत

एकपक्षीय लोकशाहींत सर्व राज्यकारभार पक्षसत्ताक होऊन गेलेला असतो, आणि राज्यकारभारांत जनतेचें सामाजिक, धार्मिक, वाङ्मयीन, कलाविषयक इत्यादि सर्व प्रकारचें जीवन अंतर्भूत झालेलें असतें, हें तर उघडच आहे; पण शिवाय, योजनाबद्धतेच्या अतिरेकामुळें तो हळुहळू तज्ज्ञ किंवा शास्त्रज्ञसत्ताक, सैन्य किंवा शस्त्रधारीसत्ताक व बहुधा उभयसत्ताक होत जाणें अपरिहार्य टरतें. आणि असे लोक कोठेंहि व केव्हांहि झाले तरी अल्पच जन्मत असल्यानें एक-पक्षीय लोकशाही आधीं अल्पसत्ताशाहींत व अखेरीस हुकूमशाहींत रूपांतरित होणें कोणासच टाळतां येत नाहीं! बहुपक्षीय राज्यपद्धतींत पक्षांधताच धिंगाणा घालीत असते, एकपक्षीय राज्यपद्धतींत तिला सत्तामदांधतेची जोड मिळते! तेव्हां पहिली जर लोकशाहीला एकपट मारक तर दुसरी दसपट आहे असें म्हणण्याशिवाय अन्य मार्ग उरत नाहीं.

## बहुपक्षीय लोकशाही

जे आक्षेप द्विपक्षीय राज्यपद्धतीविरुद्ध आहेत ते सर्व अनेकपक्षीय पद्धतीला लागू पडतातच; पण शिवाय या पद्धतींत आणखीहि एक मोठा दोष दिसून येतो. या पद्धतींतील पक्ष आपापसांत तुल्यबल असले किंवा संयुक्त पक्ष बनवून सत्तारूढ झाले, अथवा पर्यायपक्ष म्हणून काम करूं लागले तरी त्यांचा संयोग केव्हां फुटेल तें सांगणें कठीण असतें. त्यामुळें स्थिर मंत्रिमंडळ बनवणें दुर्घट होऊन बसतें. मंत्रिमंडळें अल्पजीवि होऊं लागलीं म्हणजे राज्यकारभारांत स्थैर्य, सातत्य, गांभीर्य राहूं शकत नाहीं; लोकहितकारक अशी कोणतीच योजना हातीं घेऊन चिकाटीनें पार पाडणें दुष्कर होत असतें. त्यामुळें सर्वसामान्य जनता लोकशाहीच्याच विरुद्ध होऊन उठते आणि तिच्या या मनोवृत्तींतून कांहीं वेळां अराजक माजण्याची, कांहीं वेळां राज्यकारभार सामर्थ्यशाली अल्पसंख्याकांच्या हातांत जाण्याची, तर कांहीं वेळां हुकूमशाहीचा जन्म होण्याची भीति उत्पन्न होत असते. पोर्तुगाल व फ्रान्स या राष्ट्रांत या बहुपक्षीय लोकशाहीचा अनुभव फार वाईट आलेला आहे; आणि त्यांपैकीं पोर्तुगालांत सन १९२६ पासून सर्व-सत्ताधारी एकपक्षशाही, म्हणजेच हुकूमशाही लोकांच्या मानगुटीवर बसली आहे. तात्पर्य हेंच कीं, बहुपक्षीय लोकशाहींत द्विपक्षीय व एकपक्षीय लोकशाहीच्या

दोषांचीं बीजें एकत्रित झालेलीं असून ती आज बजबजपुरीच मानली जाण्याच्या स्थितीस पोंचली आहे!

## स्वतंत्र उमेद्वार विरुद्ध लोकशाही

एखाद्या राष्ट्रांत कितीहि पक्ष असले तरी त्यांच्याशीं संबंध न ठेवणारे, किंवा आपला राजकीय व्यवहार स्वतंत्रपणें करणारे अनेक मतदार असतातच. कित्येक वेळीं असे स्वतंत्र मतदारच पक्षबद्ध मतदारांपेक्षां संख्येनें अधिकहि असूं शकतात. अर्थात् निवडणुकींत त्यांतले कांहींजण 'स्वतंत्र उमेदवार' म्हणून उभे राहतात व स्वतंत्र मतदारांच्या मतांवर ते निवडूनहि येत असतात. पण सर्वच पक्ष त्यांच्या उमेदवारीविरुद्ध उठत असतात. 'कोणत्याहि पक्षाच्या उमेदवाराला मतें द्या, पण स्वतंत्रांना देऊं नका.' असा ते घोशा धरतात. स्वतंत्रांजवळ बहुधा राष्ट्रोद्धाराचा कोणताच कार्यक्रम नसतो; व कांहींजवळ असला तरी तो अंमलांत येण्यास अवश्य असलेलें लोकसभेंतील सहकाऱ्यांचें पाठबळ त्यांना मिळवतां येत नसतें, हा या पक्षबाज लोकांचा स्वतंत्रांविरुद्ध मुख्य आक्षेप असतो. पण त्यांत फारसें तथ्य असतेंच, किंबहुना ही विचारसरणी तत्त्वतः बरोबरच असते, असें म्हणतां येत नाहीं. स्वतंत्र उमेदवार जर नालायक असला तर त्याच्या उमेदवारीला हरकत घेणें रास्तच ठरतें. पण 'स्वतंत्र' म्हणून देशोद्धारक कार्य लोकसभेमार्फत पार पाडण्यास असमर्थ, हा युक्तिवाद समर्थनीय ठरूं शकत नाहीं. स्वतंत्र उमेदवार बौद्धिक, नैतिक व कर्तृत्वशालित्व या दृष्टींनीं सत्पात्र असणें सर्वस्वीं शक्य असतें. असा उमेदवार निवडून येणें बहुधा कठीण असतें. कारण, पक्षीय उमेदवाराच्या पाठीमागें जें द्रव्यबल व निवडणूक-विषयक संघटनाबल असतें तें सर्वच स्वतंत्र उमेदवारांच्या पाठीमागें असतें असें म्हणतां येत नाहीं. तथापि, असा उमेदवार निवडून देऊन लोकसभेंत गेला तर सरकारच्या किंवा अन्यपाक्षियांच्या ठरावांतील, कायद्यांतील किंवा योजनांतील गुणदोष चांगल्या रीतीनें दाखवूं शकेल व आपल्या नैतिक वजनानें राष्ट्राला इष्ट तेंच करण्याकडे सरकारची प्रवृत्ति वळवूं शकेल. तो स्वतःहि, कायद्याच्या आंत राहून, नवनव्या योजना सुचवूं शकेल. या योजना जर सरकारपक्षाच्या किंवा अन्यपक्षाच्या कार्यक्रमाला धरून असतील तर त्यांच्या सभासदांना त्यांच्यावर अनुकूल मत देणें प्राप्तच होईल; केवळ स्वतंत्र लोकप्रतिनिधीनें मांडलेल्या आहेत, म्हणून पक्षीय सभासद स्वतःच्याच कार्यक्रमानुसारी योजनांना विरोध करूं लागले तर द्वेषांध, देशद्रोही व पक्षघातकीहि ठरले जातील!

अर्थात्, स्वतंत्र सामासद पक्षविरहित असतांनाहि देशकार्य करूं शकेल. वास्तविक, पक्षीय राजकारण मुळांतच त्याज्य मानल्यावर त्यांत स्वतंत्राचें स्थान काय हें पाहण्याची गरज उरत नाहीं. तथापि, पक्षबाज राजकारणांत स्वतंत्र नैतिक व बौद्धिक शक्ति विसरल्या – अधिक्षेपल्या जाण्याचा जो आणखी दोष असतो तो दाखवून द्यावा एवढ्याच हेतूनें या प्रश्नाचा येथें थोडासा प्रपंच केला.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे. स्व...
अनुक्रम २३८८८ कि. ...
क्रमांक ९९७८ नों. दि. २/१२...

# पक्षघटना ही अंशतः तरी राज्यघटनाद्रोही नव्हे काय ?

लोकशाही राज्यघटनेमध्यें राष्ट्रांतील सर्व नागरिकांत, कायद्याच्या दृष्टीनें, जशी संपूर्ण समानता मानलेली असते तशीच संपूर्ण आत्मीयताहि मानलेली असते. राष्ट्रांतर्गत नागरिकांमध्यें स्व-पर भेदभाव ती मुळींच ठेवीत नाहीं. पण पक्षघटना कांहीं नागरिकांबद्दल स्वकीयता मानते तर कांहींबद्दल परकीयता मानते. म्हणजे राज्यघटनेनें ठेवलेली व्यापक व भेदातीत दृष्टि पक्षघटना आकुंचित व द्विधा करते. एका दृष्टीनें राज्यघटनेच्या सर्वव्यापी आदेशाचा हा भंग आहे, तर दुसऱ्या दृष्टीनें लोकशाहीवरील अनन्यनिष्ठेला लावलेला हा कलंक आहे. लोकशाही ही नुसती एक राज्यपद्धति नसून ती एक निष्ठाहि आहे, हें मागें दाखवून दिलेंच आहे. राष्ट्रांतील सर्व मतदार योग्य तेंच करतील व सत्पात्र अशाच धुरिणांच्या हातांत राज्यकारभार सोंपवतील असा विश्वास बाळगणें हेंच त्या निष्ठेचें द्योतक असतें. पण असा सर्वांवर विश्वास न ठेवतां, जे मतदार आपल्या म्हणण्याला रुकार देतील किंवा मताला मान तुकवतील त्यांचीच तेवढी वागणूक व निवड योग्य असेल, इतरांची अयोग्य असेल अशी समजूत करून घेणें म्हणजे लोकशाहीवरील निष्ठेला भगदाडच पाडणें होय, आणि या भगदाडांतच पक्षाचीं बीजें दडलेलीं असतात, हें स्पष्टच दिसतें.

एखाद्या पक्षांत सामील झालेले सर्वच्या सर्व मतदार सर्व बाबतींत सारख्या मताचे व समान वृत्तीचे असतात असें तरी म्हणतां येतें काय ? नाहींतर उलट, पक्षाच्या सभासदांची संख्या जितकी अधिक मोठी असावी, असें त्यांच्या नेत्यांना वाटतें, तितक्या अधिक भिन्न भिन्न विचारांच्या व वृत्तींच्या मतदारांना त्यांत वाव मिळावा अशी तरतूद त्यांना पक्षाच्या घटनेंतच करावी लागते. त्याचप्रमाणें तितक्या अधिक व्यापक स्वरूपाचा कार्यक्रमहि त्यांना पक्षसभासदांसमोर ठेवावा लागतो. हीच दृष्टि अधिक विशाल करून, राष्ट्रांतील सर्वच्या सर्व मतदारांना वाव मिळावा व कार्यक्रमहि सर्वस्पर्शी असावा यासाठीं ते सारेजण मिळूनच एक पक्ष होतो व राज्यघटना हीच या सर्वसंग्राहक पक्षाचीहि घटना असते असें सर्वांनींच, व मुख्यतः राष्ट्रधुरिणांनीं, कां मानूं नये ? आपल्या पक्षांत न येणारे लोक हे जर राष्ट्राचे गुन्हेगार असतील तर त्यांना गुन्ह्यानुसार शिक्षा करणें उचित ठरेल, आणि

जर ते तसे नसतील तर, केवळ मतभेदापायीं अगर वृत्तिभिन्नतेच्या मुद्दयावर, त्यांना 'परकीय' मानणें स्वजनद्रोहाचें द्योतक ठरेल! पण विपक्षियांना व पक्षविरोधकांनाहि 'राष्ट्रद्रोही' मानण्यांत येत नाहीं, तर त्यांनाहि स्वपाक्षियां-इतक्याच अधिकारांनीं राष्ट्रांत नांदण्याची मोकळीक ठेवलेली असते. अशा स्थितींत मोठमोठ्या राष्ट्रधुरिणांनींहि 'स्वपक्षीय' व 'परपक्षीय' असे भेद करणें हें, राष्ट्रव्यापी असावयास हव्या असलेल्या त्यांच्या दृष्टीस आलेले, एक-प्रकारचें अंधत्वच मानावें लागत नाहीं काय? या धुरिणांना पक्षघटनेच्या द्वारें राष्ट्रांतल्या कांहीं लोकांचें सहकार्य घेऊन जर राज्यकारभार हांकतां येतो तर राज्यघटनेच्या द्वारें सर्वांच्या सर्व लोकांचें सहकार्य घेऊन तो चालवतां कां येऊं नये? हा दोष लोकांचा समजावा कीं राष्ट्रनेत्यांचा मानावा? सामान्य लोकांपेक्षां राष्ट्रनेते हे अधिक बुद्धिमान, अधिक गुणवान, अधिक विशाल दृष्टीचे असतात असें धरलें तर या दोषाची जबाबदारी सामान्यांपेक्षां असामान्यांवर म्हणजे नेत्यांवरच पडते असें मानणेंच यथार्थ नव्हे काय? राष्ट्रांतले एकूण एक नागरिक मिळून एकच एक पक्ष होतो [अर्थात् 'पक्ष' शब्दाशिवाय ज्यांना एकात्मतेची कल्पना करतां येत नाहीं त्यांच्यासाठींच हा शब्द वापरलेला आहे] आणि राज्यघटना हीच त्या पक्षाचीहि घटना असते असें जे मानूं शकत नाहींत ते, एका अर्थीं राज्यघटनेचें व लोकशाहीनिष्ठेचें व्यापकत्व, श्रेष्ठत्व व पावित्र्य कमी करीत असतात असें म्हणण्याशिवाय गत्यंतर उरत नाहीं. आणि ही गोष्ट लक्षांत घेतली म्हणजे पक्षघटना ही अंशतः तरी राज्यघटनाभंजक आहे असें म्हणणें क्रमप्राप्त ठरतें.

## पक्षशाहींतून आधीं नेतेशाही व मग हुकूमशाही कशी जन्मते!

पक्षघटना ही राज्यघटना कशी आकुंचित करते तें वर दाखवलेंच आहे. आतां ही आकुंचित दृष्टि पक्षशाहींत अधिकाधिक आकुंचित कशी होत जाते आणि तिच्यांतून नेतेशाही व अखेरीस हुकूमशाही जन्मास येण्यास अनुकूल परिस्थिति कशी तयार होते तें थोडक्यांत पाहूं. खऱ्याखुऱ्या लोकशाहींत जनतेच्या अडी-अडचणी, आवडी-निवडी, आशा-आकांक्षा इत्यादि सर्व कांहीं खालून वर, म्हणजे सामान्य जनतेकडून पुढारीवर्गाकडे किंवा अधिकाऱ्यांकडे जावयाचें असतें, आणि पुढाऱ्यांनीं वा अधिकाऱ्यांनीं आवश्यक ती तपासणी करून त्यांची परिपूर्ति शक्यतितक्या अधिक प्रमाणांत व अधिक त्वरेनें करावयाची असते. परंतु, पक्षशाहींत लोकांनीं कोणत्या गोष्टींना अडचणी मानावें, कोणत्याना सोयी समजावें,

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे.
क्रमांक ... नों. दि. ...


कोणत्या आशा धराव्या, कोणत्या आकांक्षा सोडून द्याव्या, थोडक्यांत, कोणी कसें जगावें, कोणी कसें मरावें याचेंहि शिक्षण देण्याचे प्रयत्न पक्षनेते करीत असतात. म्हणजे जें खालून वर जावयाचें तें वरून खालीं वाहत येतें. हें शिक्षण लोकांच्या अंगांत मुरावें, रक्तांत भिनावें म्हणून त्यांना पूज्य व प्रिय वाटणाऱ्या विभूतींचीं नांवें घेऊन-घेऊनहि पक्षनेते उपदेश करीत सुटतात. या विभूतींनीं दिलेल्या शिकवणी ते स्वतः पायांखालीं पदोपदीं तुडवीत असतात आणि इतरांना मात्र त्यांचा वारेमाप ' डोस ' देत असतात. या उपदेशाचा परिणाम भोळ्याभाबड्या जनतेच्या मनावर तत्काळ होत असतो, आणि जे लोक त्याला बळी पडत नाहींत त्यांच्या मुसक्या बांधण्याची व्यवस्था पक्षश्रेष्ठींनीं करून ठेवलेलीच असल्यामुळें ते अगतिक बनून जातात. आणि संभ्रमित व अगतिक मनोवृत्ति सर्रास पसरली म्हणजे या नेत्यांना हुकूमशहा बनणें फार सोपें जातें !

## पक्ष अपरिहार्य कां वाटतात ?

पण हें सर्व जाणणाऱ्या लोकांतहि कांहींजणांना ' पक्ष ' हे अपरिहार्य वाटत असतात. ते असा युक्तिवाद पुढें करतात कीं, कोणत्याहि प्रश्नाचा निर्णय अनेक लोकांकडून लावून घ्यावयाचा झाला म्हणजे प्रथम त्यावर त्यांच्याकडून साधक-बाधक चर्चा करून घेणें प्राप्त असतें आणि अखेरीस ' होय ' किंवा ' नाहीं ' म्हणवून घेऊनच निर्णय लावणें भाग पडतें. याचा सरळ अर्थ असा होतो कीं, कोणत्याहि प्रश्नाच्या ऐन निर्णयाच्या क्षणाला निदान दोन पक्ष पडणें अपरिहार्य होय. पण असे प्रसंगवशात् पडणारे पक्ष हे मुळीं खऱ्या अर्थानें पक्षच नव्हत; तर ते गट किंवा फळ्या आहेत. ' राजकीय पक्ष ' म्हटला कीं त्याची एक घटना असते, त्याचें सभासदत्व कोणाला मिळावें त्यासंबंधीं कांहीं नियम असतात; सर्वांत मुख्य जें काय असतें तें म्हणजे त्याची ' शिस्त '. अशा शिस्तबद्ध पक्षाच्या सभासदांना एखाद्या लोकसभेंत जेव्हां मतदान करावयाचें असतें तेव्हां ते सारेजण कोणत्या तरी एकाच बाजूनें मतदान करीत असतात ; नव्हे, तर त्यांना आपलीं वैयक्तिक मतें बाजूस सारून पक्षानें ठरवलेल्या बाजूसच तीं नेहमीं द्यावीं लागतात. फळ्यांची किंवा गटांची गोष्ट तशी नसते. एखाद्या गटांतील जे लोक एका प्रश्नावर ज्या बाजूनें मतें देतील त्यांतील पुष्कळजण दुसऱ्या प्रश्नावर दुसऱ्या बाजूनें मतें देऊं शकतील. त्यांना हव्या त्या प्रश्नावर हवें तसें मत देण्यास कोणीच प्रतिबंध केलेला नसतो. त्यामुळें जे लोक आतां एका फळींत असतील त्यांतलेच कांहींजण क्षणभरानें विरुद्ध फळींत दिसूं शकतील. लोकशाहीला घातक ठरतात ते

हे प्रसंगोपात् पडणारे गट किंवा फळ्या नव्हत, तर नेहमीं शिस्तबद्ध असणारे ते राजकीय पक्ष होत. तेव्हां निर्णयाच्या ऐन क्षणास जें काय अपरिहार्य असतें तें 'गट पडणें' होय, 'पक्ष असणें' नव्हे, हा मुद्दा नीट ध्यानांत ठसवणें अगत्याचें आहे. एरव्हीं, या मुद्द्याचा उल्लेख मागें एकदां झाला आहे. पण पक्ष ही अपरिहार्य घटना नव्हे हें चांगलें मनावर बिंबावें यासाठीं, पुनरुक्तीचा दोष पत्करूनहि तो, येथें दुसऱ्या शब्दांनीं विशद करून दाखवला आहे.

## निष्कर्ष

येथवर जें विवेचन केलें त्यावरून, "लोकशाहीसाठीं राजकीय पक्ष आवश्यक नाहींत व अपरिहार्यहि नाहींत, तर उलट सर्वस्वीं घातक आहेत," हा सिद्धांत पटण्याजोग्या रीतीनें विशद करून दाखवला आहे अशी माझी समजूत आहे.

## वाचकांना विनंती

वाचन, विचार व अनुभव यांवरून लोकशाहीसंबंधीं जीं मतें बनलीं व कालांतरानें दृढ झालीं त्यांतलीं कांहीं येथें मांडलीं आहेत. राजकीय पक्षशाहीवर चिखलफेक करावी किंवा केवळ वादाकरतां एक वाद उपस्थित करावा असा हेतु, तीं मांडण्याच्या मूळाशीं मुळींच नाहीं. तर लोकशाहीला राजकीय पक्षशाही खरोखरच घातक ठरते असें मला प्रांजळपणें वाटल्यामुळेंच तें शक्य त्या जोरानें मांडलेलें आहे. तीं प्रामाणिक मतें नसतीं तर भाषेंत साज दिसला असता कदाचित्, पण मांडणींत जोम आला नसता. तीं सर्वांना पटलीं पाहिजेत असा आग्रह, अर्थात्च, धरतां यावयाचा नाहीं. मात्र तीं वाचतांना, पक्षपद्धतीच्या राजकारणाचें जें भयंकर दडपण आज पुष्कळांच्या मनावर पडलेलें आहे तें पार भिरकावून देऊन स्वतंत्र बुद्धीनेंच तीं वाचलीं पाहिजेत. पण तसें करूनहि तीं सर्वांसच पटतील असा संभव नाहीं. उलट, तीं वाचल्यावर पक्षपद्धतीच्या राजकारणाची आवश्यकता कांहींना अधिकच तीव्र भासणेंहि शक्य आहे. जर तसें झालें तर त्यांनीं माझे विचार सपशेल खोडून काढून दाखवावे, अशी विनंति आहे. कारण, जो कोण स्वतंत्र विचारांचा खराखुरा भोक्ता आहे तो दुसऱ्याच्या स्वतंत्र विचारांनाहि तितकेंच महत्त्व देत असतो आणि त्यांचें स्वागतहि आनंदानें व आदरानेंच करीत असतो – मग ते विचार स्वतःच्या विचारांना विरोध करणारे का असेनात ? – मीहि तेंच करीन. मात्र जे कोण असे विरोधी विचार मांडतील त्यांनीं ते कोठें प्रसिद्ध होत आहेत तें मला एक कार्ड माझ्या कांदिवलीच्या पत्त्यावर टाकून कळविण्याची कृपा करावी. म्हणजे ते वाचून काढणें मला सुलभ होईल.

REFBK-0009773